CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

लातूर | रविवार, १५ मार्च २०२६ । वर्ष ४ थे अंक ७ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





गॅस सिलिंडरच्या तुटवड्यावर काँग्रेस नेते आंदोलन करत असताना 'वि'चित्रा ताई तिथे आल्या आणि २५ दिवसांत सिलिंडर मिळते, असे म्हणाल्या. सिलिंडर येत नाही तोपर्यंत सामान्य माणसांनी तुमच्या घरी जेवायला यायचे का, 'वि'चित्रा ताई ?
**-रोहिणी खडसे**, नेत्या राकाँ(श.प)


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

रविवार, १५ मार्च २०२६





आखाती देशातील युद्धामुळे भारताला अत्यंत गंभीर परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. पण सरकारकडून त्या संदर्भात अफवा पसरवल्या जात आहेत की सर्व काही आलबेल आहे. मात्र परिस्थिती वेगळी आहे.
**संजय राऊत**, खासदार उबाठा

# अफगाणचा पाकिस्तानवर प्रतिहल्ला, १४ सैनिक ठार

## इस्लामाबाद, खैबर पख्तूनख्वा लक्ष्य, स्फोटात १० पोलिसांचा मृत्यू

♦ **इस्लामाबाद, १४ मार्च**

अफगाण हवाई दलाने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद, खैबर पख्तूनख्वासह अनेक भागात ड्रोनचा मारा केला. यात अनेक लष्करी तळे आणि निवासी इमारती उद्ध्वस्त करण्यात आल्या. पाकिस्तानी सैन्याने शुक्रवारी केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आल्याचे अफगाणिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.

पाकिस्तानच्या कोहाट प्रदेशातील लष्करी तळांना लक्ष्य करण्यात आले. याशिवाय इस्लामाबाद येथील लष्करी तळ आणि संरक्षण विभागाच्या इमारतींवर ड्रोनचा मारा करण्यात आला. खैबर पख्तूनख्वामध्येदेखील लष्कराच्या तळावर हल्ला करण्यात आला. यात पाकिस्तानी लष्करी तळाचे मोठे नुकसान झाले. अफगाण सैन्याने डुरंड रेषेच्या पूर्वेकडील कुनार आणि नांगरहार प्रांतांच्या पूर्वेकडील भागात कारवाई सुरू केली. अफगाणिस्तानने दावा केला की या कारवाईदरम्यान पाकिस्तानी लष्करी चौकी ताब्यात घेण्यात आली, ज्यामध्ये १४ सैनिक ठार झाले आणि ११ जण जखमी झाले. शिवाय, एक चिलखती टँक आणि एक आंतरराष्ट्रीय वाहन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. दुसरीकडे



पाकिस्तानच्या वायव्य भागात एका आयईडी स्फोटात गस्त घालणाऱ्या पोलिसांचे उडवण्यात आले. यात दहा पोलिस ठार झाले. हा हल्ला खैबर पख्तूनख्वा प्रांतातील लक्की मरवत जिल्ह्यातील शादि खेल बेट्टानी परिसरात झाला. प्रतिबंधित संघटना तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) ने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

पाकिस्तानने काबूल आणि कंदाहारमध्ये हवाई हल्ले केले होते, याला प्रत्युत्तर म्हणून कारवाई केल्याने अफगाणिस्तानच्या संरक्षण विभागाने म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

### तालिबानने लाल रेषा ओलांडली : झरदारी

पाकिस्तानी राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी अफगाणिस्तान आणि टीटीपीच्या हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, ड्रोन हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचे नुकसान झाले आहे. तालिबानी सरकारने लाल रेषा ओलांडली असून त्यांना हल्ल्याची किंमत मोजावी लागेल. पाकिस्तान आपल्या नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी सर्व शक्य पावले उचलेल. ■

### पाकिस्तानने फेटाळला दावा

तालिबानी सरकारने इस्लामाबादमधील लष्करी तळ उद्ध्वस्त झाल्याचा दावा केला होता. तथापि, झरदारी यांनी त्यांचे सर्व दावे फेटाळून लावत म्हटले की, हवाई संरक्षण प्रणालीने अफगाणने मारा केलेले सर्व ड्रोन नष्ट केले आहेत. पाकिस्तान आपल्या लोकांविरुद्ध कोणतेही हल्ले सहन करणार नाही आणि स्वसंरक्षणार्थ लवकरच प्रत्युत्तर दिले जाईल. ■

# मंदिरांमध्ये प्राण्यांच्या बळीवर बंदी घाला

## सर्वोच्च न्यायालयात याचिका; केंद्र सरकारला नोटीस

♦ **नवी दिल्ली, १४ मार्च**

धार्मिक परंपरांच्या नावाखाली मंदिरांमध्ये प्राण्यांचा बळी देणे संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. हा अधिकार मानवांपुरताच मर्यादित नसून प्राण्यांना देखील लागू होतो, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याच्या वकिलाने केला आणि मंदिरांमध्ये प्राण्यांच्या बळीवर बंदी घालण्याची मागणी केली. यावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले.

एका सामाजिक संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेत धार्मिक परंपरांच्या नावाखाली प्राण्यांच्या बळीवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली. याचिकेवर सुनावणी करताना, न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनाने केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन मंत्रालयाला नोटीस बजावली आणि चार आठवड्यांत उत्तर देण्यास सांगितले. याचिकाकर्त्याचे वकील श्रुती बिष्ट यांनी युक्तिवादात म्हटले की, सरकार मंदिरांमध्ये प्राण्यांच्या बळीच्या प्रकरणांमध्ये प्रभावी कारवाई करत नाही. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी अनेक प्रकरणांमध्ये प्रत्येक सजीवाला जगण्याचा अधिकार असल्याचे म्हटले आहे. संविधानाच्या कलम २१ मध्ये देखील जगण्याचा अधिकार आहे. जीवन हे केवळ मानवांपुरते मर्यादित नाही; प्राण्यांचे जीवन देखील या अधिकारात येते. न्यायाच्या हितासाठी, प्राण्यांचेही संरक्षण केले पाहिजे. *(वृत्तसंस्था)*

### कायद्यात दुरुस्तीची मागणी

याचिकेत प्रामुख्याने प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६० च्या कलम २८ मध्ये सुधारणा करण्याची मागणी केली आहे आणि धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करण्यास प्रतिबंध घालण्याची मागणी केली. कलम २८ नुसार, प्राण्यांचा बळी देणे गुन्हा मानला जात नाही. याचिकेत या तरतुदीला आव्हान देण्यात आले. धार्मिक विधींदरम्यान प्राण्यांचा बळी रोखण्यासाठी न्यायालयाला नवीन आणि कठोर कायदे लागू करण्याची विनंती करण्यात आली आहे. ■

### याचिकाकर्त्याने युक्तिवादात काय म्हटले?

बाली, इंडोनेशिया, नेपाळ आणि भारतातील हिमालयीन प्रदेश, ईशान्य भारत, ओडिशा, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील काही भागांमध्ये आजही प्राण्यांचा बळी देण्याची प्रथा आहे. निरोगी नर प्राण्यांची बलिदानासाठी निवड केली जाते. काही प्रकरणात लोक स्वतःची मुले किंवा स्वतःला देवतांना अर्पण करतात. ही प्रथा थांबवण्यासाठी व्यापक पावले उचलण्याची आवश्यकता आहे. कठोर कायदे करणे, जनजागृती वाढवणे आणि गैर-सरकारी संस्थांच्या सहकार्याने मोहीम राबवणे आवश्यक आहे. ■

# बॉम्बचा उल्लेख करीत केली टिप्पणी, डिजेवाल्याला अटक

♦ **बंगळुरू, १४ मार्च**

केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान कर्मचाऱ्यांशी झालेल्या वादात बॉम्बचा उल्लेख करून टिप्पणी केल्याबद्दल एका डिस्क जॉकीला अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी शनिवारी सांगितले.

पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील रजतेश बेरा हा ११ मार्च रोजी इंडिगोच्या विमानाने बेंगळुरूहून रायपूरला जाणार होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बेंगळुरूमध्ये डिस्क जॉकी म्हणून काम करणारा बेरा टर्मिनल १ येथील गेट क्रमांक १६ वर गेला होता परंतु बोर्डिंग वेळेनंतर तो पोहोचला असल्याने गेट कर्मचाऱ्यांनी त्याला प्रवेश नाकारला. यादरम्यान वाद झाला आणि त्याने विमानात बॉम्ब असल्यास विमान थांबेल, अशी टिप्पणी केली, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. 'बॉम्ब' हा शब्द वापरल्याने सुरक्षेच्या चिंता निर्माण झाल्या आणि त्याला ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या वक्तव्याचे गांभीर्य तपासण्यासाठी प्रोटोकॉलनुसार बॉम्ब धमकी मूल्यांकन समिती स्थापन करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. विमान कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीदरम्यान, बेराने त्याचे वडील आजारी असल्याने तो तातडीने विमानात चढण्याचा प्रयत्न करत होता, असे सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# मणिपूरमध्ये चार बंडखोरांना अटक

♦ **इम्फाळ, १४ मार्च**

मणिपूरच्या इम्फाळमधून सुरक्षा दलांनी बंदी घातलेल्या संघटनेशी संबंधित चार बंडखोरांना अटक केली, असे पोलिसांनी शनिवारी सांगितले.

शुक्रवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील न्यू चेकॉन भागातून बंदी घातलेल्या युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (पी) च्या चार सक्रिय कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून पिस्तूल, गोळ्यांसह शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. *(वृत्तसंस्था)*



इस्रायलचा एकाचवेळी इराण, येमेनमधील हुती बंडखोर आणि लेबनॉनसोबत संघर्ष सुरू आहे. शनिवारी इस्रायली लढाऊ विमानांनी केलेल्या हल्ल्यात लेबनॉनमधील सिडॉन शहरातील अनेक इमारतींचे नुकसान झाले

# 'शिवालिक'नंतर 'नंदादेवी' होर्मुझबाहेर

## भारताच्या प्रयत्नांना यश ● दोन्हीही एलपीजी टँकर्स

♦ **नवी दिल्ली, १४ मार्च**

शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या मालकीचे भारतीय ध्वज असलेले 'शिवालिक' आणि 'नंदादेवी' हे दोन एलपीजी टँकर्स होर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीरीत्या ओलांडून भारताच्या दिशेने मार्गस्थ झाले आहेत. इराण आणि इतर प्रादेशिक सत्तांच्या सहकार्याने राबवण्यात आलेली ही एक अत्यंत सावधगिरीची मोहीम होती, असे सूत्रांनी सांगितले.

भारत आणि इराणमध्ये झालेल्या राजनयिक पातळीवरील चर्चेनंतर भारताला हा सुरक्षित मार्ग देण्यात आला. फेब्रुवारीत हे युद्ध भडकल्यानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी इराणचे मंत्री सईद अब्बास अरघाची यांच्यासोबत चर्चेच्या चार फेऱ्या झाल्या होत्या. केवळ इतकेच नव्हे, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी इराणचे राष्ट्रपती मसुद पेझेशकियन यांच्याशी भारतीय जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीची खात्री करण्यासाठी उच्चस्तरीय चर्चा केली होती.

शिवालिक जहाजात जवळपास ४० हजार मेट्रिक टन गॅस आहे, तर नंदादेवी जहाजही मोठ्या प्रमाणात इंधन वाहून आणत आहे. भारताच्या दिशेने प्रवास करणाऱ्या आणखी एका जहाजाने इराण आणि ओमान यांच्या दरम्यानच्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा अरुंद सागरी मार्ग ओलांडल्यानंतर अवघ्या एका दिवसानंतर त्यांचे हे यशस्वी मार्गक्रमण झाले आहे.

सध्या सामुद्रधुनीच्या दोन्ही बाजूंना अजूनही थांबलेल्या भारतीय ध्वज धारण करणाऱ्या दोन डझनांपेक्षा जास्त व्यापारी जहाजांसाठी सुरक्षित मार्ग सुनिश्चित करण्याच्या दिशेने भारत कार्यरत आहे. ओमान येथून आफ्रिकेकडे गॅसोलिन घेऊन जाणारा 'जगप्रकाश' हा भारतीय ध्वजधारक आणखी एक टँकरही त्या सामुद्रधुनीच्या पूर्व बाजूने मार्गस्थ झाला असल्याचे नौवहन मंत्रालयातील विशेष सचिव राजेशकुमार यांनी पत्रपरिषदेत सांगितले होते.

या विस्तृत आखाती प्रदेशातील व्यापारी, बंदरातील आणि समुद्रातील जहाजांवर जवळपास २३ हजार भारतीय खलाशी कार्यरत आहेत. फेब्रुवारीच्या अखेरीस अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांमुळे मध्यपूर्वेतील युद्धाचा भडका उडाल्यापासून, इराणने तेल निर्यातदार असलेल्या शेजारी देशांवर हल्ले चढवले आहेत. *(वृत्तसंस्था)*

### नरेंद्र मोदींनी व्यक्त केली जीवितहानीबद्दल चिंता

पेझेशकियन यांच्याशी झालेल्या संभाषणादरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी वाढता संघर्ष आणि नागरिकांच्या जीवितहानीबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. भारतीय नागरिकांची सुरक्षा तसेच वस्तू व ऊर्जेच्या कोणत्याही अडथळ्याविना वाहतुकीची आवश्यकता ही भारताची सर्वोच्च प्राथमिकता आहे, असे मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले. ■

## चित्रपट वार्ता

### मधुबालाच्या भूमिकेत दिसणार सई पल्लवी?



**मुंबई** : हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात सुंदर आणि लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक असलेल्या मधुबाला यांच्या जीवनावर आधारित बायोपिक पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. आता मधुबालाच्या भूमिकेसाठी सई पल्लवीच्या नावाच्या चर्चा सुरू आहे. चित्रपटाचे निर्माते अशा चेहऱ्याच्या शोधात आहेत, जो मधुबालाचे सौंदर्य आणि अभिनय दोन्ही पडद्यावर जिवंत करू शकेल. याच कारणामुळे कास्टिंगबाबत खूप सावधगिरी बाळगली जात आहे आणि अनेक नावांवर विचार केला जात आहे. चित्रपटाच्या कास्टिंगबाबत आणि चित्रीकरणारबाबत अद्याप निर्मात्यांकडून कोणतीही अधिकृत माहिती आलेली नाही. ■

### 'कॉकटेल २'चे पोस्टर प्रदर्शित

**मुंबई** : बॉलिवूडमधील बहुचर्चित कॉकटेल २ या चित्रपटाबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढत चालली आहे. नुकताच या चित्रपटातील शाहिद कपूर , रश्मिका मंदाना आणि कृती सेनन यांचा फर्स्ट लूक समोर आला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन होमी अदाजनिया यांनी केले आहे. हे पोस्टर शेअर करताना तिन्ही कलाकारांनी कॅप्शनमध्ये चित्रपटाबद्दल आणखी माहिती जाणून घेण्यासाठी १८ मार्चला थिएटरमध्ये जरूर या, असे लिहिले आहे. 'कॉकटेल २'चा टीझर प्रेक्षकांना १८ मार्चला 'धुरंधर: द रिवेंज' या चित्रपटासोबत दाखवण्यात येणार आहे. हा चित्रपट १९ जूनला प्रदर्शित होणार आहे. ■



# पाकिस्तानी ड्रोन दिसल्यावर साम्बात शोधमोहीम

♦ **जम्मू, १४ मार्च**

जम्मू-काश्मिरातील साम्बा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानी ड्रोनने भारतीय हद्दीत प्रवेश केल्यानंतर सुरक्षा दलांनी शनिवारी मोठ्या प्रमाणात शोधमोहीम सुरू केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

राममढ सेक्टरमधील कांद्रल, अबटाल आणि बहादूरपूर या गावंत काही मिनिटे शत्रू देशातील ड्रोनच्या हालचाली शुक्रवारी रात्री दिसून आल्या होत्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. सदर परिसर कडक पाळतीखाली ठेवण्यात आला होता आणि सीमेपलीकडून शस्त्रास्त्रे किंवा मादकपदार्थांची तस्करी हवाई मार्गाने होणार नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी दिवसाच्या पहिल्या प्रकाशातच एक व्यापक शोधमोहीम हाती घेण्यात आली होती, असे त्यांनी सांगितले.

दोन दिवसांपूर्वी पाकिस्तानी ड्रोनने सीमावर्ती भागातील आर एस पुरा सेक्टरमध्ये टाकलेले जवळपास साडेतीन किलो हेरॉईन सुरक्षा दलांनी जप्त केले.

आंतरराष्ट्रीय बाजारात त्याचे मूल्य २० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. या प्रकरणात दोन संशयित तस्करांना अटक करण्यात आली आहे. *(वृत्तसंस्था)*

# उत्तर कोरियाने डागली १० क्षेपणास्त्रे

## अमेरिका-दक्षिण कोरिया युद्धाभ्यासादरम्यान उचलले पाऊल

♦ **सेऊल, १४ मार्च**

उत्तर कोरियाने शनिवारी पूर्वेकडील समुद्रात जवळपास १० बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागली आहेत. दक्षिण कोरिया आणि अमेरिकेचा संयुक्त युद्धाभ्यास सुरू असताना उत्तर कोरियाने ही कृती केली, असे दक्षिण कोरियाच्या सैन्याने सांगितले.

प्योंगयांगच्या जवळ असलेल्या सुनान क्षेत्रातून ही क्षेपणास्त्रे डागण्यात आली, असे दक्षिण कोरियाचे चीफ्स ऑफ स्टाफने सांगितले. प्रारंभिक माहितीच्या आधारे, या क्षेपणास्त्रांनी जवळपास ३५० किमी अंतरापर्यंत उड्डाण केले. उत्तर कोरियाने डागलेली क्षेपणास्त्रे जपानच्या विशेष आर्थिक क्षेत्राबाहेरील समुद्रात कोसळली, असा दुजोरा जपानच्या संरक्षण मंत्रालयाने दिला. यात कोणतेही नुकसान झालेले नाही, असे जपानने म्हटले आहे.

उत्तर कोरियाच्या या कृतीनंतर पाळत वाढवली आहे तसेच कोणत्याही अतिरिक्त प्रक्षेपणाची शक्यता पाहता सज्जता ठेवली आहे, असे दक्षिण कोरियाच्या सैन्याने सांगितले. दक्षिण कोरिया, अमेरिका आणि जपानने या घटनाक्रमाबाबतची माहिती परस्परांना सादर केली आहे.

अमेरिका आणि दक्षिण कोरियातील युद्धसराव हा हल्ल्याची तयारी आहे, असा दावा उत्तर कोरिया दीर्घ काळापासून करीत आहे. दोन्ही देशांची संयुक्त सैन्य क्षमता आणि युद्ध तयारीचा आढावा घेण हा या युद्धसरावामागील उद्देश असल्याचा आरोप उत्तर कोरियाने केला.

पश्चिम आशियातील सध्या सुरू असलेल्या संघर्षामुळे, दक्षिण कोरियातील तैनात असलेल्या थाड आणि पॅट्रियॉटसारख्या अमेरिकी क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालींच्या संभाव्य पुनर्तैनातीबाबतच्या अटकळींमुळेही तणाव वाढला आहे. *(वृत्तसंस्था)*

### काय असू शकते प्रक्षेपणाचे कारण?

अमेरिका आणि दक्षिण कोरियातील 'फ्रीडम शिल्ड' हा वार्षिक लष्करी सराव सुरू असताना उत्तर कोरियाने क्षेपणास्त्र चाचणी घेतली आहे. हा सराव ९ मार्च ते १९ मार्च या कालावधीत होत आहे. या सरावाचे घोषित उद्दिष्ट म्हणजे दोन्ही राष्ट्रांच्या संयुक्त लष्करी क्षमतांची आणि युद्धसज्जतेची चाचणी करणे हा आहे. ■

# व्हेल माशाप्रमाणे माणूसही जगू शकतो २०० वर्षे

## सस्तन प्राण्यांपेक्षा असतात १०० पट जास्त प्रथिने ● शास्त्रज्ञांना लागला दीर्घायुष्याचा शोध

♦ **न्यू यॉर्क, १४ मार्च**

मानव २०० वर्षांपर्यंत जगू शकतो, असे रोचेस्टर विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासात आढळून आले आहे. मानवाच्या या दीर्घायुष्याचे रहस्य शास्त्रज्ञांना पृथ्वीवर सर्वात जास्त काळ जगणाऱ्या प्राण्यांपैकी एक असलेल्या व्हेल माशामध्ये सापडले आहे. जवळजवळ दोन शतके जगणारा 'बोहेड व्हेल' प्रजातीच्या माश्यांचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांना ही प्रथिने सापडली आहेत. या प्रथिनामुळे माशाला दीर्घकाळ आणि निरोगी आयुष्य जगण्यास मदत होते.

या माश्यामध्ये कोल्ड-इंड्युसिबल आरएनए-बाइंडिंग प्रोटीन (सीआयआरबीपी) म्हणून ओळखले जाणारे जनुकीय प्रथिने असतात, असे 'नेचर'मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात सांगितले आहे. हे प्रथिन 'डबल-स्ट्रँड डीएनए ब्रेक्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गंभीर अनुवांशिक नुकसानाची दुरुस्ती करण्यास मदत करतात. ते मानवांमध्ये वृद्धत्व, कर्करोग आणि इतर आजारांशी जोडलेले आहे. 'बोहेड व्हेल'मध्ये इतर सस्तन प्राण्यांपेक्षा हे प्रथिने सुमारे १०० पट जास्त असतात, असे वेरा गोर्बुनोवा आणि आंद्रेई सिलुआनोव्ह यांच्यासह शास्त्रज्ञांनी शोधून काढले.



अब्जावधी पेशी असलेला इतका मोठा प्राणी इतका काळ जगूनही कर्करोग होण्यापासून कसा वाचतो हे या शोधामुळे स्पष्ट होण्यास मदत होऊ शकते. या संकल्पनेनुसार, मोठ्या प्राण्यांना कर्करोगाचा धोका जास्त असावा कारण त्यांच्याकडे जास्त पेशी असतात आणि ते जास्त काळ जगतात, परंतु बरेच जण तसे करत नाहीत. व्हेल मासाच्या पेशींमध्ये कर्करोगास कारणीभूत असलेले अनुवांशिक उत्परिवर्तन जमा होण्याची शक्यता कमी असते, असे संशोधकांना असे आढळून आले. *(वृत्तसंस्था)*

### फळमाशांवर प्रयोग यशस्वी

या शोधाची अधिक चाचणी घेण्यासाठी, शास्त्रज्ञांनी मानवी पेशी आणि फळांच्या माशांमध्ये सीआयआरबीपी प्रथिनाची व्हेल आवृत्ती आणली. निकालांवरून सुधारित दुरुस्ती दिसून आली आणि फळांच्या माश्या अधिक काळ जगल्या, असे शास्त्रज्ञांनी सांगितले.

### व्ही. शांतारामांच्या भूमिकेत दिसणार सिद्धांत चतुर्वेदी



**मुंबई** : भारतीय चित्रपटातील दिग्गज दिगर्दशक व्ही. शांताराम यांचा बायोपिक तयार होतो आहे. चित्रपटात मुख्य भूमिकेत सिद्धांत चतुर्वेदी दिसणार आहे. शांताराम यांचा मुलगा किरण शांताराम यांनी एका कार्यक्रमात सिद्धांतला सन्मानित करताना त्याला आपल्या वडिलांच्या भूमिकेसाठी 'परफेक्ट चॉइस' असल्याचे म्हटले आहे. वडिलांच्या महान चित्रपट वारशाला आदरांजली देण्यासाठी हा चित्रपट तयार केला जात आहे. त्यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त म्हणजेच १८ नोव्हेंबर २०२६ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याने हा प्रकल्प त्यांच्या कुटुंबासाठी अधिकच खास आहे, असे ते म्हणाले. ■

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, १५ मार्च २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघटनेसाठी चांगल्या विचारांचा आधार आवश्यक असतो. हिंदू विचार हा आपल्या संघटनेचा आधार आहे. हिंदू या शब्दाने धर्म, संस्कृती, इतिहास, तत्त्वज्ञान, समाजरचना इत्यादी जे जे संबोधले जाते ते ते गौरवशाली व अभिमानास्पद आहे. गत काळात त्याचा भरपूर उपहास झाला, परंतु त्याच्या मौलिकतेकडे साऱ्या विचारवंतांचे लक्ष जात आहे.

**मोरोपंत पिंगळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



राष्ट्र सेविका समितीच्या द्वितीय प्रमुख संचालिका वंदनीय ताई आपटे यांचा आज जन्मदिन

# सिलेंडरची चिंता नको

### होर्मुझ खाडीतील अडथळे भारताने केले दूर | ९२ हजार टन एलपीजी घेऊन दोन जहाज रवाना | ऊर्जा सुरक्षेसाठी रशियासोबतही बोलणी सुरू

◆ **नवी दिल्ली, १४ मार्च**

१५ दिवस होऊनही इराण आणि अमेरिका मागे हटण्यास तयार नसल्याने आणि होमुर्झ खाडी रोखून धरल्याने आशियातील देशांमध्ये ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. यावर तोडगा काढत भारताने इराणसोबत चर्चा करून होमुर्झमध्ये अडकलेल्या मालवाहू जहाजांचा मार्ग मोकळा केला आहे. अडकलेल्या एकूण २४ पैकी दोन जहाजांनी धोकादायक होमुर्झ खाडी ओलांडली आहे. शिवालिक आणि नंदादेवी या दोन्ही जहाजांमध्ये ९२ हजार ७०० टन एलपीजी गॅस आहे. तसेच पुढची सोय म्हणून रशियासोबतही इंधन पुरवठ्याबाबत चर्चा सुरू असल्याचे परराष्ट्र खात्याने म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी इराणचे राष्ट्रपती पेश्कियान यांच्यासोबत चर्चा केली होती. तसेच दोन्ही देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनीही संवाद साधला. याचे फलित म्हणजे भारतीय होमुर्झ खाडीत अडकलेल्या जहाजांचा मार्ग मोकळा झाला. ही दोन्ही जहाजे येत्या दोन ते तीन दिवसांत गुजरातच्या कांडला आणि मुंद्रा बंदरात पोहचणार आहेत. त्यामुळे देशात निर्माण झालेली सिलेंडरची टंचाई कमी होण्यास मदत होणार आहे, असे पेट्रोलियम मंत्रालयाच्या सचिव सुजाता शर्मा यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

◀(वृत्तसंस्था)




**'शिवालिक'नंतर 'नंदादेवी' होर्मुझबाहेर**
(पान ३ वर) ▶

### १.७२ लाख भारतीय मायदेशी परतले

संघर्ष सुरू झाल्यापासून खाडी देशांमधून आतापर्यंत १.७२ लाख नागरिक मायदेशी परतले आहेत. तसेच विविध जहाजांमध्ये अडकलेल्या २५३ खलाशांनाही परत आणले. संघर्षात पाच भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला असून एक बेपत्ता आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. ■

### पॅनिक बुकिंग नको

देशात गॅसची टंचाई असल्याच्या अफवा पसरविल्या जात असल्याने नागरिक भीतीने सिलेंडरची आगाऊ बुकिंग करीत आहेत. एरवी देशभरात दररोज ५० लाखांच्या आसपास बुकिंग होत असे पण १३ मार्चला एकाच दिवसी तब्बल ८८.८ लाख सिलेंडरची बुकिंग झाली. त्यामुळे लोकांनी पॅनिक बुकिंग करू नये, असे आवाहन शर्मा यांनी केले. ■

# इराणचे तेल निर्यात केंद्र खाक

- सर्व लष्करी तळे उद्ध्वस्त
- डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा

**वॉशिंग्टन/ तेहरान, १४ मार्च**

अमेरिकन हवाई दलाने इराणचे तेल निर्यात केंद्र आणि अर्थव्यवस्थेचा कणा मानला जाणाऱ्या खार्ग बेटावर बॉम्बवर्षाव केला. या हल्ल्यात इराणचे सर्व महत्त्वाचे लष्करी तळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आणि हे बेट लवकरच ताब्यात घेऊन इराणवर जमिनी मार्गाने कारवाई करणार असल्याचा दावा शनिवारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे.



खार्ग बेटावर केलेल्या कारवाईनंतर इराणला आता शरणागती पत्करण्याशिवाय पर्याय नाही असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे. अमेरिकन सेंट्रल कमांडने मध्यपूर्वेच्या इतिहासातील सर्वात शक्तिशाली हवाई हल्ला केला. आम्ही खार्ग बेटावरील इराणची लष्करी ताकद पूर्णपणे नेस्तनाबूत केली. मात्र, आम्ही तेथील तेलाच्या पायाभूत सुविधांना धक्का लावलेला नाही. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जहाजांची वाहतूक रोखण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या तेल साठ्यांवर हल्ला केला जाईल. इराणकडे अमेरिकेच्या हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करण्याची कोणतीही क्षमता नाही. इराणचे मध्यपूर्वेवर ताबा मिळवण्याचे आणि इस्रायलला संपवण्याचे स्वप्न आता कायमचे धुळीस मिळाले आहे, असेही त्यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये नमूद केले. दुसरीकडे इराणने खार्ग बेटावरी तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला झाल्याची पुष्टी केली, त्यांनी लष्करी तळे उद्ध्वस्त झाल्याच दावा फेटाळून लावला.

# श्रेष्ठ संत-परंपरा भारताला लाभलेली ईश्वरीय देणगी

### रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन | संत रविदासजी यांना ६५० व्या जयंतीनिमित्त आदरांजली

◆ **पट्टीकल्याण (समालखा), १४ मार्च**

संत सद्गुरू रविदासजी यांच्या प्रकट दिनाच्या ६५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांना विनम्र आदरांजली अर्पण करतो. आपली गौरवशाली संत-परंपरा ही ईश्वराकडून भारताला लाभलेली अद्वितीय देणगी आहे, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी शनिवारी केले.

आपल्या इतिहासाच्या प्रदीर्घ प्रवासात, संतांच्या या परंपरेने समाजात केवळ ईश्वरभक्तीची आणि श्रद्धेची ज्योतच प्रज्वलित केली नाही, तर सामाजिक दुष्प्रवृत्ती आणि भेदभाव नष्ट करून एका सुसंवादी सामाजिक व्यवस्थेची उभारणी करण्यासाठीही अथक प्रयत्न केले आहेत. शिवाय, विदेशी सत्ताधीशांनी केलेल्या अत्याचारांविरुद्ध लढा देण्यासाठी त्यांनी समाजाला जागृत आणि सज्ज केले, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले.

संतांच्या या महान परंपरेत संत रविदासजी यांचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचे कृतिशील जीवन आणि त्यांची कार्ये आपल्या सर्वांसाठीच प्रेरणास्रोत ठरतात. गृहस्थाश्रमी असूनही, ते ऐहिक व्यवहारांपासून अलिप्त राहिले; संतांविषयीचा आदर आणि उपेक्षितांची सेवा हा त्यांचा सहज स्वभाव होता. एक अशी वृत्ती जी गहन अध्यात्माने ओतप्रोत भरलेली होती. आपल्या स्वतःच्या जीवनाद्वारे त्यांनी समाजात श्रमाची प्रतिष्ठा तसेच शुद्ध, सदाचारी आणि पारदर्शक आचरणाने महत्त्व पुन्हा स्थापित केले.

संत श्री रविदासजी हे भक्ती-परंपरेतील एक महान संत होते, ज्यांनी समाजात एक नवी चेतना जागृत केली. जन्मावर आधारित उच्च आणि नीच दर्जाचे भेद नाकारून त्यांनी केवळ आचरणालाच श्रेष्ठत्वाचा खरा निकष मानले. समाजाला कठोर रूढी आणि



सामाजिक दुष्प्रवृत्तींपासून मुक्त करण्यात तसेच काळाला सुसंगत सामाजिक बदलांचा स्वीकार करण्यासाठी व कालबाह्य परंपरांचा त्याग करण्यासाठी सामूहिक मानसिकता घडवण्यात त्यांनी ऐतिहासिक भूमिका बजावली. त्यांच्या शिकवणीचे महत्त्व ओळखून, त्यांच्या रचनांचा 'श्री गुरू ग्रंथ साहिब'मध्ये 'शबद' या स्वरूपात समावेश करण्यात आला, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले.

एका सामान्य कौटुंबिक पृष्ठभूमीतून आलेल्या संत श्री रविदासजींची ईश्वरावरील गाढ भक्ती, सेवाभाव आणि समाजाप्रति असलेले निःस्वार्थ प्रेम या गुणांमुळेच समाजातील सर्व स्तरांकडून अगदी काशीच्या विद्वानांकडूनही, त्यांच्या श्रेष्ठत्वाची दखल घेतली गेली. काशी नरेश, झाली राणी आणि मीराबाई यासारख्या राजघराण्यातील व्यक्तींनीही त्यांना आपला गुरू म्हणून स्वीकारले. संत श्री रविदासजी आणि मीराबाई यांच्यातील गुरू-शिष्याचे नाते म्हणजे भक्तीचा निर्गुण (निराकार) आणि सगुण (आकार) या परंपरांचा एक सुंदर संगमच होय. जे लोक जातिभेदावर आधारित भेदभावाचे आचरण करतात, त्यांच्यासाठी हा एक आदर्शवत धडा ठरतो, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले.

मुस्लिम आक्रमकांच्या दहशतीने ग्रासलेल्या त्या अत्यंत कठीण कालखंडात, संत श्री रविदासजींनी भक्तीचा शुद्ध प्रवाह प्रवाहित करून धर्माचे श्रेष्ठत्व प्रतिपादित केले आणि लोकांना धर्माच्या तत्त्वांचे पालन करण्याचा उद्देश केला. सद्गुरू संत श्री रविदासजींना इस्लाममध्ये धर्मांतरित करण्याचे अनेक प्रयत्न झाले. तथापि, त्यांची भक्ती आणि आध्यात्मिक साधना पाहून, जे लोक त्यांना धर्मांतरित करण्याचा प्रयत्न करीत होते, तेच अखेरीस त्यांचे अनुयायी बनले. सध्याच्या काळात, जेव्हा विविध विभाजनवादी शक्ती वर्ग आणि जातीच्या आधारावर जनमानसाला विभाजित करण्याचा प्रयत्न करीत आहेत, तेव्हा आपण सर्वांनीच आदरणीय संत श्री रविदासजी यांच्या जीवन आणि संदेशाचे सार आत्मसात करणे तसेच आपल्या राष्ट्राच्या व समाजाच्या एकता आणि अखंडतेसाठी कार्य करण्याचा संकल्प करणे अत्यंत अनिवार्य आहे, असे दत्तात्रेय होसबळे यांनी सांगितले.

◀(वृत्तसंस्था)

**दहा कोटी कुटुंबांसोबत संपर्क**
(वृत्त पान ६ वर)






रोखठोक

दिनेश गुणे

# स्वार्थ, सहकार्य आणि संस्कृतीचा संघर्ष

कोणत्याही एखाद्या जागतिक अपरिहार्य परिस्थितीमुळे उद्‌भवणाऱ्या सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिक संघर्षाच्या काळात कसोटीच्या अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. ही कसोटी राज्यकर्त्या सरकारांची तर असतेच, पण अशा प्रत्येक कसोटीच्या क्षणी केवळ सरकारकडे बोट दाखवून बघ्याची भूमिका घेणे समाजाकडूनही अपेक्षित नसते. याआधी भारतासमोर अनेक संकटांच्या रूपाने अशीच अनेक आव्हाने उभी राहिली, तेव्हा समाजाने संघटितपणे समस्यांशी संघर्ष केला. कोणत्याही व्यापक समस्येचा सामना करावयाचा असेल, तर एकाकीपणे ते शक्य होत नाही. कारण अशा समस्या कोणा एका व्यक्तीपुरत्या, सरकारपुरत्या मर्यादित नसतात. संपूर्ण समाजाला त्यांचे चटके सोसावे लागतात आणि अशा प्रसंगी अन्य सामाजिक किंवा सांस्कृतिक वाद विसरून सामूहिकपणे त्यांना सामोरे जावेच लागते. किंबहुना, अशा प्रसंगात समाजाच्या संघटित शक्तीची खरी परीक्षा होत असते. सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या दरम्यान सुरू असलेल्या भीषण संहारक युद्धाचे परिणाम संपूर्ण जगाला दिसू लागले आहेत. जगाच्या इंधनाची गरज भागविण्यात मोठा वाटा असलेल्या इराणने इंधनपुरवठ्याबाबत उभ्या जगाला वेठीस धरण्याच्या धोरणातून अमेरिका-इस्रायलवर जागतिक दबाव आणण्याची नीती आखल्याचे दिसत आहे. अशा काळात, भारतामध्ये उद्‌भवलेली स्थिती काहीशी संभ्रमाची दिसते. स्वयंपाकाचा गॅस आणि इंधनाचे तेल पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून त्याचा पुरेसा साठादेखील आहे, अशी ग्वाही केंद्र सरकार देत असतानाही, गावोगावी गॅस सिलेंडरची टंचाई, महागाई, काळाबाजार आदींमुळे ग्राहकांची वणवण सुरू असलेली दिसते. कोणत्याही सार्वत्रिक संकटाच्या काळात स्वार्थ साधावयाचा की सहकार्यातून समस्येशी सामना करावयाचा यावर समाजाची संस्कृती दिसत असते. भारताने सहकार्याचे दर्शन घडवून अनेक समस्यांशी सामना केल्याने, हीच समाजाची संस्कृती असल्याचे वारंवार उघडही झाले आहे. आताच्या परिस्थितीतही, समाजाकडून तेच अपेक्षित आहे आणि समाजाची मानसिकतादेखील तशीच आहे. तरीही, निव्वळ राजकीय स्वार्थापायी संभ्रम माजविण्याचे प्रयत्न काही राजकीय पक्ष आणि त्यांचे पाठीराखे करत असतील, तर तो सामाजिक संस्कृतीचा आणि सहकार्याच्या परंपरेचा पराभव ठरेल. तसे व्हावयास नको. कारण संस्कृती, सहकार्य आणि स्वार्थ यांच्यातील या संघर्षाच्या क्षणी समाजाची भूमिका महत्त्वाची ठरते.

देशात एलपीजी गॅस किंवा पेट्रोलियम उत्पादनांचा तुटवडा नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारकडून वारंवार दिली जात आहे. या उत्पादनांचे पुरेसे साठे उपलब्ध असल्याचे केंद्र सरकारकडूनही सांगितले जाते. मात्र वास्तवात अनेक शहरांत आणि गावांत ग्राहकांना गॅस सिलेंडरसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. नोंदणी केल्यानंतर सिलेंडर उशिरा मिळणे, वितरकांकडे स्टॉक संपल्याची माहिती देणे किंवा वितरणासाठी विलंब होणे अशा तक्रारी सर्वत्र ऐकू येत आहेत.

जर देशात गॅसचा तुटवडा नाही, तर ग्राहकांना टंचाई का जाणवते, या प्रश्नाचे उत्तर शोधताना उत्पादन, आयात, वितरण व्यवस्था आणि स्थानिक पातळीवरील व्यवस्थापन या सर्व बाबींकडे पाहावे लागते. भारतातील एलपीजी पुरवठा ही अत्यंत मोठी आणि गुंतागुंतीची यंत्रणा आहे. रिफायनरी किंवा आयात बंदरांमधून गॅस बॉटलिंग प्लांटमध्ये पोहोचतो, तेथून सिलेंडर भरून ते वितरकांकडे पाठवले जातात आणि शेवटी ग्राहकांच्या घरापर्यंत पोहोचतात. या साखळीतील कोणत्याही टप्प्यावर अडथळा निर्माण झाला, तर स्थानिक पातळीवर टंचाईची भावना निर्माण होते. भारत 'एलपीजी'च्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून आहे. देशातील एकूण वापरापैकी जवळपास दोनतृतीयांश गॅस परदेशातून येतो. जागतिक बाजारातील चढ-उतार, जहाजांच्या हालचालीतील विलंब किंवा आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील अडथळे यांचा परिणाम कधीकधी स्थानिक पुरवठ्यावर होतो. मात्र अशा परिस्थितीतही देशाच्या पातळीवर साठे पुरेसे असतात. त्यामुळे सरकार 'तुटवडा नाही' असे सांगते, परंतु काही प्रदेशांमध्ये वितरणात अडथळे निर्माण होऊ शकतात. मागणीतील अचानक वाढ हे यामागील एक महत्त्वाचे कारण असते. सणासुदीचा काळ, लग्नसराईचा हंगाम किंवा सध्या सर्वत्र दिसत असलेल्या युद्धस्थितीमुळे निर्माण झालेल्या मानसिक दबावामुळे घरगुती वापरात अचानक वाढ झाली, तर काही दिवसांसाठी मागणी आणि पुरवठा यामध्ये तफावत निर्माण होते. विशेषतः शहरांमध्ये किंवा वाढत्या उपनगरांमध्ये लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने वितरण व्यवस्थेवर ताण येतो. वितरकांकडे मर्यादित साठा असतो; त्यामुळे मागणी वाढली की काही काळ टंचाई जाणवते. काही वेळा कृत्रिम टंचाईची शक्यताही नाकारता येत नाही. घरगुती वापरासाठी असलेले सिलेंडर व्यावसायिक वापरासाठी वळवले जाणे, साठेबाजी किंवा काळाबाजार यांसारख्या प्रकारांमुळे ग्राहकांना त्रास सहन करावा लागतो. प्रशासनाने वेळोवेळी अशा प्रकारांवर कारवाई केली असली, तरी वितरण व्यवस्थेतील पारदर्शकता अजूनही पूर्णपणे प्रस्थापित झालेली नाही.

भारतात अशा प्रकारची परिस्थिती यापूर्वीही दिसून आली आहे. २०१३- १४ च्या काळात घरगुती गॅस सिलेंडरवरील अनुदान मर्यादित करण्याच्या निर्णयानंतर अनेक भागांत सिलेंडर मिळण्यास विलंब होत होता. त्या वेळी नोंदणीनंतर दीर्घ प्रतीक्षा, वितरकांकडे पुरेसा साठा नसणे आणि काळाबाजाराच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर झाल्या होत्या. त्यानंतर वितरण प्रणाली सुधारण्यासाठी काही उपाययोजना करण्यात आल्या. नंतर कोविड महामारीच्या काळातही काही शहरांमध्ये अशीच स्थिती निर्माण झाली होती. टाळेबंदीमुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आणि घरगुती वापर अचानक वाढला. परिणामी काही दिवस सिलेंडर पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले. तथापि प्रशासन आणि तेल कंपन्यांनी समन्वय साधून ही परिस्थिती लवकर नियंत्रणात आणली. आजच्या परिस्थितीत मात्र समस्या थोडी वेगळी आहे. देशातील



ऊर्जा गरजा झपाट्याने वाढत आहेत. ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर एलपीजी जोडण्या उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे वितरण व्यवस्थेवर पूर्वीपेक्षा अधिक दबाव आहे. नवीन ग्राहक वाढले, तर त्या वेगाने बॉटलिंग प्लांट, वाहतूक व्यवस्था आणि वितरकांचे जाळे यांचा विस्तार व्हावयास हवा. तो तसा नसेल, तर काही भागांत तात्पुरती टंचाई निर्माण होते. म्हणून, वितरण साखळी अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक असणे गरजेचे असते. बॉटलिंग प्लांटची क्षमता वाढवणे, वाहतुकीसाठी स्वतंत्र व्यवस्था विकसित करणे आणि वितरकांचे जाळे मजबूत करणे, डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून सिलेंडरचा पुरवठा आणि साठा याबाबत ग्राहकांना अचूक माहिती मिळेल, अशी व्यवस्था निर्माण करणेही महत्त्वाचे आहे. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने दीर्घकालीन उपाययोजनाची गरजही या निमित्ताने स्पष्ट झाली आहे. एलपीजी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादन वाढवणे, पर्यायी इंधनांचा वापर प्रोत्साहित करणे आणि स्वच्छ ऊर्जेच्या नव्या स्रोतांकडे वळणे या बाबी भविष्यासाठी महत्त्वाच्या ठरणार आहेत.

सद्यःस्थितीत, गॅसचा तुटवडा नसतानाही ग्राहकांना जाणवणारी टंचाई हे मुख्यतः व्यवस्थेतील त्रुटींचे लक्षण असावे. पुरवठा पुरेसा असूनही वितरणात गोंधळ निर्माण झाला, तर नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे ही समस्या केवळ आकडेवारीच्या आधारावर नाकारण्यापेक्षा तिच्या मूळ कारणांकडे पाहून दीर्घकालीन उपाय शोधणे हीच खरी प्रशासनाची कसोटी ठरणार आहे. कारण, अन्नधान्य, इंधन, गॅस किंवा इतर जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली की सर्वप्रथम शासनव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचा प्रश्न उभा राहतो. सरकारने योग्य नियोजन केले का, पुरवठा साखळी व्यवस्थित आहे का, साठेबाजीवर नियंत्रण आहे का, अशा अनेक प्रश्नांची चर्चा सुरू होते. ही चर्चा योग्यच असते, कारण जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर शासनावरच असते. मात्र प्रत्येक संकट समाजालाही एक आरसा दाखवत असते. टंचाईच्या काळात समाजाचे वर्तन कसे असते, यावरही परिस्थिती किती गंभीर बनेल हे अवलंबून असते. म्हणूनच अशा प्रसंगी ही केवळ प्रशासनाची नव्हे तर समाजाचीही कसोटी ठरते. कारण कृत्रिम टंचाई किंवा काळाबाजार ही केवळ प्रशासनातील त्रुटीमुळे निर्माण झालेली समस्या नसते. अनेकदा समाजातील काही घटक त्यातून फायदा मिळवण्याचा प्रयत्न करतात. एखाद्या वस्तूची मागणी वाढली की काही व्यापारी किंवा वितरक साठेबाजी करतात. पुरवठा कमी असल्याचा आभास निर्माण करून ते वस्तू जास्त किमतीत विकण्याचा प्रयत्न करतात. या प्रक्रियेत सामान्य ग्राहक अडचणीत येतो. अनेकदा, ही परिस्थिती टिकून राहण्यामागे ग्राहकांचेही काही प्रमाणात थेट किंवा अप्रत्यक्ष योगदान असते. टंचाईची बातमी पसरताच अनेक लोक गरजेपेक्षा जास्त वस्तू साठवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. 'पुढे काय होईल सांगता येत नाही' या भीतीने ते एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात. परिणामी बाजारातील उपलब्ध साठा झपाट्याने कमी होतो. जेव्हा सर्व जण अशाच पद्धतीने वागतात, तेव्हा प्रत्यक्षात पुरवठा पुरेसा असतानाही टंचाईचे चित्र निर्माण होते. म्हणजेच भीती आणि असुरक्षिततेची भावना स्वतःच टंचाईला कारणीभूत ठरते. काळाबाजाराच्या बाबतीतही असेच दिसून येते. व्यापाऱ्यांनी जादा दराने वस्तू विक्रीस काढल्या, तर ग्राहकांनी त्या विकत घेऊ नयेत, ही अपेक्षा स्वाभाविक आहे. पण प्रत्यक्षात अनेकदा ग्राहक गरजेपोटी किंवा घाईत जादा किंमत देण्यास तयार होतात. त्यामुळे काळाबाजाराला प्रोत्साहन मिळते. जादा दराने विक्री करूनही ग्राहक मिळत असतील, तर साठेबाजी करणाऱ्यांना आळा बसण्याचे कारण राहत नाही. त्यामुळे समाजातील ग्राहकवर्गही या प्रक्रियेत अप्रत्यक्षपणे सहभागी ठरतो.

अशा परिस्थितीत समाजाची समंजस आणि संयमी भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. ग्राहकांची सामूहिक भूमिका बाजारव्यवस्थेवर मोठा परिणाम करू शकते. लोकशाही व्यवस्थेत नागरिक हे केवळ 'ग्राहक' नसतात; ते जबाबदार घटकही असतात. संकटकाळात सामाजिक संवेदनशीलता अधिक महत्त्वाची ठरते. समाजातील काही घटक आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. त्यांच्यासाठी जीवनावश्यक वस्तू मिळवणे अधिक कठीण असते. त्यामुळे सक्षम घटकांनी गरजेपेक्षा जास्त साठा करण्यापेक्षा इतरांचाही विचार करणे ही सामाजिक जबाबदारी आहे. शासनाने कठोर नियंत्रण, पारदर्शक पुरवठा व्यवस्था आणि प्रभावी कारवाई केली पाहिजे; पण त्याचबरोबर समाजानेही संयम, प्रामाणिकता आणि सहकार्याची भूमिका घेतली तरच अशा संकटांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते.

म्हणूनच टंचाईचा काळ हा केवळ पुरवठा व्यवस्थेची परीक्षा नसतो; तो समाजाच्या संस्कारांची आणि सामूहिक जबाबदारीचीही कसोटी असतो. संकटाच्या क्षणी आपण स्वार्थाचा मार्ग निवडतो की सामाजिक उत्तरदायित्वाचा यावरच त्या समाजाची खरी ओळख ठरते. भाषा, धर्म, संस्कृती, आर्थिक स्तर आणि जीवनशैली यांच्या वैविध्यामुळेच भारतीय समाजात परस्परविरोधी प्रवृत्ती एकाच वेळी दिसतात. एका बाजूला सहकार्य, परस्पर मदत आणि सामाजिक संवेदनशीलता दिसते; तर दुसऱ्या बाजूला स्वार्थ, स्पर्धा आणि वैयक्तिक हिताला प्राधान्य देणारी मानसिकताही दिसून येते. त्यामुळेच संकटाच्या काळात भारतीय समाज अनेकदा स्वार्थ आणि सहकार्य दोन प्रवृत्तींच्या संघर्षातून जाताना दिसतो.

भारतीय समाजजीवनात 'वसुधैव कुटुंबकम्' किंवा 'सर्वे भवन्तु सुखिनः' यासारख्या संकल्पना रुजलेल्या आहेत. गावपातळीवरील सहकार, उत्सव-परंपरा आणि सामाजिक बांधिलकी यांमधून परस्पर मदतीची भावना व्यक्त होत आलेली आहे. आपत्तीच्या प्रसंगी ही भावना अधिक ठळकपणे दिसते. मात्र याच समाजात, संकटाच्या काळात वैयक्तिक फायद्यासाठी परिस्थितीचा गैरफायदा घेणारा वर्गही दिसतो. जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी, जादा दराने विक्री, काळाबाजार अशा घटना अधूनमधून घडत असतात. या विरोधाभासामागेही, प्रचंड लोकसंख्या आणि आर्थिक विषमतेसारखी कारणे आहेतच! भविष्यातील असुरक्षिततेची व अनिश्चिततेची भीती वाढली की स्वार्थाची प्रवृत्ती अधिक आक्रमक होते. आता तर, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अफवांचा वेगाने होणारा प्रसार ही एक मोठी समस्या बनली आहे. अनेकदा या अफवांमुळे घबराट निर्माण होते आणि लोक अनावश्यक खरेदी किंवा साठेबाजी करतात. त्यामुळे परिस्थिती आणखी बिघडते.

तथापि या सर्व विरोधाभासांनंतरही भारतीय समाजात सकारात्मक बदलांची चिन्हे दिसत आहेत. शिक्षणाचा प्रसार, नागरिकांमधील जागरूकता आणि सामाजिक जबाबदारीची भावना वाढत असल्याने अनेक लोक अशा प्रसंगी संयमाने वागण्याचा प्रयत्न करतात. काही ठिकाणी नागरिक संघटना आणि स्वयंसेवी गट प्रशासनाला मदत करून पुरवठा व्यवस्थेतील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच समाजातील सहकार्याची प्रवृत्ती पूर्णपणे दुर्बल झालेली नाही. म्हणूनच, सध्याच्या कसोटीच्या प्रसंगात या एक महत्त्वाचा सामाजिक प्रश्न उग्र होताना दिसत आहे. समाजात स्वार्थ आणि सहकार्य या दोन्ही प्रवृत्ती असतील, तर त्यांच्या संघर्षाच्या या काळात, कोणती प्रवृत्ती अधिक प्रभावी ठरणार, याचे उत्तर समाजातील सामूहिक संस्कारांवर अवलंबून असते. नागरिकांनी संयम, प्रामाणिकता आणि सामाजिक उत्तरदायित्व या मूल्यांना प्राधान्य दिले, तर सहकार्याची प्रवृत्ती मजबूत होईल. उलट वैयक्तिक फायद्याला सर्वोच्च महत्त्व दिले, तर स्वार्थी प्रवृत्ती बळावतील. म्हणूनच समाजाच्या भविष्यासाठी केवळ आर्थिक विकास पुरेसा नाही. सामाजिक मूल्यांची जपणूकही तितकीच आवश्यक आहे. नागरिकांमध्ये जबाबदार वर्तनाची जाणीव निर्माण करणे, अफवांपासून सावध राहणे आणि संकटकाळात एकमेकांना मदत करणे हीच खरी सामाजिक प्रगतीची चिन्हे आहेत. संकटाच्या क्षणी आपण कोणती भूमिका निवडतो, यावर त्या समाजाचे नैतिक सामर्थ्य ठरते. म्हणूनच प्रत्येक संकट हा समाजाला स्वतःकडे पाहण्याचा आणि आपली मूल्ये तपासण्याचा एक महत्त्वाचा क्षण ठरतो.

dineshgune@gmail.com

---

रविवारची पत्रे

## जग अस्थिरतेच्या भोवऱ्यात

मध्यपूर्वेच्या वाळवंटात पेटलेल्या युद्धाचा आगडोंब आता प्रादेशिक संघर्षापुरताच मर्यादित न राहता ती जागतिक अर्थकारण, ऊर्जा सुरक्षा आणि महासत्तांच्या प्रतिष्ठेचा झाला आहे. अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर उफाळलेला संताप आता आखाती देशांच्या दारात पोहोचला आहे. होर्मूझची सामुद्रधुनी बंद करण्याची इराणच्या क्रांतिकारी रक्षकांची घोषणा ही केवळ धमकी नसून जगाची आर्थिक कोंडी करण्याची चाल आहे. जगातील बहुतांश देशांना



कच्च्या तेलाचा पुरवठा ज्या अरुंद समुद्रमार्गातून होतो तो होर्मूझ मार्ग थांबला तर त्याचे मोठे परिणाम आखातापुरते मर्यादित न राहता आशियाई अर्थव्यवस्था, विशेषतः चीन, भारत, जपान या प्रमुख देशांना मोठा फटका बसू शकतो. युद्धाच्या तीन दिवसांतच कच्च्या तेलाच्या किमती सहा टक्क्यांहून अधिक वाढल्या आहेत. नैसर्गिक वायूच्या दराने पन्नास टक्क्यांपर्यंत उसळी घेतली आहे. महागाईचा भडका, इंधनटंचाई आणि शेअर बाजारातील मोठी घसरण ही केवळ सुरुवात असू शकते.

इराणने थेट अमेरिका किंवा इस्रायलऐवजी आखाती देशांतील कुवेत, कतार, बहरीन, यूएई, सौदी अरेबिया या देशांच्या आर्थिक धमन्यांवर प्रहार करून अमेरिकेवर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण ही चाल दुधारी तलवार ठरू शकते. कारण या हल्ल्यांमुळे गल्फ को-ऑपरेशन कौन्सिलमधील देश अमेरिकेकडे अधिक झुकू लागले आहेत. सामूहिक संरक्षणाच्या नावाखाली नव्या आघाड्या तयार होत आहेत. तणाव शिगेला पोहोचत आहे. जग आधीच अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकले आहे. रशिया-युक्रेन युद्ध अजूनही थांबलेले नाही. आशियात सीमावाद धगधगत आहेत. गाझा पट्टीतील संघर्ष ताजा आहे. अशावेळी आखातातील ही ज्वाला तिसऱ्या महायुद्धाची चाहूल देत आहे.

महासत्तांच्या अहंकाराच्या लढाईत सामान्य नागरिकांचे प्राण, अर्थव्यवस्थांची कंबर आणि भविष्यातील पिढ्यांचे स्वप्न तुटण्याची भीती आहे. तेलसाठ्यांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा अमेरिकेववर आरोप होत असताना, इराणही आंतरराष्ट्रीय जलमार्ग बंद करण्याची धमकी देऊन जागतिक कायद्याला आव्हान देत आहे. जर हा मार्ग खरोखर बंद झाला, तर केवळ तेल नव्हे तर संपूर्ण जागतिक पुरवठा साखळीच विस्कळीत होईल. त्याचे मोठे पडसाद भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेत तीव्रतेने उमटतील. यामध्ये भारताची भूमिका महत्त्वाची ठरते. पारंपरिक तटस्थेचा मार्ग स्वीकारत शांततेचे आवाहन करणे आणि युद्धजन्य प्रदेशात अडकलेल्या भारतीयांना सुरक्षित परत आणणे या जबाबदाऱ्या कसोटीच्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखविलेली तत्परता दिलासादायक असली, तरी ऊर्जा सुरक्षेसाठी पर्यायी मार्ग, इंधनाचा साठा करणे आणि नूतनीकरणीय ऊर्जेकडे झपाट्याने वळणे ही काळाची गरज ठरते. युद्ध कोण जिंकणार हा प्रश्न दुय्यम आहे, कारण हरले जाणार आहे ते मानवतेचे भविष्य, महायुद्धे जिंकली जातात रणांगणांवर, पण त्यांची किंमत भरावी लागते पिढ्यानपिढ्या. होर्मूझच्या लाटीवरून उठलेली ही धग जर वेळीच शांत झाली नाही, तर जग अंधाराकडे वाटचाल करेल. आज गरज आहे ती अहंकार नव्हे, तर संवादाची, क्षेपणास्त्राची नव्हे, तर कूटनीतीची. अन्यथा पेटलेल्या या ज्वालेत केवळ आखात नव्हे संपूर्ण जग भस्मसात होण्याची भीती नाकारता येणार नाही.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## संवाद हा नात्याचा पाया

नातेसंबंध म्हणजे दोन व्यक्तींमधील बंधन. हे बंधन प्रेम, आपुलकी, जबाबदारी, अपेक्षा आणि समर्पण यावर उभं असतं. पण या सगळ्याच्या मुळाशी असणारा संवाद हा नात्याचा पाया आहे. संवादाच्या अभावामुळे कित्येक सुंदर नाती विस्कटून जातात तर संवाद योग्य पद्धतीने झाल्यास कोणत्याही अडचणींवर मात करता येते. कोणत्याही नात्यात विश्वास टिकवण्यासाठी आणि एकमेकांना समजून घेण्यासाठी संवाद आवश्यक असतो. जेव्हा पती व पत्नी ही माणसं प्रामाणिक आणि गंभीरपणे संवाद साधू शकतात, तेव्हा ते एकमेकांचे सर्वोत्तम मानसशास्त्रज्ञ ठरू शकतात. कित्येक वेळा लोक नातेसंबंधांच्या गुंतागुंतीबद्दल तक्रार करतात. खरा प्रश्न हा असतो की आपण एकमेकांशी स्पष्ट आणि मोकळेपणाने बोलतो का? संवादाचा अर्थ फक्त बोलणे एवढाच नसतो तर ऐकणे, समजून घेणे, भावनांचा सन्मान करणे आणि उत्तरदायित्व स्वीकारणे तितकेच महत्त्वाचे असते. एकमेकांना वेळ न देणे, संवाद टाळणे, अपुऱ्या माहितीवरून निष्कर्ष काढणे हे सर्व नात्यातील कटूता वाढवते. अनेकदा लोक भांडण करताना आरोप-प्रत्यारोप करतात. पण जर दोघांनी शांतपणे एकमेकांचे म्हणणे ऐकले, तर हा दुरावा मिटू शकतो. कधी कधी लोक नात्यातील संवाद टाळतात. त्यांना वाटतं की, जर मी खरं बोललो तर समोरचा दुखावला जाईल; पण हे चुकीचे आहे. नात्यात प्रामाणिकता हवी असेल, तर आपण आपल्या भावना व्यक्त करायला पाहिजे. आपल्याला काय हवे आहे, हे स्पष्ट सांगितलं पाहिजे आणि आपण समोरच्याकडून काय अपेक्षा करता हे स्पष्ट सांगितलं पाहिजे. आपल्या मनातील खऱ्या भावना लपवून न ठेवता बोललं पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीला काही त्रास होत असेल, पण ती ते बोलत नसेल तर समोरचा कसा समजून घेणार? नात्यात अनेक समस्या असू शकतात. विश्वासघात, मतभेद, आर्थिक प्रश्न, मानसिक तणाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या इत्यादी. त्यातून कधीही परिस्थिती चिघळू शकते. भांडणाच्या वेळी किंवा तणावाखाली असताना संवाद करणे टाळलं तर पुढे संवाद टिकून राहतो. वैयक्तिक आयुष्यात पती-पत्नी दोघंही अनेकदा भांडतात. म्हणून प्रत्येक वेळेस वाद झाला, भांडणं झालं तरी बोलणं टाळायचं नाही. भांडणाच्या वेळी विषय वेगळं वळण घेऊन कायमचा संवाद संपवू शकतो. त्यामुळे जेव्हा कधी वातावरण निवळेल तेव्हा शांततेत संवाद केल्यास तो अधिक प्रभावी ठरतो. विश्वास हा नात्याचा गाभा आहे. विश्वासघात झाल्यास संवाद हा तो दुरुस्त करण्याचा मार्ग असतो. संवादाच्या माध्यमातून त्या अंतरावर विजय मिळविता येतो. नातेसंबंध टिकवण्यासाठी महागड्या भेटवस्तू, मोठ्या योजना किंवा अविश्रांत प्रयत्न करण्याची गरज नसते. गरज असते ती फक्त प्रामाणिक आणि खुले संभाषण करण्याची. त्यामुळे कितीही वादविवाद झाले तरी संवाद शक्य तितका जोडून ठेवायचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा संवाद योग्यरीत्या होतो, तेव्हा कोणताही वाद मिटू शकतो. नातं टिकू शकतं, फुलू शकतं आणि अधिक सशक्त बनू शकतं. त्यामुळे संवादाला पर्याय नाही. यासाठी बोलत राहा, हसत राहा आणि नातं जपत राहा.

**सुनील शिरपुरे**/७०५७१८५४७९

## श्रीलंकेची अजब दुनिया

श्रीलंका म्हणजे पूर्वीचे सिलोन. सुंदरता काय वर्णावी या जगाची. एखादा चांगला देश पाहण्याची संधी मिळणे हा एक मोठाच योग असतो. संधी चालून आली अन् श्रीलंकेची सफर झाली; तीही तेथे त्सुनामीसारखं भयंकर वादळ आले त्या दरम्यान. पाहायला सुरुवात केली तेव्हा तेथे वादळ नव्हतं; भरपूर पाऊस मात्र होता. अगदी बेटावरचा देश, पण हवामान मात्र सुसह्य व आल्हाददायक. तिन्ही बाजूंनी समुद्र वेढलेला तरीही निश्चिंत जीवन जगणारी माणसे. श्रीलंकेची लोकसंख्या अवघी दोन-सव्वादोन कोटी. स्वच्छता म्हणावी तर नंबर एकची. गॉल बीचवर गेलो. समुद्राच्या किनाऱ्यावर लॉन आणि रस्त्याच्या पलीकडे मोठ्या टोले जंग इमारती! मन मोहून जावं तसं काहीसं झालं; त्यात खूप मस्ती केली. छान गाणी म्हटली



व आनंदाने बेहोश होऊन नाचलो. डिसेंबरचा महिना असल्याने अगदी लेटेस्ट सुंदर पतंगी उडत होत्या. कँडी या गावी एलिफंट राईड केली. स्पाईस गार्डनमधील प्रत्येक शारीरिक दुखण्यावर मुळापासून बरी करणारी औषधे समजून घेतली. औषधाच्या बाबतीत आमच्या ग्रुपमधील ८४ वर्षांचे काका आदर्श ठरले. आत्तापर्यंतच्या वयात त्यांनी कुठल्याही गोळ्या-औषधं खाल्लेली नव्हती, हे ऐकून साऱ्यांनी तोंडात बोटे घातली. तेथील संस्कृतीचं आणि लोकनृत्याचं प्रतीक असलेले कल्चरल डान्सिंग शॉर्टस डोळे भरून बघितले. त्यातच शुद्ध भक्तीचे प्रतीक पंचमुखी अंजनेय टेम्पल आणि हनुमान मंदिर तसेच रामाने स्थापित केलेले दोन ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. मन अतिशय प्रसन्न झाले. रावणाचा महाल खूपच उंचावर होता. त्याचे आता अवशेष नसल्याचे कळले. परंतु त्या पहाडावर चढण्याचा मार्ग बघितला आणि त्याचे विमान ठेवण्याचे हेलिपॅडसुद्धा बघितले. चहा फॅक्टरीमधून चहा घेण्याचा मोह आवरला नाही. बुद्धाच्या पाच केव्स बघितल्या. ध्यानस्थ मूर्ती आणि विष्णूसहित बुद्धाचे दर्शन घेतले. देशातील लोकांची सौंदर्य दृष्टी वाखाणण्यासारखी वाटली. त्याचबरोबर स्वच्छता, कुठेही काडी-कचऱ्याचा लवलेश नाही. विड्याच्या पानांच्या वेलीच वेली, परंतु पान खाऊन थुंकण्याची एकही पिचकारी दिसली नाही. निसर्ग अगदी भरभरून सुंदरता प्रदान करतो आहे, पण त्याची कदरही पदोपदी केल्याची जाणीव होते. रस्ते अत्यंत मनमोहक सुंदर कळ्या डांबरी रेषा जणू ओढलेल्या यावर पायी चालणाऱ्यांसाठी भरपूर जागा. जीवन सुरक्षित असल्याचा अनुभव. अजिबात प्रदूषण नाही. दृष्टी सुदृढ व सुंदर असली म्हणजे खऱ्या सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटता येतो, असेच येथे जाणवले.

**अचला तांबोळी**/९८९०६१७५३९

## आरसा... मानवी मनाचा

आरसा नसता तर माणसाचे काय झाले असते? माणसाने त्याचे तोंड कशात न्याहाळले असते? आपण सुंदर दिसतो की कसे? माणसाला कळलेच नसते. या सर्वांवर उपाय म्हणून मानवाने आरशाचा शोध लावला. प्रत्येकाला आपल्या व्यक्तिमत्त्वाचे खरे प्रतिबिंब दिसावे, समजावे, आकळता यावे यासाठी. आरसा कधीच कोणतीही गोष्ट लपवत नाही. जे काही समोर उभे असेल ते अगदी हुबेहूब तसेच दाखवतो. ते चांगले आहे की वाईट आहे, सुंदर आहे की कुरूप आहे, आकर्षक आहे की बेढब आहे, आवडते आहे की नावडते आहे, याचा कोणताही विचार आरसा करत नाही. जे आहे तसेच दाखवणे हेच त्याचे काम आहे; जे तो टाळू म्हटले तरीही टाळू शकत नाही. आरसा लहान असो की मोठा, आरशाच्या काचेचा एखादा छोटा तुकडा का असेना, त्यात जेवढे दिसते तेवढे तो सही सही दाखवतो. मिठाचा किंवा साखरेचा एखादा छोटा कण जसा आपली चव सोडत नाही तसेच आरसा आपला गुणधर्म सोडत नाही. व्यक्तिमत्त्व आकर्षक असणे हे चांगलेच आहे; त्याचबरोबर आपले मन स्वच्छ असणे, साफ असणे, निर्मळ असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. किंबहुना व्यक्तिमत्त्वापेक्षाही आपले मन स्वच्छ असणे जास्त महत्त्वाचे आहे. 'नाही निर्मळ जीवन काय करील साबण?' असे जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांनी सांगितलेच आहे. आरसा आपले व्यक्तित्व तर दाखवतो; पण आपले मन दाखवू शकत नाही. मानवी मनाचा अभ्यास करण्यासाठी अनेक विद्वानांनी प्रयत्न केले आहेत, संत-महात्म्यांनी त्यांचे विचार सांगितले; पण आजही मानवी मनाच्या बाबत आपण तितकेच अंधारात आहोत. म्हणून यावर एकच उपाय म्हणजे आपल्या मनाचा आरसा! हा आरसा कधीच भंगत नाही, त्याचा पारा कधीही उडत नाही आणि तोही कधीच खोटे दर्शन देत नाही. काचेच्या आरशात बघणे महत्त्वाचे आहेच; त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे आपल्या मनाच्या आरशात निरखून बघणे. आपण आपला चेहरा आरशात बघू तेव्हा आपल्याला आपल्याबद्दल लाज वाटायला नको, एवढी एकच गोष्ट प्रत्येकाने लक्षात ठेवली तर जगात सुख-समाधान-शांतता-विश्वास-प्रेम नांदायला वेळ लागणार नाही. चित्रपट गीतांमध्येही आरशाचे यथार्थ वर्णन आलेलेच आहे- 'तोरा मन दर्पन कहलायें, भले-बुरे सारे कर्मों को देखे और दिखाये...'

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## न पचणारे सत्य

हल्ली शनिवार, रविवार आला की बाहेर गर्दीत वाढ झालेली लक्षात येते. शनिवार संध्याकाळपासूनच रेस्टॉरेंट्स, मॉल्स, स्ट्रीट फूड स्टॉलजवळ माणसांचे थवे उभे दिसतात. प्राईम टाईमला रेस्टॉरेंटसमध्ये लोक आपला नंबर येण्याची वाट बघत असतात. त्यात सगळ्या वयोगटातले लोक असतात. हल्ली सगळ्यांना एका ठिकाणी भेटण्याची सोय होते म्हणून हा एक उत्तम उपाय दिसून येतो. कुणाच्या घरी भेटायचे म्हणजे जागेचा प्रश्न पडतो आणि यजमानांना अतिरिक्त कामाचा भार पडतो. म्हणून हा पर्याय निवडला जातो आणि यात वावगे काही नाही. परंतु विषय त्या पलीकडचा आहे. कुठल्याही बऱ्यापैकी हॉटेलमध्ये गेल्यावर तिथल्या किमती पण बऱ्यापैकी महाग असतात. साधी पाणीपुरी देखील ६०-७० रुपयांची असते. कॅफेत गेल्यावर दोघांचे हजार रुपयांचे सहज बिल येते. त्यात असे दिसून येते की बरेच लोक कुठेही बाहेर खाण्यासाठी गेले असता अन्न टाकून निघून जातात. ते बघून जीव हळहळतो.

मध्ये एका ठिकाणी जाण्याचा योग आला. तेव्हा आमच्या आधीच्या लोकांनी छोले भटुरे, डोसा, सिझलर असे बरेच प्रकार मागवले होते. कितीतरी लोकांनी त्यातले अर्धे अन्न तसेच टाकून दिले होते. बरे, हे आपल्यासारखेच मध्यमवर्गीय होते जे म्हणजे आपणही कांदा, कोथिंबिरीचे भाव गगनाला भिडले, कंबर मोडली अशा बोंबा ठोकतात.

एका ओळखीच्या मेसच्या बाई तक्रार करत होत्या विद्यार्थ्यांना डबा देते तर आठवड्यातून तीन वेळा डबा जसाच्या तसा परत येतो आणि कचऱ्याच्या टोपलीत जातो. मोठमोठ्या कॉफी शॉपमध्ये पाचशे ते सातशे रुपयांची कॉफी अर्धवट टाकून लोक निघून जातात. पाचशे रुपयातले तीनशे रुपये आपण कचऱ्यात टाकले हे त्यांच्या गावीही नसते. काही लोकांची मानसिकता अन्न टाकण्याची असते असे बघण्यात येते. काही वेळा ७-८ लोकांसाठी किती अन्न मागवावे याचा अंदाज न आल्याने आठ प्रकारचे अन्न मागवले जाते आणि अर्धे टाकून दिले जाते. तरी बरं आता घरी पार्सल घेऊन जाण्याची सोय आहे. याचा फायदा ज्यांना अन्नाची किंमत आहे ते घेतात. बाकी लोक बिल चुकते करून निघून जातात. या गोष्टीला आळा घालण्यासाठी आता हॉटेलवालेच विविध युक्त्या करतात, पाट्या लावतात ही दिलासादायक गोष्ट आहे.

तीच बाब कपड्यांसाठीही लागू पडते. गंमत म्हणून, सहज दिसले म्हणून, तेव्हा आवडले म्हणून, करमत नव्हते म्हणून शॉपिंग करावसं वाटलं आणि भरमसाट कपडे घेतले जातात. पुढे कधीही न घातलेला कपडा त्याच्या लेबलसकट तसाच पडून राहतो आणि टाकून दिला जातो. इथे त्याचा रियुज होऊ शकतो हा फरक आहे. परंतु प्रश्न वृत्तीचा आहे. जवळच्या नातेवाईकाचे लग्न असले की दर दिवशी वेगळे कपडे हवेतच. त्यावर साजेसे दागिने हवेतच. स्वतः नवरा-नवरी देखील आयुष्यात दुसऱ्यांदा ते कपडे घालू पाहत नाहीत. गरिबी, महागाई नेमकी कोणती? असा प्रश्न स्वाभाविकपणे पडतो. लोकांजवळ खूप पैसा आहे की खूप पर्याय उपलब्ध आहेत? स्वातंत्र्य वाढलंय की कशाची किंमत राहिली नाही? मुलांचे अवास्तव लाड पुरविताना अनाठायी खर्च आणि लाड यावर बंधन लादण्याची जबाबदारी आपलीच आहे. पैशाची, वेळेची आणि राष्ट्रीय संपत्तीची नासाडी न करणे आणि न करू देणे हे तर आपल्या हातात आहेच ना.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## सजग ग्राहक : बाजारपेठेची खरी ताकद!

जागतिक ग्राहक दिन दरवर्षी १५ मार्च रोजी साजरा केला जातो. एक ग्राहक म्हणून आपले हक्क काय आहेत याविषयी जागरूकता निर्माण व्हावी याकरिता हा दिवस साजरा केला जातो. बरेचदा खरेदी करताना नवनवीन मार्केटिंग फंडात अडकून ग्राहकांची फसवणूक होते. कधी सुपरमार्केटमधील आकर्षक ऑफर्सना अनवधानाने बळी पडून नकळतपणे अनावश्यक खर्च होऊन जातो. बाजारपेठेचा केंद्रबिंदू म्हणजे ग्राहक! आणि हा केंद्रबिंदूच बाजारपेठेत अनेक वेळा फसवणुकीला बळी पडतो, असे चित्र बघायला मिळते. आकर्षक जाहिराती, मोठ्या सवलतींचे आमिष, 'एकावर एक फ्री' अशा ऑफर्स पाहून अनेक जण विचार न करता खरेदी करतात. त्या क्षणी ती खरेदी फायदेशीर वाटते; पण नंतर लक्षात येते की अनेक वस्तू गरजेच्या नव्हत्याच.

कधी वस्तूची गुणवत्ता निकृष्ट असते, कधी मुदत संपण्याच्या जवळ आलेल्या वस्तू विकल्या जातात, तर कधी बिल न देता ग्राहकांची फसवणूक केली जाते. अशा वेळी ग्राहकाने सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. वस्तू घेताना तिची किंमत, उत्पादनाची तारीख, मुदत, गुणवत्ता आणि बिल घेणे या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

ग्राहकांनी खरेदी संदर्भातील आपले हक्क जसे की, सुरक्षेचा हक्क, माहिती मिळण्याचा हक्क, योग्य किमतीत वस्तू मिळण्याचा हक्क आणि तक्रार नोंदवण्याचा हक्क याविषयी जागरूक राहणे आवश्यक आहे. जागतिक ग्राहक दिन आपल्याला याच गोष्टीची आठवण करून देतो. सजग आणि जागरूक ग्राहक हा बाजारपेठेचा केंद्रबिंदू असून बाजारपेठेची ताकद आहे याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. याकरिता प्रत्येकाने जागरूक ग्राहक बनून स्वतःचे आणि समाजाचे हित जपावे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## दुसऱ्यांचे दुःख दूर करणाऱ्यांचे दुःखही दूर होते

''दूसरों का दुःखड़ा दूर करने वाले, तेरा दुःख दूर करेंगे राम'' या ओळीमध्ये भारतीय संस्कृतीचा अत्यंत सुंदर संदेश दडलेला आहे. दुसऱ्यांच्या संकटात धावून जाणारा समाज स्वतःच्या संकटावरही नक्की मात करतो. आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीकडे पाहताना ही भावना अधिक अर्थपूर्ण वाटते. कोरोना महामारीच्या काळात जगातील अनेक देश स्वतःच्या अडचणींमध्ये गुंतले होते. परंतु भारताने त्या काळात केवळ स्वतःपुरता विचार न करता इतर देशांनाही मदतीचा हात दिला. औषधे, लसी आणि आवश्यक वैद्यकीय साहित्य अनेक देशांना पाठविण्यात आले. ही केवळ राजनैतिक कृती नव्हती; ती भारतीय संस्कृतीतील 'वसुधैव कुटुंबकम्'' या मूल्याची प्रत्यक्ष अभिव्यक्ती होती. या मदतीचा एक मोठा सकारात्मक परिणामही पुढे दिसून आला. युद्धजन्य परिस्थितीतही जगभरात अडकलेल्या भारतीय नागरिकांना परत आणण्याच्या मोहिमेत अनेक देशांनी भारताला सहकार्य केले. कारण वेळोवेळी भारताने दाखवलेली संवेदनशीलता जगाने अनुभवलेली आहे. त्यामुळे परदेशात अडकलेल्या हजारो भारतीयांना स्वदेशी परत येण्याचा मार्ग तुलनेने सुलभ झाला.

कोणत्याही मोठ्या परिवर्तनाच्या काळात काही अडचणी निर्माण होतात. कधी कधी तुटवड्याची भावना निर्माण होते, राजकीय क्षेत्रात तर या मुद्द्यांवर आरोप-प्रत्यारोपही होतात. विरोधी पक्ष आपली भूमिका मांडतात आणि कधी कधी त्यातून राजकीय फायदा घेण्याचाही प्रयत्न होतो. परंतु व्यापक दृष्टिकोनातून पाहिले, तर भारताने अनेक मोठ्या संकटांना धैर्याने सामोरे जाऊन त्यातून मार्ग काढला आहे. महामारीसारख्या जागतिक संकटातही देशाने संयम, सहकार्य आणि सकारात्मक दृष्टिकोन दाखवला. म्हणूनच आज जगात सुरू असलेली युद्धजन्य परिस्थिती आणि त्यामुळेच निर्माण झालेल्या अडचणी, यांचा कायमस्वरूपी निराशेचा अर्थ लावण्याची गरज नाही.

**श्रीकांत तिजारे**/९४२३३८३९६६

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# अत्याचारी तृणमूल सरकारचा अंत जवळ

## पंतप्रधान मोदींचा घणाघात, हिंदूंचा छळ सहन करणार नाही

**कोलकाता, १४ मार्च**

पश्चिम बंगालमध्ये हिंदूंचा छळ आणि गुन्हेगारांचे रक्षण करण्याचे प्रकार सुरू आहेत. महिला, तरुणी राज्यात असुरक्षित असून, त्यांच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही. अत्याचारी तृणमूल काँग्रेसचा अंत आता जवळ आला. राज्यातील जनतेन निर्दयी तृणमूल सरकारला सत्तेतून हद्दपार करण्याचा निर्धार केल्याने त्यांचे धाबे दणाणले आहे आणि यातूनच भाजपा कार्यकर्त्यांवर हल्ल्याच्या घटना होत असल्याचा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री ममत यांच्यावर केला.



पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी कोलकाता येथे १८ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे लोकार्पण केले. यात रस्ते, रेल्वे, बंदर आणि जहाजबांधणी प्रकल्पांचा समावेश आहे. ब्रिगेड परेड मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या भाजपाच्या परिवर्तन संकल्प यात्रेला संबोधित ते म्हणाले, राज्यात परिवर्तनाची लाट असून, जनेतेने जंगल राज संपविण्याचा निर्धार केला आहे. केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ राज्यातील जनतेला मिळू नये यासाठी तृणमूल सरकार अडथळे आणत आहे. प्रचंड गर्दीचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले, रॅलीला येणाऱ्या नागरिकांना रोखण्यासाठी सरकारने पूल बंद केले, भाजपाचे झेंडे आणि पोस्टर्स काढून टाकले, परंतु जनता थांबली नाही. तृणमूल सरकारने आणलेले अडथळे पार करीत हजारो लोक रॅलीत सहभागी होण्यासाठी आले.

### आयुष्मान भारत योजनेवरून निशाणा

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात आयुष्मान भारत योजनेचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, तृणमूल सरकार स्वार्थी राजकारणामुळे ही योजना राज्यात लागू करत नाही. यामुळे बंगालमधील कुटुंब ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांपासून वंचित आहेत. देशभरातील गरिबांना पक्की घरे मिळत असताना बंगालमध्ये मात्र या योजनेचे नाव बदलण्यात आले. लाभार्थ्यांच्या यादीत फेरफार करण्यात आले, यामुळे ज्या गरिबांना हक्काचे घर मिळायला हवे होते, ते आजही प्रतीक्षेतच आहेत.

### हिशेब चुकता करणार

ब्रिगेड परेड मैदानाच इतिहास साक्षी आहे की, जेव्हा जेव्हा बंगाल देशाला दिशा देतो, तेव्हा हे मैदान बंगालचा आवाज बनते. एकेकाळी याच मैदानातून इंग्रजी सत्तेविरुद्ध उठलेला आवाज संपूर्ण भारतात क्रांतीचे रूप धारण करून उठला होता. आज पुन्हा एकदा याच मैदानातून नव्या बंगालच्या क्रांतीचे बिगुल वाजला आहे. अत्याचार करणाऱ्या कुणालाही सोडणार नाही, एकाएकाचा हिशोब चुकता केला जाईल असा इशारा यावेळी मोदी यांनी दिला. *(वृत्तसंस्था)*

# राज्यसभेच्या ११ जागांसाठी उद्या निवडणूक

**नवी दिल्ली, १४ मार्च**

राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणूक होणार होती, त्यातील २६ जागांवरील उमेदवार अविरोध निवडून आल्यामुळे आता १६ मार्चला ११ जागांसाठी निवडणूक होणार आहे. बिहार, ओडिशा आणि हरयाणातील राज्यसभेच्या ११ जागांसाठी निवडणूक होणार आहे,

यात बिहारमधील ५, ओडिशातील ४ आणि हरयाणातील २ जागांचा समावेश आहे. १६ मार्चला मतदानानंतर लगेच मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. बिहारमधील राज्यसभेच्या पाच जागांसाठी सहा उमेदवार रिंगणात असल्यामुळे निवडणूक होत आहे. भाजपातर्फे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आणि शिवेशकुमार,




जदयुतर्फे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि केंद्रीय मंत्री रामनाथ ठाकूर, तर राष्ट्रीय लोकतांत्रिक मोर्चातर्फे उपेंद्र कुशवाह असे पाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे. राजदने अमरेंद्रसिंह धारी यांचा अर्ज भरल्याने निवडणुकीची वेळ आली. बिहारमध्ये राज्यसभेच्या एका जागेसाठी ४१ मतांची गरज आहे, रालोआजवळ २०२ आमदार असल्यामुळे भाजपाचे दोन आणि जदयुचे प्रत्येकी दोन उमेदवार सहज जिंकू शकतात. पाचवा उमेदवार जिंकण्यासाठी रालोआला ३ मते कमी पडतात, रालोआजवळ ३८ मते आहे. राजद आघाडीजवळ ३५ आमदार आहेत, त्यामुळे एक जागा जिंकण्यासाठी त्यांना सहा मते कमी पडतात, अन्य पक्षांचे संख्याबळ सहा आहे. राज्यातील पाचव्या जागेवर रालोआचे उपेंद्र कुशवाह विजयी होणार की राजदचे अमरेंद्रसिंह धारी याकडे आता सगळ्यांचे लक्ष राहणार आहे.

ओडिशात ४ जागांसाठी निवडणूक ओडिशात राज्यसभेच्या चार जागांसाठी पाच उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. भाजपाने मनमोहन सामल आणि सुजितकुमार यांना उमेदवारी दिली आहे. बिजू जनता दलाने संतृप्त मिश्रा, काँग्रेसने डॉ. दत्तेश्वर मिश्रा तर भाजपाने दिलीप रे यांना चौथ्या जागेसाठी पाठिंबा दिला आहे. भाजपाच्या दोन आणि बिजदच्या एका उमेदवाराचा विजय निश्चित मानला जातो. चौथ्या जागेसाठी भाजपा समर्थित दिलीप रे आणि काँग्रेसचे डॉ. दत्तेश्वर मिश्रा यांच्यात लढत होत आहे. भाजपाला तिसरी जागा जिंकण्यासाठी ८ मतांची आवश्यकता आहे.

# मोज्तबावर १० दशलक्ष डॉलर्सचे बक्षीस

## अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाची घोषणा

**वॉशिंग्टन, १४ मार्च**

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने इराणचे नवे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनेई यांच्या ठावठिकाणांची माहिती देणाऱ्यास १० दशलक्ष डॉलर्सचे बक्षीस देण्याची घोषणा केली. त्यांनी जाहीर केलेल्या यादीत लष्करी अधिकारी अली असगर हेज्जी, वरिष्ठ सुरक्षा अधिकारी अली लारीजानी, वरिष्ठ लष्करी सल्लागार याह्या रहीम सफावी, गृहमंत्री स्कंदर मोनी आणि गुप्तचर मंत्री इस्माईल खातीब यांच्या नावांचा समावेश आहे. यादी समावेश असलेल्या व्यक्तींविषयी माहिती देणाऱ्याला एन्क्रिप्टेड संदेशवाहनाद्वारे संपर्क साधता येईल आणि योग्य माहिती दिल्यास दहा दशलक्ष डॉलर्स बक्षीस मिळू शकते असेही परराष्ट्र विभागाच्या निवेदनात



म्हटले आहे. इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी हे देखील अमेरिकेच्या निशाण्यावर आहेत. अली लारीजानी हे इराणी नेतृत्वातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व असून अली खामेनेईच्या निधनानंतर त्यांच्या सुरक्षात्मक धोरणाचे नेतृत्व करणारे प्रमुख व्यक्ती बनले आहेत. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाला दोन आठवडे पूर्ण झाले असून, आतापर्यंत या संघर्षात दोन हजारपेक्षा अधिक नागरिकांचे मृत्यू झाल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार आयोगाने केली आहे.

# मसाप निवडणुकीची आज मतमोजणी

**पुणे, १४ मार्च**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप) पंचवार्षिक निवडणुकीची मतमोजणी आज होणार असून जवळपास दहा वर्षांनंतर परिषदेच्या कार्यकारिणीत बदल होणार का, याकडे साहित्य वर्तुळाचे लक्ष लागले आहे. विद्यमान कार्यकारिणीकडे गेल्या दहा वर्षांपासून परिषदेच्या कारभाराची सूत्रे असून यावेळी सत्ताबदल होतो की पुन्हा त्यांनाच संधी मिळते, याची उत्सुकता वाढली आहे.




परिषदेची मागील निवडणूक २०१६ मध्ये झाली होती. त्यानंतर २०२१ मधील सर्वसाधारण सभेत कार्यकारिणीने मुदतवाढ घेतल्याने विद्यमान पदाधिकाऱ्यांकडे दहा वर्षे कारभार राहिला. यंदा मात्र निवडणूक होत असून 'उत्कर्ष परिवर्तन' आणि 'साहित्य संवर्धन' या दोन आघाड्यांमध्ये चुरशीची लढत रंगली आहे.

प्रचार काळात दोन्ही आघाड्यांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप झाले. परिषदेसाठी स्वतंत्र संकेतस्थळ तयार करणे, संपूर्ण परिषद डिजिटल करण्याचे आश्वासन देणे अशा विविध मुद्द्यांवर प्रचार रंगला होता. आज होणाऱ्या मतमोजणीने या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचा शेवट होणार आहे.

राज्यभरात परिषदेचे १६ हजारांहून अधिक सदस्य आहेत. जिल्हा प्रतिनिधी बिनविरोध निवडून आल्याने अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष या तीन प्रमुख पदांसह पुणे जिल्हा व शहर कार्यवाह या पदांसाठीच मतदान झाले आहे. मतमोजणीला सकाळी ८.३० वाजता सुरुवात होणार असून सायंकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत अंतिम निकाल जाहीर होण्याची शक्यता निवडणूक अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### मणिपूरमधील बॉम्बस्फोटात मुलाचा मृत्यू, वडील जखमी

**इम्फाळ :** मणिपूरमधील नोनी जिल्ह्यातील ताओलिंगपुंग गावात शनिवारी सकाळी झालेल्या बॉम्बस्फोटात चार वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला, तर त्याचे वडील गंभीर जखमी आहे. बॉम्बस्फोटाची घटना सकाळी ८:३० च्या सुरास नामकाओलोंग पार्ट-२ परिसरात घडली. एका मुलाने एक संशयास्पद स्फोटक घरी आणले. वडिलाने स्फोटक घराबाहेर आणले आणि त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करताना त्याचा स्फोट झाला. यात चार वर्षीय मुलाचा मृत्यू झाला.




# 'महाज्योती'च्या दिरंगाईने विद्यार्थ्यांचे नुकसान

### दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**मुंबई १४ मार्च**

'महाज्योती'मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनांमध्ये झालेल्या दिरंगाई ुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. या विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून तातडीने कारवाई करण्याची मागणी आमदार डॉ. परिणय फुके यांनी विधान परिषदेत केली. विधान परिषदेत आमदार डॉ. परिणय फुके यांनी शुक्रवारी लक्षवेधी सूचनेद्वारे विद्यार्थ्यांचे नुकसान व 'महाज्योती'तील अधिकाऱ्यांच्या दिरंगाईबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केला. महाज्योती संस्थेमार्फत आयबीपीएस, रेल्वे, कर्मचारी निवड आयोग, मिलिटरी, पोलीस भरती, एमबीए-सीईटी तसेच नेट-सेट अशा विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण योजना राबविण्यात येतात. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून या प्रशिक्षण प्रक्रियेत झालेल्या विलंबामुळे हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे डॉ. परिणय फुके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. महाज्योती संस्थेर्फत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी ४९ हजार ३५८ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले, मात्र अद्याप निकाल जाहीर करण्यात आलेला नाही.

# महिलांच्या हक्क, कायदे व लघुउद्योग संधींवर मार्गदर्शन; सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगली मेजवानी

### कुचननगर-विजापूर रोड बिटमध्ये महिला दिन उत्साहात साजरा

**तभा, वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त बाल विकास प्रकल्प अधिकारी, सोलापूर शहर पश्चिम अंतर्गत कुचननगर व विजापूर रोड बिटच्या वतीने महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.

याप्रसंगी सोलापूर शहर पश्चिम विभागाचे बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक ढेपे, डॉ.निलिमा वाडेकर, वैष्णवी निर्मळे, सरस्वती चोपडे, अनुराधा कुलकर्णी, स्मिता भावे, मया जोशी, मसुती, शोभा नष्टे, कल्पना कदम आदी उपस्थित होते.

डॉ.निलिमा वाडेकर यांनी महिलांसाठी असलेले कायदे, हेल्पलाईन क्रमांक, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया तसेच अडचणीच्या वेळी



मदत कशी व कुठे घ्यावी याबाबत माहिती दिली. सरस्वती चोपडे यांनी महिलांसाठी उपलब्ध असलेल्या लघुउद्योगाच्या संधी व आर्थिक स्वावलंबनाचे मार्ग यावर मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन मुख्यसेविका रोहिणी निर्मळे यांनी केले. सूत्रसंचालन पूजा गुरव व रुपाली इंगळे यांनी केले. आभार सुमेधा पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दोन्ही बिटमधील सेविका, मदतनीस यांनी परिश्रम घेतले.

# अखिल गुरव समाज संघटनेचे १७ मार्चला मुंबईत आंदोलन

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

अखिल गुरव समाज संघटनेतर्फे विविध मागण्यासाठी १७ मार्च रोजी मुंबईत आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती संघटनेचे राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस डॉ. रंगनाथ गुरव यांनी पत्रकार परिषदेत दिली

गुरव समाजाच्या प्रलंबित विविध मागण्यासाठी या आंदोलन करण्यात येत आहे. यापूर्वी दोन वेळा आंदोलन करण्यात आले होते मात्र त्याची दखल न झाल्याने आता तिसऱ्यांदा आंदोलन करण्यात येत आहे. देवस्थान इनाम वर्ग ३ चे वतन खालसा करणे, जमिनीचा फेर सर्व्हे करणे, बेकायदेशीर हस्तांतरण झालेल्या जमिनी मूळ सनदधारकांच्या ताब्यात देणे, इतर हक्कांतील नाव काढून गुरवांच्या नावे कब्जेदार सदरी लावणे, देवस्थान जमिनीला लावलेले बेकायदेशीर कुळ काढून टाकणे, सार्वजनिक कामांसाठी घेतलेल्या जमिनी चालू बाजारभावांप्रमाणे योग्य तो मोबदला शासनाने द्यावा, वारसनोंद सुरू करावे, सर्व ट्रस्टमध्ये गुरव (पुजारी) ५० टक्के विश्वस्त पदाधिकारी म्हणून घ्यावे, गुरव समाजाचा देवस्थान पुजेचा, धार्मिक विधीचा व उत्पन्नाचा वंशपरंपरागत हक्क कायम करून ठेवणे, ज्यांनी वयाच्या ६० वयापेक्षा जास्त देवाची पूजा केलेली आहे त्यांना उदरनिर्वाहासाठी निवृत्ती वेतन यावे, मंदिर अधिग्रहण कायदा न करणे, शासनाने मंदिरे ताब्यात घेण्याऐवजी ती विकसित करून स्वयंपूर्ण करावीत, मंदिरे सत्तेची केंद्र होऊ नयेत, त्याचे पावित्र्य रहावे, यासाठी राजकीय अतिक्रमणे थांबवावीत, शेतीविषयक कर्जपुरवठा सवलती उपलब्ध करून द्याव्यात, पुजाऱ्याला रु.५ हजार मासिक मानधन देण्यात यावे, सर्व मंदिरे पुजारी सेवक यांच्या व्यवस्थापना खाली चालवावीत, सन १९५० च्या सार्वजनिक विश्वस्त कायद्यातील ३६ वे भ्रष्ट कलम दुरुस्त करावे या प्रमुख मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

# महापालिकेतील लोक अदालतीचा २ हजार थकबाकीदारांनी घेतला लाभ

### सुमारे ५ कोटी रुपये कर झाला जमा

**तभा, वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ मार्च-**

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत महापालिका प्रशासनाने महापालिका आवारात आयोजित केलेल्या लोकअदालतचा सुमारे २ हजार मिळकतदारांनी लाभ घेतला. यामुळे महापालिकेच्या तिजोरीत एका दिवसात तब्बल ५ कोटी रुपये कर जमा झाला आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला.

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणयांच्यामार्फत राष्ट्रीय लोक अदालतीचे शनिवारी आयोजन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये मालमत्ता कर विभागाकडून सुमारे १० हजार मिळकतदारांची प्रकरणे तडजोडी करिता दाखल करण्यात आलेली आहेत. लोक अदालतमध्ये मिळकतदारांच्या थकबाकीतील नोटीस फि, वॉरंट फि व शास्ती ची जी रक्कम आहे त्यामधील ५० टक्के रक्कम सुट देण्यात येत आहे.

लोकअदालतीसाठी दिवाणी व फौजदारी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) एस. पी. पाटील, लोकअभिरक्षक ॲड.रेवण पाटील उपस्थित होते. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या लोक आदालतीत मिळकत कर थकबाकीदारांकडून ऑनलाईन आणि रोख स्वरूपात ३ कोटी ९३ लाख रुपये कर भरणा करण्यात आला. तर धनादेशाद्वारे सुमारे ६४ लाख रुपये कर भरणा झाला. चेक आणि ऑनलाईन व रोख असे सर्व मिळून अंदाजे ५ कोटी रुपये थकीत मिळकत कर जमा झाला आहे. मिळकत कर विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून २४ कर निरीक्षक, ६५ लिपिक कर्मचारी या अदालतीसाठी कार्यरत होते.

### कच्च्या तेलाचे दर ४० टक्क्यांनी वधारले

**नवी दिल्ली :** अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या संघर्षा ुळे अवघ्या १५ दिवसांत कच्च्या तेलाच्या किमती ४० टक्क्यांनी वाढल्या आहेत. होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारा ऊर्जा पुरवठा मार्ग विस्कळीत झाल्याने जागतिक बाजारात तेलाच्या दराने उच्चांक गाठला आहे.

२७ फेब्रुवारी रोजी, युद्ध सुरू होण्यापूर्वी, तेलाच्या किमती प्रती बॅरल सुरे ७३ डॉलर्स होत्या. शनिवारपर्यंत, ही किंमत प्रति बॅरल सुरे १०३ डॉलर्सपर्यंत वाढली. याचा अर्थ २८ फेब्रुवारीपासून, कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ४० टक्क्यांपेक्षा अधिकने वाढल्या आहेत. बाजारातील तज्ज्ञांच्या मते परिस्थिती कायम राहिल्यास तेलाचे दर प्रती बॅरल १२० डॉलर्सपर्यंत जाण्याची शक्यता आहे. कोटक सिक्युरिटीजचे सहाय्यक उपाध्यक्ष कायनात चैनवाला वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले,








सोलापूर : विजापूर रोड परिसरात कर्नाटकातून मोठ्या प्रमाणात केळी विक्रीसाठी दाखल झाली आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)

Classifieds

**विकणे आहे**

चौपाड दर्शन हाईट्स येथील बिल्डींग नं. 2, RCC, I.R.K. सर्व सोईनेयुक्त 1 फ्लोर विकणे आहे. 9960383792

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# हॉटेल व्यवसायिकांना 'गॅस'ची झळ

## व्यवसायिकांसह कामगारांवर उपासमारीची कुऱ्हाड

**सोलापूर, दि.१४ मार्च-**

इराण - इजराइल अमेरिका यांच्या युद्धामुळे भारतावर मोठे गॅस संकट उभे ठाकले आहे. घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा विस्कळीत होत असल्याने अनेक नागरिक चिंताक्रांत बनले आहेत. तर दुसरीकडे कमर्शियल म्हणजेच व्यावसायिक गॅस पुरवठा शासनाने बंद केल्यामुळे अनेक हॅाटेल व्यवसायिक बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

सोलापूर शहरातील हॅाटेलमध्ये व्यावसायिक गॅस नसल्याने किचन पूर्णतः बंद करण्यात आला आहे. किचन बंद झाल्यामुळे हॅाटेल व्यवसायिकांवर तसेच येथे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची कुराड कोसळली आहे. एकीकडे भाडे कर्मचाऱ्यांचा पगार इतर खर्च कायम असताना उत्पन्न काहीच पदरी पडत नसल्यामुळे हॅाटेल मालकांपुढे यक्षप्रश्न उभा ठाकला आहे.



### व्यवसाय पूर्ण बंद पडला

व्यवसायिक गॅस बंद झाल्यामुळे हॅाटेल व्यवसाय पूर्ण बंद पडला आहे. शासनाने यावर योग्य तोडगा काढावा. आणि व्यावसायिक गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी यावेळी हॅाटेल मालक निलेश धोत्रे यांनी केली आहे.

### कामगारांचा पगार कसा काढावा?

हॅाटेल व्यवसाय बंद पडल्यामुळे हॅाटेलवर अवलंबून असणारे अनेक कामगारांवर उपासमारीची नामुष्की ओढवत आहे. रोजचा खर्च तसेच भाडे आणि कामगारांचा पगार कसा काढावा हा प्रश्न व्यवसायिकांना सतावत आहे.


## पाहिजेत

श्री शिवशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ, माढा संचलित

**आनंदराव पाटील विद्यालय, मालवंडी**

ता. बार्शी, जि. सोलापूर

आमच्या १००% अनुदानित विद्यालयात दि. ०१/०६/२०२२ रोजी रिक्त झालेल्या कनिष्ठ लिपिक या पदासाठी खालीलप्रमाणे जागा भरणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक (पदसंख्या-१) | १) कला, वाणिज्य किंवा विज्ञान यापैकी कोणत्याही शाखेचा पदवीधर २) मराठी व इंग्रजी ३०/४० स्पीड टायपिंग कोर्स व ३) MS-CIT कोर्स आवश्यक | खुला |

सदर पदाकरिता इच्छुक उमेदवारांनी आपल्या अर्जासोबत एक पासपोर्ट फोटो, दोन-दोन सत्यप्रती असलेल्या मूळ प्रमाणपत्रासह दि. २५/३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मालवंडी ता. बार्शी येथील विद्यालयाच्या कार्यालयात प्रत्यक्ष मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

**टीप** :- चार्टर्ड अकौंटंट यांच्याकडील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

सही/-
मुख्याध्यापक

सही/-
चेअरमन
स्कूल कमेटी

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या सुरक्षेत त्रुटी

**बिहार**ः मुख्यमंत्री नीतीश कुमार शनिवारी बेगूसराय दौऱ्यावर असून प्रशासन पूर्णपणे सज्ज होते. एक गाय अचानक बरौनी येथील बियाडा कॅम्पस हेलीपॅडवर आल्याने सुरक्षा यंत्रणेची पोल उघड झाली. हा प्रसंग समाज माध्यमावर प्रमाणात व्हायरल झाला असून मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेची गंभीर चिंता निर्माण झाली आहे. मुख्यमंत्रीच्या कार्यक्रमासाठी हेलीपॅडवर आधीच सुरक्षा कर्मचारी तैनात केले गेले होते. प्रशासनकर्मी हेलीकॉप्टरच्या आगमनाची वाट पाहत होते. याचवेळी गाय बैरिकेडिंग तोडत थेट हेलीपॅडच्या मध्यभागी प्रवेश करताच परिसरात गोंधळ उडाला. गाय हेलीपॅडवर धावत असताना सुरक्षाकर्म्यांची तिला पळविण्यासाठी धावपळ सुरू केली. समाज माध्यमांवर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये हा संपूर्ण प्रकार दिसतो आहे. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, प्रोटोकॉलनुसार हेलीपॅड परिसर पूर्णपणे 'नो-गो झोन' म्हणून घोषित केला होता, तरीही चूक घडली.

### एलपीजी गॅस टंचाईत सायबर ठगांचा धंदा

**मुंबई**ः महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये एलपीजी गॅस बुकिंग आणि सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना एजन्सीबाहेर तासन्तास उभे राहावे लागत आहेत. या गंभीर परिस्थितीचा फायदा काही सायबर भामट्यांनी घेतल्याचे उघड झाले आहे. गॅस टंचाईमुळे नागरिक आधीच असुरक्षित असतानाच सायबर ठग नागरिकांना गॅस कनेक्शन कट करण्याची धमकी देऊन फसवणूक करत आहेत. माहितीनुसार, मुंबईतील सायबर फसवणूक करणाऱ्या गटाने चार दिवसांत एकूण २६ लाख ४३ हजार रुपयांचा गंडा केला आहे. सायबर भामटे महानगर गॅस लिमिटेडचे अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांना फोन करतात आणि बिल थकले असल्यास कनेक्शन कापले जाईल अशी धमकी देतात. नंतर कनेक्शन वाचवण्यासाठी १० ते २० रुपये भरण्यास सांगितले जाते आणि 'महानगर पीके' नावाची फाईल डाऊनलोड करण्यास सांगितले जाते. या फाईलवर क्लिक करताच ग्राहकांच्या बँक खात्यातील रक्कम लंपास होते.

# राज्यात खाजगी पूर्व-प्राथमिक शाळांच्या नियमनासाठी नवा कायदा येणार : भुसे

## प्री-स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक

◆ **मुंबई १४ मार्च**

राज्यातील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी असलेल्या खासगी पूर्व-प्राथमिक शाळांवर आता राज्य शासनाचे नियंत्रण येणार आहे. या शाळांमधील चिमुकल्यांना दर्जेदार आणि सुरक्षित शिक्षण मिळावे, यासाठी शाळांची नोंदणी, नियमन आणि गुणवत्ता सुनिश्चित करणारा एक स्वतंत्र कायदा (अधिनियम) शासन लवकरच आणणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षापूर्वी हा कायदा लागू करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याची महत्त्वपूर्ण माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली आहे.

आमदार मनीषा चौधरी यांनी खासगी पूर्व-प्राथमिक शाळांच्या नोंदणीबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना मंत्री भुसे यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली. १२ हजारहून अधिक शाळांची पोर्टलवर नोंदणी करण्यात आली असून राज्य, जिल्हा प्रशासन आणि पालकांना पूर्व-प्राथमिक शाळांची माहिती एकाच ठिकाणी मिळावी यासाठी २४ एप्रिल २०२५ च्या शासन परिपत्रकानुसार प्री-स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यात आतापर्यंत १२ हजार ७३३ खासगी पूर्व-प्राथमिक शाळांनी आपली नोंदणी केली आहे.

### आरटीईअंतर्गत शाळेच्या अंतरात वाढीचा विचार



शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) शाळा विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून १ किलोमीटरच्या परिसरात असावी, असा नियम आहे. मात्र, ज्या भागांत १ किलोमीटरवर शाळा उपलब्ध नाहीत, तेथे हे अंतर तीन किलोमीटरपर्यंत ग्राह्य धरण्यावर शासन विचार करत असल्याचेही शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी स्पष्ट केले.




उर्वरित संस्थांनीही लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. सदर कायदा तयार करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाचा अभिप्राय घेण्यात आला असून, सध्या हा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे अंतिम प्रक्रियेत आहे. या नव्या कायद्यात महत्वपूर्ण बाबींचा समावेश राहणार आहे. यात नोंदणी व नूतनीकरण हे महत्वाचे असून सर्व खासगी बालवाटिकांची नोंदणी अनिवार्य राहणार आहे. दर तीन वर्षांनी या नोंदणीचे नूतनीकरण करावे लागेल. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची नियुक्ती केली जाणार आहे. वर्गात २० विद्यार्थ्यांमागे किमान १ शिक्षक असणे (१:२० प्रमाण) बंधनकारक असेल. तसेच शिक्षकांची पात्रताही निश्चित केली जाणार आहे. वर्गखोल्यांचे आकारमान, स्वच्छतागृहांची व्यवस्था, बालकेंद्रित अभ्यासक्रम आणि शैक्षणिक साहित्याची उपलब्धता अनिवार्य राहणार आहे.पालकांना दिलासा देण्यासाठी शाळेची फी (शुल्क) आणि विद्यार्थ्यांच्या वाहतूक व्यवस्थेचे नियमही या कायद्यात अंतर्भूत केले जातील.

(वृत्तसंस्था)

# दहा कोटी कुटुंबांसोबत संपर्क

**सहसरकार्यवाह सी. आर. मुकुंद यांची माहिती**

**गृहसंपर्क अभियानात काही प्रांतांतील ३.९० लाख गावांसोबतही संपर्क**

**पंच परिवर्तनचे उद्दिष्ट साध्य करण्याकडे लक्ष**

◆ **पट्टीकल्याण (समालखा), १४ मार्च**

संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त दोन प्रकारच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. एक कार्यक्रम संघटनात्मक विस्ताराच्या उद्देशाने, तर समाजात सद्भावना आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्यासाठी समाजातील सज्जनशक्तींना संघटित करण्याचा दुसरा उद्देश होता. हे उद्दिष्ट समोर ठेवून, सध्या गृहसंपर्क अभियान सुरू आहे. या उपक्रमांतर्गत देशातील अनेक राज्यांमध्ये दहा कोटी कुटुंबे आणि ३,९०,००० गावांशी आतापर्यंत संपर्क साधण्यात आला. इतर राज्यांमध्येही हे अभियान सुरू आहे, अशी माहिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह सी. आर. मुकुंद यांनी दिली.

रा. स्व. संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या बैठकीला शुक्रवारी औपचारिक सुरुवात झाली. सकाळी नऊ वाजता रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सभेचे उद्घाटन केले. ही तीन दिवसीय बैठक हरयाणातील पट्टीकल्याण (समालखा) येथील माधव सृष्टी कॅम्पसमध्ये होत आहे. सहसरकार्यवाह सी. आर. मुकुंद यांनी पत्रकारांना विविध विषय आणि उपक्रमांची माहिती दिली. यात प्रतिनिधी सभेच्या उद्घाटनाचा समावेश आहे. त्यांच्यासोबत अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर होते.

### देशभरात ३६ हजारांपेक्षा जास्त ठिकाणी हिंदू संमेलने



आजवर देशात ३६ हजारांपेक्षा जास्त ठिकाणी हिंदू संमेलने आयोजित करण्यात आली. यामध्ये शहरी केंद्रे, ग्रामीण भाग आणि दुर्गम आदिवासी प्रदेशांसह सर्व प्रकारच्या परिसरांचा समावेश आहे. विशेषतः अरुणाचल प्रदेशातील एका दुर्गम भागात आयोजित करण्यात आलेले हिंदू संमेलन हे याचे उत्तम उदाहरण ठरते. बंधुभावाची इतकी सखोल अनुभूती प्रथमच येत होती, असे मत तिथे उपस्थित सहभागींनी व्यक्त केले. या हिंदू संमेलनांच्या आयोजनाची प्रक्रिया अविरतपणे सुरूच आहे, असे सी. आर. मुकुंद यांनी सांगितले.

संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित प्रतिनिधी सभेच्या बैठकीला देशभरातून १४०० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित राहतील, अशी अपेक्षा असल्याचे सी. आर. मुकुंद यांनी सांगितले. निधन झालेल्या नामवंत व्यक्तींना आदरांजली अर्पण करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने शिवकथाकार सद्गुरुदास महाराज, पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि लोकसभेचे सभापती शिवराज पाटील, पर्यावरण कार्यकर्त्या सालुमरदा तिमक्का, पुरातत्त्वशास्त्रज्ञ के. एन. दीक्षित, महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार, अभिनेते धर्मेंद्र देओल, तमिळ चित्रपट निर्माते ए. व्ही. एम. सरवणन, मिझोरमचे माजी राज्यपाल स्वराज कौशल, शिक्षणतज्ज्ञ विनय हेगडे, कम्युनिस्ट नेते आर. नल्लक्कन्नू आणि ज्येष्ठ पत्रकार व संपादक प्रफुल्ल गोविंद बरुआ यांचा समावेश होता.

संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन सुरू आहे. यामध्ये समाजातील शक्तींचे सहकार्य आणि सहभाग लाभल्यामुळे स्वयंसेवकांचे मनोधैर्य उंचावले आहे, असे सी. आर. मुकुंद यांनी पत्रकारांना सांगितले. शताब्दी वर्षाचे कार्यक्रम २ ऑक्टोबर २०२५ रोजी नागपूर येथे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या उपस्थितीत सुरू झाले. याच्या एक दिवस आधी भारत सरकारने संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने, संघाला समर्पित असे एक टपाल तिकीट आणि एक स्मृती नाणे प्रकाशित केले. गृहसंपर्क मोहिमेदरम्यान, स्वयंसेवकांनी घराघरांना भेटी दिल्या आणि कोणत्याही प्रकारचा वर्ग किंवा समाजविषयक पूर्वग्रह न बाळगता, संघाविषयी संवाद साधण्यासाठी कुटुंबांची भेट घेतली. केरळ राज्याचे उदाहरण द्यायचे झाल्यास ५५ हजारांपेक्षा जास्त मुस्लिम घरांशी आणि ५४ हजारांपेक्षा जास्त ख्रिश्चन कुटुंबांशी संपर्क साधण्यात आला आणि या सर्व कुटुंबांनी स्वयंसेवकांचे अत्यंत आत्मीयतेने स्वागत केले, असे सी. आर. मुकुंद यांनी सांगितले.

समाजाच्या कल्याणासाठी सुजाण नागरिकांच्या शक्तीला संघटित करण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण नागरिक चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन प्रकारच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून, पंच परिवर्तन हे व्यापक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजात एक पोषक वातावरण निर्माण केले जात आहे. या पंच परिवर्तनांमध्ये सामाजित सलोखा, पर्यावरण संवर्धनाविषयीची जाणीव, स्वतःची अस्मिता आणि स्वदेशी मूल्यांविषयीचा अभिमान, कुटुंब संस्थेचे जतन आणि नागरिक कर्तव्यांविषयीच्या जागृतीचा समावेश होतो. केवळ या परिवर्तनांच्या माध्यमातून राष्ट्र आणि समाजाला महानतेच्या शिखरावर नेणे शक्य होईल, असे सी. आर. मुकुंद यांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

## महाराष्ट्र महिला केसरी कुस्ती स्पर्धेनिमित्त आज वासा पूजन

सोलापूर : हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या परिसरात दिनांक २८ व २९ मार्च रोजी निर्झरा केअर फाउंडेशनतर्फे चौथी महाराष्ट्र महिला केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेच्या निमित्ताने हरीभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील मुळे सभागृहात रविवार दिनांक १५ मार्च रोजी सकाळी दहा वाजता चौथ्या महाराष्ट्र महिला कुस्ती स्पर्धेचा वासा पूजन समारंभ आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती निर्झरा केअर फाउंडेशनच्या संचालिका स्वाती अळ्ळीमोरे (साखरे) यांनी दिली. हा समारंभ आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार व सोलापूर शहर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, पाटबंधारे खात्याचे माजी सचिव चन्नवीर बिराजदार यांच्या हस्ते होणार आहे. या समारंभास महाराष्ट्र राज्य कुस्ती संघाचे अध्यक्ष व माजी खासदार रामदास तडस, कार्याध्यक्ष संदीप उर्फ आप्पा भोंडवे, सरचिटणीस योगेश दोडके, सोलापूर जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष व कुस्ती सम्राट अस्लम काझी तसेच उपमहाराष्ट्र केसरी पैलवान भरत मेकाले हे उपस्थित राहणार आहेत.





# रिकर्व्ह प्रकारात सोलापूरचे मुले विजेते, मुली तृतीय

## राज्य अजिंक्यपद धनुर्विद्या स्पर्धा : बुलढाणास दुहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च -**

राज्य अजिंक्यपद धनुर्विद्या स्पर्धेत तेरा वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात कंपाऊंड प्रकारात बुलढाणा जिल्ह्याने विजेतेपद पटकावीत दुहेरी मुकुट संपादिला.

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर ही स्पर्धा सुरु आहे. १३ वर्षाखालील गटात रिकर्व्ह प्रकारात सोलापूरच्या मुलांनी विजेतेपद पटकाविले. मुलीच्या गटात त्यांना तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. कंपाऊंड प्रकारात मुलांनी उपविजेतेपद व मुलीनी तृतीय स्थान संपादिले.



शनिवारी झालेले अंतिम निकाल (प्रथम तीन) - **कंपाऊंड :** सांघिक : मुले : बुलढाणा, सोलापूर, परभणी. मुली : बुलढाणा, पिंपरी चिंचवड, सोलापूर.

**वैयक्तिक :** मुले : देवांश शेवाळे (३५५, बुलढाणा), आदर्श साळवे (३५४, जालना), शंभूराज नरवडे (३५१, परभणी). मुली : भार्गवी पवार (३५० पिंपरी चिंचवड), सिद्धी राठोड (३४६, बुलढाणा), आरोही जाधव (३४५, नांदेड).

**रिकर्व्ह : सांघिक : मुले** :सोलापूर, सातारा, पुणे. मुली : पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर. **वैयक्तिक : मुले :** राज लोकरे, अथर्व नरोटे(३४७), योगराज शिंदे (३४६, तिघे सोलापूर). मुली : धनश्री शिरसाट (३४५, अहिल्यानगर), आरुषी कदम (३४५, नांदेड), मार्गी पाटील (३४२, अमरावती).




# राष्ट्रीय युवा महोत्सवात सोलापूर विद्यापीठास पाच पारितोषिके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च -**

राष्ट्रीय युवा महोत्सवात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने यशाची परंपरा कायम ठेवत वैयक्तिक आणि सामुहिक कलाप्रकारात पाच पारितोषिके पटकाविली.

अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ दिल्ली आयोजित ३९वा राष्ट्रीय युवा महोत्सव सत्यभामा विद्यापीठ,चेन्नई येथे १० ते १४ मार्च दरम्यान संपन्न झाला. या महोत्सवात देशातील सर्व राज्याचे १४२ विद्यापीठ सहभागी झाले होते. देशात बक्षीसे मिळविण्याच्या वर्गवारीत टॉप टेनमधे विद्यापीठ आहे,तर राज्यात तिसऱ्या स्थानी आहे. विद्यार्थी विकास संचालक डॉ.केदारनाथ काळवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाची ही कामगिरी देदीप्यमान आणि ऐतिहासिक आहे.



विद्यापीठाने खालील बक्षीसे प्राप्त केली. त्यांचे व संघांचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी कौतुक केले पारितोषिके अशी : प्रथम : हिंदी वक्तृत्व, मिमिक्री. व्दितीय : शोभायात्रा, कार्टुनिंग.तृतीय : वादविवाद.



# ‘यश’च्या शोधाला अद्यापही ‘अपयश’

**तीन दिवसांपासून शोध मोहीम**

**दगड खाणीतील पाण्यात बुडाला मुलगा**

**कासेगाव परिसरातील दुर्घटना, बोट, कॅमेरे व गळाच्या मदतीने शोधकार्य**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मार्च-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील दगड खाणीच्या पाण्यात बुडालेल्या श्रीहर्ष उर्फ यश श्रीहरी हब्बू या चौथीतील विद्यार्थ्याचा शोध तिसऱ्या दिवशीही लागला नाही. गुरुवारी (दि.१२) मार्च दुपारी घडलेल्या या दुर्दैवी घटनेनंतर सुरू असलेली शोधमोहीम शनिवारी सायंकाळपर्यंत सुरू होती. तरी यशचा अद्यापही ठावठिकाणा लागलेला नाही.

प्राप्त माहितीनुसार, कासेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत चौथीमध्ये शिकणारा यश हा गुरुवारी दुपारी पोहण्यासाठी आपल्या काका व त्यांच्या मित्रांसोबत कासेगाव हद्दीतील ब्रह्मनाथ मंदिर परिसरातील दगड खाण येथे गेला होता. यशला काठावर बसवून इतरजण पोहण्यासाठी थोड्या अंतरावर गेले असताना काठावर बसलेला यश अचानक पाण्यात पडून बुडाल्याची घटना घडली. दरम्यान, घटनेनंतर सुरुवातीला स्थानिकांनी पाण्यात उतरून त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यात यश सापडला नाही. त्यानंतर तातडीने अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. या घटनेनंतर आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारपासून शोधमोहीम सुरू आहे. घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक घोडके, पोलीस निरीक्षक देशपांडे, डब्ल्यू.पी.एस.आय. डोंगरीतोट, सुपे मॅडम, तलाठी हुडेवाले, सर्कल अधिकारी माळी तसेच तहसीलदार किरण जगदाडे यांनी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. कासेगावचे सरपंच यशपाल वाडकर व एएसआय बाणेवाले आदीं घटनास्थळी उपस्थित होते. यशच्या शोधासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ढोले यांच्यासह अग्निशमन दलाचे केंद्र अधिकारी रावसाहेब मगर, चालक मिलिंद सुरवसे, फायरमन सचिन लोकरे, राजू चिंता, संकेत कुंभार आणि महेश गेंड हे पाण्यात उतरून प्रयत्न करत आहेत. तसेच स्थानिक ओंकार भोजने व सचिन गरड यांच्या कॅमेऱ्यांच्या मदतीनेही पाण्यात शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, शनिवारी सकाळपासून बोटीच्या मदतीने पुन्हा शोधमोहीम राबविण्यात आल्याचे दिसून आले.

**५५ मेगा पिक्सेल कॅमेऱ्याच्या माध्यमातून शोध मोहीम सुरू**

आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील ५५ मेगा पिक्सेल उच्च क्षमतेचा कॅमेरा सुमारे ८० ते १०० फूट खोलवर सोडून तपासणी करण्यात आली. गेल्या दोन दिवसांपासून सकाळपासून सायंकाळपर्यंत शोधकार्य सुरू असूनही यशचा शोध लागलेला नाही.

पाण्यात खोलवर गळ सोडूनही शोध घेण्यात येत असून उपलब्ध सर्व शक्यता तपासून यशचा शोध सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## महत्वाचे...



### ‘विद्यार्थ्यांची गैरहजेरी ते मोबाईलचा प्रभाव’ यावर रंगली गटचर्चा

**बार्शी, दि.१४ मार्च-**

ग्रामीण भागातील विविध सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकण्यासाठी आयोजित खुल्या गटचर्चेत बालविवाह, हुंडाबळी, महिलांचा राजकारणातील सहभाग, मोबाईलचा वाढता प्रभाव, युवकांमधील व्यसनाधीनता, कोविडनंतरच्या शिक्षणातील बदल तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वर्गातील अनुपस्थिती या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. श्री शिवाजी महाविद्यालयातील कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत घेण्यात आलेल्या या गटचर्चेचे प्रमुख व्याख्याते प्रा. वैभव कुलकर्णी होते. अध्यक्षस्थानी डॉ. राहुल पालके होते. प्राचार्य डॉ. ए. बी. शेख यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलकर्णी म्हणाले, बालविवाह व हुंडाबळीसारख्या सामाजिक समस्यांचे अस्तित्व चिंताजनक आहे. मोबाईलच्या अति वापरामुळे युवकांमध्ये मानसिक ताण, एकटेपणा आणि व्यसनाधीनता वाढत आहे. डॉ. पालके यांनी अध्यक्षीय समारोपाचे भाषण केले.



### मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ; प्रयास संस्थेच्या पाठपुराव्याला यश

**सोलापूर, दि.१३ मार्च-**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत येत्या शैक्षणिक वर्षापासून वाढविण्यात येणार असल्याची घोषणा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी केली. या निर्णयामुळे प्रयास संस्थेच्या पाठपुराव्याला यश आले आहे. प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिंदे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. यासाठी त्यांनी तत्कालीन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांची समक्ष भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या समस्येकडे लक्ष वेधले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष ज.मो. अभ्यंकर यांचीही त्यांनी भेट घेऊन प्रस्ताव सादर करत सातत्याने पाठपुरावा केला होता.

### महिला बचत गटातील समस्यांबाबत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांना निवेदन

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

आत्मनिर्भर वस्तीस्तर संघ महिला बचत गटातर्फे महिला महोत्सव घेण्यात आला. ४२ बचत गटातील महिलांनी स्टॉल लावले होते. आत्मनिर्भर वस्तीस्तर संघ महिला बचत गट अध्यक्षा सुनीता दळवी यांनी महिला बचत गटाच्या समस्यांबाबत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांना निवेदन दिले. कायमस्वरूपी विक्रीसाठी स्टॉल मिळावेत, कायम स्वरूपी मार्केट मिळावे, महानगरपालिकेच्या बचत गटांना रखडलेला निधी मिळावा. त्याचबरोबर वस्तीस्तर संघ बचत गटाला सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासाठी निधी मिळावा, सभा मंडपाची सोय असावी जेणे करून सर्व बचत गटातील महिला एकत्र येतील अशी मागणी अध्यक्षा दळवी यांनी केली. यावेळी सोलापूर बचत गटातील स्टॉल धारक अनिता मेलशेट्टी, दिपाली साळुंखे, सुनीता साळुंखे, अलका नारायणकर, भारती निंबाळकर, प्राणीला चव्हाण, देवकन्या राजगुरू उपस्थित होत्या.

# टेंभुर्णी बसस्थानकास डॉ.आंबेडकरांचे नाव द्या

बहुजन सत्यशोधक संघाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १४ मार्च -**

बहुजन सत्यशोधक संघ या राष्ट्रव्यापी संघटनेच्या वतीने टेंभुर्णी शहरात शुक्रवार (दि. १३ मार्च) रोजी विविध मागण्यांसाठी भव्य मोर्चा काढण्यात आला. टेंभुर्णी येथील बसस्थानकाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बसस्थानक - टेंभुर्णी असे नामकरण करण्यात यावे, तसेच सामाजिक न्याय विभाग व बार्टी संस्थेतील अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी असलेला निधी इतरत्र वळविणाऱ्या शासनाच्या निर्णयाचा यावेळी तीव्र निषेध करण्यात आला.

मोर्चाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. तसेच महात्मा ज्योतिराव फुले आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांनाही अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहरातील प्रमुख मार्गांवरून मोर्चा काढण्यात आला. शेवटी टेंभुर्णी पोलीस ठाण्यासमोर म ोर्चाची सांगता करण्यात आली.

यावेळी बहुजन सत्यशोधक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील ओव्हाळ यांनी सामाजिक न्याय विभाग व बार्टी संस्थेतील अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी असलेला निधी शासनाकडून इतरत्र वळविला जात असल्याचा आरोप केला. या निर्णयामुळे अनुसूचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत



असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाने हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा मुंबई येथील आझाद मैदान येथे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच येत्या १४ तारखेपर्यंत टेंभुर्णी बसस्थानकाचे नामकरण न झाल्यास महार वतन जागेतून बसस्थानक हटविण्याचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी महावीर वजाळे यांनी सांगितले की, सन १९४२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेंभुर्णी येथे आले होते आणि त्यांनी कार्यकर्त्यांची बैठक घेतली होती. त्यामुळे टेंभुर्णी ही ऐतिहासिक भूमी आहे. तसेच सध्याचे बसस्थानक महार वतन जागेत असल्याने त्या बसस्थानकाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बसस्थानक - टेंभुर्णी असे नामकरण तात्काळ करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी वडार समाजाचे नेते बाबा धोत्रे, महेंद्र सोनवणे, रणजित गायकवाड तसेच अधिवक्ता तुकाराम राऊत यांनीही बसस्थानकाचे नामकरण लवकरात लवकर न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला.

मोर्चामध्ये परमेश्वर खरात, यशपाल लोंढे, राजकुमार लांडगे, समीर नाईकनवरे, बिभीषण कांबळे, भीमा साळवे, अमर गायकवाड, अरविंद गायकवाड, सनी खरात, सूरज शिंदे, पोपट लोंढे, बबन किर्ते, निलेश खरात, राजवर्धन वजाळे, बाळासाहेब खरात, सचिन खरात, प्रशांत गायकवाड, श्रीकांत जवंजाळ, आबासाहेब पाटोळे, प्रकाश गायकवाड, राजाभाऊ शिंदे, मनोज शिंदे, महेंद्र शिंदे, कृष्णा पवार, उल्हास खरे, लक्ष्मण शिंदे, अतिश ओहोळ, सतीश वाघमारे, मल्हारी फाळके, सम ाधान कांबळे, विकी भोसले, गौतमी गायकवाड आदी सहभागी झाले होते. यावेळी शासनाच्या वतीने टेंभुर्णी मंडळ अधिकारी सुजित शेळवणे, ग्राम महसूल अधिकारी शिवाजी घाडगे तसेच पोलीस उपनिरीक्षक अजित मोरे यांनी निवेदन स्वीकारले.

# दिल्लीतील ‘तरुण खटीक’च्या हत्येचा सोलापुरात निषेध

**अ.भा. हिंदू खाटीक समाजाचे उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मार्च-**

होळीच्या उत्सवादरम्यान दिल्ली येथे तरुण खटीक या युवकाची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेचे पडसाद आता सोलापूर जिल्ह्यातही उमटू लागले आहेत. या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी 'अखिल भारतीय हिंदू खाटीक समाज' संघटनेच्या वतीने आज सोलापूरच्या उपजिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनातून समाजाच्या वतीने केंद्र आणि राज्य सरकारकडे आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी करावी. सदर गुन्हा हा अत्यंत क्रूर स्वरूपाचा असल्याने, हा खटला विशेष न्यायालयात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा मिळावी यासाठी सरकारने विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करावी. पीडित कुटुंबाची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, त्यांना केंद्र व राज्य सरकारकडून तातडीने भरीव आर्थिक मदत मिळावी.सामाजिक सुरक्षा: सम ाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होऊ नये, यासाठी मागास व दुर्बल घटकांच्या सुरक्षेसाठी विशेष आराखडा तयार करून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आदी मागण्यांचा याम ध्ये समावेश आहे.

निवेदन देताना अखिल भारतीय हिंदू खाटीक समाजाचे प्रदेश संघटक कानिफनाथ थोरात, प्रदेश सल्लागार संजय घोलप, सोलापूर हिंदू खाटीक महासंघ सोलापूरचे खजिनदार दत्तात्रय कांबळे, कार्यकारिणी सदस्य संतोष क्षीरसागर, राकेश निचळे, महेश कांबळे, साईनाथ कांबळे, सचिन करणकोट, प्रभाकर क्षीरसागर यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनधिकृत बांधकाम प्रकरणी डॉ. जगताप यांच्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ मार्च-**

शहरात अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी संबंधित बांधकामधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे. नगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीच्या अटींचे उल्लंघन करुन अतिरिक्त व विनापरवाना बांधकाम केल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. याबाबत बार्शी नगरपरिषदेमध्ये सहायक नगर रचनाकार म्हणून कार्यरत असलेले वैभव विकास पायगुडे (वय २९) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

सागर नागेश लंकेश्वर यांनी दि. ९ मार्च रोजी नगरपरिषदेकडे डॉ. रामचंद्र जगताप यांच्या अनधिकृत बांधकामाबाबत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान संबंधित मालकाने नगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखड्याच्या विरोधात बांधकाम केल्याचे आढळून आले. मिळालेल्या माहितीनुसार, सी.एस. क्रमांक ६३/३/१ या जागेवर मंजुरीपेक्षा जास्त बांधकाम करण्यात आले आहे.

तपासणीदरम्यान तळमजला व पहिल्या मजल्यावर मंजूर परिमाणांपेक्षा अधिक बांधकाम करण्यात आले असून, जागेचा वापर निवासी स्वरुपाचा असताना प्रत्यक्षात व्यावसायिक स्वरुपात केला जात असल्याचे निदर्शनास आले. तसेच कोणतीही परवानगी नसताना दुसऱ्या मजल्यावरही अतिरिक्त बांधकाम करण्यात आल्याचे आढळले. या प्रकरणी यापूर्वीही नगरपालिकेच्यावतीने १३ जून २०१९ रोजी नोटीस देऊन अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतरही संबंधितांनी कारवाई न केल्याने ११ मार्च २०२६ रोजी पुन्हा एकदा २४ तासांच्या आत बेकायदेशीर बांधकाम हटविण्याची नोटीस देण्यात आली होती. मात्र संबंधितांनी आजपर्यंत ते बांधकाम काढून न घेतल्याने व अनधिकृत बांधकामाचा वापर सुरुच ठेवल्याने नगरपरिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. यानुसार डॉ. रामचंद्र विनायक जगताप यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (६-अ) अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात सरकारी तक्रार देण्यात आली असून, पुढील तपास सुरु आहे. डॉ. रामचंद्र जगताप यांचे म्हणणे संबंधित बांधकामप्रकरणी कागदोपत्री व्यवहार हा बार्शी नगरपरिषद व संबंधित खात्याकडे सुरु असून, याबाबतच्या काही गोष्टी सार्वजनिक करणे योग्य नाही. कायद्याचा आदर राखत कायदेशीर प्रक्रियेने या घटनेला आम्ही सामोरे जाऊ.

# पिलीव परिसरात युरियासाठी शेतकऱ्यांची हेळसांड

**कृषी विभागाने लक्ष देण्याची शेतकऱ्यांमधून मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १४ मार्च -**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांना युरिया मिळत नाही. पिलीव परीसरातील दुकानदार आमच्याकडे युरीयाच नाही म्हणून सांगत आहेत. आम्हाला वरुनच युरिया मिळत नाही कंपन्या इतर खते घेतल्याशिवाय आम्हाला युरीयाच देत नाहीत अशा प्रकारची उत्तरे दुकानदार शेतकऱ्यांना देत आहेत. आम्ही फक्त युरियाचे पोते देऊ शकत नाही तुम्हाला दुसरी खते घ्यावी लागतील त्याशिवाय आम्ही युरीयाच देऊ शकत नाही. ऐन उन्हाळ्यात शेतकऱ्यांनी केलेल्या कडवळ, मका व इतर पिकांना युरियाची थोडीफार गरज आहे .पण दुकानदार युरीयाच नाही म्हणून शेतकऱ्यांना दुकानाचे उंबरे झिजवायला लावीत आहेत .एवढे विदारक चित्र पिलीव परीसरात गेल्या दोन महिन्यापासून पाहावयास मिळत आहेत.म ाळशिरस तालुक्यातील कृषी विभागाने याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.पिलीव परीसरातील अनेक दुकानदार २६६ रुपयाला असणारे युरियाचे पोते सध्या ३०० ते ३२५ रुपयाला देत आहेत.ते रीतसर पावतीही देत नाहीत. भारत हा कृषिप्रधान देश आहे याच देशात शेतकऱ्यांची होणारी हेळसांड खरेतर अजिबात चांगली नाही.पिलीव परीसरातील शेतकऱ्यांना युरियासाठी दहा_दहा दिवस दुकानदाराकडे हेलपाटे मारावे लागत आहेत.

> पिलीव परिसरातील अनेक दुकानदारांकडे शेतकरी युरियाची मागणी करीत आहेत.अनेक शेतकरी माझ्या कडे याबाबत आले होते. फक्त काही दुकानदारांनी एक-दोन पोती युरिया दिला पण अनेक दुकानदारांनी आमच्याकडे युरीयाच नसल्याचे सांगीतले. कृषी विभागाने ताबडतोब याबाबत योग्य त्या उपाययोजना कराव्यात.
>
> **- संजय पाटील,**
> **भाजपा चिटणीस माळशिरस मंडल.**

> याबाबत माळशिरस तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी रुपनवर यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण त्याच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

> याबाबत पिलीव येथील कृषी मंडल अधिकारी जयश्री खरात यांना संपर्क साधला असता पिलीव परिसरातील सर्व दुकानदारांना याबाबत मी संपर्क साधून कोणत्याही शेतकऱ्यांची युरियासाठी अडवणूक करु नका अश्या सुचना देते. कोण जर जाणूनबुजून अडवणूक करीत असेल तर त्याच्यावर रितसर कारवाई करण्यात येईल.

## निधन वृत्त...



### शिवाजीराव कट्टे

**मंगळवेढा, दि. १४ मार्च-**

मंगळवेढा येथील प्रगतशील शेतकरी विलास शिवाजीराव कट्टे यांचे वयाच्या ७४ वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले व एक मुलगी तसेच सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर मंगळवेढा येथे कट्टे वस्तीवर अत्यंसंस्कार करण्यात आले.



### महादेव तौर

**सोलापूर, दि. १४ मार्च-**

येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सोलापूरचे सेवानिवृत्त कर्मचारी महादेव नारायण तौर ७५ यांचे वृद्धापकाळाने शनिवार दि.१४ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. लोकमंगल बँकेचे कर्मचारी हरि तौर यांचे ते वडील होते.




# ‘वटवृक्ष’चे अध्यक्ष महेश इंगळे यांना ज्ञानदिप पुरस्कार

**कोल्हापूरच्या भक्त मंडळ संस्थेकडून झाला गौरव**

> **मी सामान्य स्वामीचा सेवक आहे. पुरस्काराची रक्कम १ लाख व स्वतः चे एक लाख असे दोन लाख रुपये कोल्हापुरच्या संस्थेला देण्याची घोषणा चेअरमन महेश इंगळे योनी केली.**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१४ मार्च-**

प्रज्ञापुरी कोल्हापूर येथील श्री स्वामी समर्थ सार्वजनिक भक्त मंडळ संस्थेतर्फे दिला जाणारा ज्ञानदिप पुरस्कार यंदा अक्कलकोटच्या वटवृक्ष मंदीर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांना माजी आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

संस्थेतर्फे दरवर्षी स्वामी भक्त प.पू.कै. ज्ञानेश्वर हरी काटकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. एक लाख रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी प्रथमेश इंगळे नगरसेवक सत्यजित कदम, श्री स्वामी समर्थ सार्वजनिक भक्त मंडळ प्रज्ञापुरी कोल्हापुर ट्रस्टचे अध्यक्ष नारायणराव बुधले, उपाध्यक्ष प्रकाश चव्हाण, ट्रस्टी जयसिंहराव जाधव, संचालक शिवाजीराव साळुंखे, संचालक बाबुराव पवार आदि प्रमुख उपस्थित होते. यावेळी स्वामीच सर्वश्रेष्ठ आहेत स्वामीची प्रचिती प्रत्येक पावलाला येते आपण फक्त स्वामीची सेवा करत राहू. आपण जाऊ पण स्वामी निरंतर असल्याचे प्रतिपादन श्री. इंगळे यांनी पुरस्कार स्विकारल्यानंतर केले. माजी आयुक्त श्री. कलशेट्टी यांनी अक्कलकोट येथील स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांना हा पुरस्कार म्हणजे अक्कलकोटसाठी हे गौरवाचे असल्याचे सांगितले.

दरवर्षी प्रज्ञापुरी कोल्हपुरच्या श्री स्वामी समर्थ सार्वजनिक भक्त मंडळाच्यावतीने धार्मिक, सामाजिक, आध्यात्म समाजसेवा आदि विविध क्षेत्रातील विख्यात धुरीणांचा हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. महाराष्ट्रातील नामवंत विख्यात गुणीजणांना आतापर्यंत पुरस्कार देण्यात आला आहे. यंदाचे हे दहावे वर्ष असल्याचे अध्यक्ष श्री. बुधले यांनी सांगितले.

यावेळी प्रा शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, श्रीशैल गवंडी, चंद्रकांत सोनटक्के, सैदप्पा इंगळे, सुनिल पवार, किरनाळी मेजर, अमोल माने, सुरेश वाले, रमेश शिंदे, मनोज इंगोले, बाबा सुरवसे, सुनिल पवार, मनोज जगताप, संतोष पराणे, सागर गोन्डाळ, दर्शन घाटगे, कांत झिपरे, खाजप्पा झंपले, पोनि नामदेव माने, सोमनाथ सुतार, स्वामीनाथ मुसळे, मधुकर सदाफुले, स्वामी आदिसह काल्हापूर येथील स्वामी भक्त व अक्कलकोट येथील महेश इंगळे मित्र परिवार उपस्थित होते .

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/








लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आ.अमित देशमुख यांनी घेतल्या नागरिकांच्या भेटी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ मार्च : आ. अमित विलासराव देशमुख यांनी शनिवारी बाभळगाव येथील आपल्या निवासस्थानी लातूर शहर व जिल्ह्यातील नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या.यावेळी आ. देशमुख यांनी प्रत्येकाशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी आणि समस्या सविस्तरपणे जाणून घेतल्या.

नागरिकांनी दिलेल्या विविध निमंत्रणांचा त्यांनी स्वीकार केला, तसेच नागरिकांच्या प्रलंबित कामांबाबत आणि समस्यांबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. लातूर शहर महानगरपालिकेत महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, गटनेते विजयकुमार साबदे, यानंतर स्थायी समिती, परिवहन समिती तसेच स्वीकृत सदस्यांची निवड झाल्याच्या निमित्ताने शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंखे व शहर आणि जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी आ. देशमुख यांचे आभार मानले. यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना आगामी कारकिर्दीसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, हमीद शेख, डॉ. अरविंद भातांब्रे, अजित माने, भालचंद्र सोनकांबळे, नगरसेवक इसरार सगरे, नगरसेवक अभिषेक पतंगे, व्यंकटेश पुरी, मुख्तार शेख, सचिन सूर्यवंशी, मनोज स्वामी, राजकुमार पाटील, दत्ता सोमवंशी, संभाजी सिंदगे, रवी सिंदगे, खंडू पाटील यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विविध वृत्त...

## नांदगाव येथे रेशीम शेतकरी, रीलर्स मेळावा उत्साहात संपन्न

त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च : शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन गावांची प्रगती व्हावी, यासाठी शासन कटिबद्ध आहे. याच भूमिकेतून लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात 'रेशीम शेती क्लस्टर' उभारण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी सांगितले. लातूर तालुक्यातील नांदगाव येथील कौसल्या सिल्क रीलिंग (जयराम मठ) येथे आयोजित आधुनिक तंत्रज्ञान, समृद्ध रेशीम उद्योग या विषयावरील रेशीम शेतकरी व रीलर्स मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

या कार्यक्रमाला लातूरचे रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट, केंद्रीय रेशीम मंडळाचे (धारवड) डॉ. विराज सोमकुंवर, 'पोखरा' योजनेचे तंत्र अधिकारी जयसिंग जगधने, सेवानिवृत्त अधिकारी नरसिंग बावगे, रेणापूर पंचायत समितीचे उपसभापती शरद दरेकर, कौसल्या सिल्क रीलिंगचे संचालक ऋषिकेश कराड आणि बीड जिल्ह्यातील आदर्श सरपंच कालिदास नवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

शेतकऱ्यांनी जुन्या रुढीवादी विचारांतून बाहेर पडून धाडसाने नवीन प्रयोग केले पाहिजेत. ज्या गावात पैशांची खेळती आवक नसते, ते गाव समृद्ध होऊ शकत नाही. रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी रेशीम शेती हा एक शाश्र्वत आधार आहे. रेशीम कोशांच्या दरात मोठी घसरण होत नसल्याने हे पीक आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आहे, असे वाघ यावेळी म्हणाले.

रेशीम शेतीसाठी १०० टक्के अनुदान : एस. बी. वराट

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी रेशीम कार्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. मनरेगा योजनेतून रेशीम शेतीसाठी शेड आणि आवश्यक साहित्यासाठी १०० टक्के अनुदान उपलब्ध करून दिले जाते. रेशीम शेतीला अत्यल्प पाण्याची गरज असल्याने किमान आठ ते दहामाही पाणी सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा उत्तम पर्याय आहे. एकरी वार्षिक अडीच ते तीन लाख उत्पादन मिळत असल्याने नगदी पीक म्हणून रेशीम पीक पुढे येत आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांऐवजी रेशीम शेतीकडे वळून याला एका जनचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी यावेळी केले.

यावेळी रेशीम शेतीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रेशीम धागा प्रक्रिया प्रशिक्षण पूर्ण केलेल्या कविता साळुंके व प्रियंका कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय रेशीम मंडळाचे डॉ. विराज सोमकुंवर यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कौसल्या सिल्क रीलिंगचे संचालक ऋषिकेश कराड यांनी मानले. या मेळाव्याला लातूर जिल्ह्यातील सरपंच, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रंथोत्सवामुळे वाचन संस्कृतीच्या संवर्धनास मदत : आ. विक्रम काळे

### औसा येथे दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे दिमाखात उद्घाटन; ग्रंथप्रेमींचा मोठा प्रतिसाद






त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च : ग्रंथ वाचनाने माणसाचे मस्तक समृद्ध होते आणि समृद्ध झालेले मस्तक कोणापुढेही सहज नतमस्तक होत नाही, हा महापुरुषांचा विचार आजच्या डिजिटल युगात रुजविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार विक्रम काळे यांनी केले. औसा येथील श्री मुक्तेश्र्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये आयोजित दोन दिवसीय लातूर जिल्हा ग्रंथोत्सव व ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे होते.

यावेळी व्यासपीठावर उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर, मराठवाडा साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष योगीराज माने, ग्रंथ मित्र राम मेकले, प्रभाकर कापसे, प्राचार्य एस. एम. जलसगरे, संजय सूर्यवंशी, प्रा. अंकुश नाडे, शिवलिंग औटी, रविअप्पा चट्टे आणि राजकुमार जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

युवा वर्गामध्ये वाचनाची ओढ निर्माण करण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन आणि ग्रंथोत्सवासारखे उपक्रम महत्वपूर्ण ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी मराठवाड्यातील आपण सुमारे ३५० शाळा व महाविद्यालयांना प्रत्येकी ३६ हजार रुपयांची ग्रंथसंपदा उपलब्ध करून दिल्याचे आ. काळे यांनी सांगितले. तसेच वाचकांना दर्जेदार ग्रंथ वाचनासाठी उपलब्ध करून देवून सार्वजनिक वाचनालयांनी या वाचन चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ग्रंथ हे भविष्याचे दिशादर्शक: प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे

दरवर्षी वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये ग्रंथोत्सव आयोजित केल्यास सर्वसामान्य वाचकांना तालुक्याच्या ठिकाणी पुस्तके विकत घेण्याची संधी मिळते. ग्रंथोत्सवाला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने येथील स्टॉलवरून किमान एक तरी पुस्तक विकत घेऊन जावे. ग्रंथ माणसाला प्रेरणा देतात, स्वाभिमानी बनवतात. जगभरातील अनेक महान व्यक्तींना ग्रंथांमुळे प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या कार्याला ग्रंथांमुळेच दिशा मिळाली. ग्रंथ हे पिढ्यानपिढ्याचे ज्ञान जपून ठेवतात, भूतकाळ व वर्तमानकाळ समजावून सांगतात आणि भविष्याचा दिशादर्शक म्हणून काम करतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी यावेळी केले.

ग्रंथ मानवी जीवनातील ताणतणाव दूर करतात. वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी सतत प्रयत्न होणे गरजेचे आहे. ज्ञान आपल्याला विवेकशील व सुसंस्कृत बनवते. ग्रंथ आणि ग्रंथालये हे ज्ञानाचे खरे भंडार आहेत. आजच्या डिजिटल काळातही ग्रंथांना पर्याय नाही. आजही ग्रंथ वाचनाची आवड जपणाऱ्यांची संख्या अधिक आहे, असे डॉ. रोडे यांनी सांगितले.'

उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी ग्रंथोत्सव आयोजनाचा हेतू स्पष्ट करताना वाचन चळवळीला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले. प्रारंभी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच या दोन दिवसीय ग्रंथोत्सवात विविध प्रकाशकांचे स्टॉल, पुस्तक प्रदर्शन, चर्चासत्रे व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, वाचकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन पी. सी. पाटील यांनी केले, तर राजेंद्र कोरे यांनी आभार मानले.

ग्रंथोत्सवानिमित्त सकाळी ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. श्रीरंग गहिनीनाथ यांच्या हस्ते ग्रंथपूजन करून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. या ग्रंथदिंडीत वारकरी वेशभूषा केलेला विद्यार्थ्यांचा चमू , मुक्तेश्र्वर विद्यालय, आजीम हायस्कूल, वीरभद्रेश्र्वर विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी खासदार जे. एम. वाघमारे, माजी आमदार गंगाधर पटणे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रत्येकाने वाचनाची आवड जोपासायला हवी : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

औसा येथे आयोजित दोन दिवसीय लातूर ग्रंथोत्सवाला जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी ग्रंथोत्सवातील विविध पुस्तक दालनांची पाहणी केली. तसेच वाचक, नागरिक तसेच ग्रंथप्रेमींशी संवाद साधला. आजच्या डिजिटल युगातही ग्रंथ वाचन हे माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे, ज्ञानार्जनाचे आणि मानसिक स्वास्थ्याचे सर्वोत्तम साधन आहे. प्रत्येक व्यक्तीने, विशेषतः युवा पिढीने वाचनाची आवड जोपासली पाहिजे. ग्रंथ वाचनामुळे माणूस विवेकशील, सुसंस्कृत आणि स्वावलंबी बनतो. ताणतणाव कमी होतो आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

ग्रंथोत्सवासारख्या उपक्रमांमुळे सर्वसामान्य नागरिकांना विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके एकाच ठिकाणी उपलब्ध होतात. नागरिकांनी ग्रंथ दालनाला भेट देऊन किमान एक तरी पुस्तक खरेदी करावे. वाचन हा छंद नव्हे तर जीवनाचा भाग बनवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केल.

## लातूर विभागीय महसूल आयुक्तालय निर्माण कृती समिती आक्रमक

त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि. १४ मार्च : शुक्रवारी लातूर विभागीय महसूल आयुक्तालय निर्माण कृती समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

महाराष्ट्र शासनाचे चालू असलेल्या अधिवेशन काळात महसूल आयुक्तालयाचे विभाजन करण्याचे संकेत महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिले आहेत.तसे विविध बातम्या



वृत्तपत्रात छापून ही आलेल्या आहेत.

गुणवत्ता, बहुसंख्य विभागीय कार्यालय , कार्यालयासाठी उपलब्ध असलेली प्रशासकीय इमारत आणि मराठवाड्याचा सर्वांगीण विकास यामुळे नवीन स्वतंत्र विभागीय 'हसूल आयुक्तालय लातूर येथेच झाले पाहिजे,या प्रमुख मागणीच्या अनुषंगाने पुढील दिशा ठरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बैठकीचे आयोजन बाबासाहेब परांजपे फाउंडेशन,क्रीडा संकुल लातूर येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी समितीचे कार्याध्यक्ष जेष्ठ विधिज्ञ व्यंकटराव बेद्रे होते तर बैठकीस अशोक गोविंदपूरकर,कॉम्रेड विश्र्वंभर भोसले, ओमप्रकाश आर्य,रामकुमार रायवाडीकर,अँड विजय जाधव,अशोक कांबळे, पांडुरंग देडे,अँड प्रदिपसिंह गंगणे,संजय व्यवहारे,शाम वरयानी,अँड मधुकर कांबळे,दिलीप आरळीकर,भाऊसाहेब उमाटे,प्रा संजय मोरे,कांबळे शिवाजी,अँड डी एन भालेराव,अनिल देशपांडे,ताहेर सौदागर,सुधाकर डिसले आदी उपस्थित होते बैठकीत सर्वानुमते चर्चा करून जिल्हयातील लोकप्रतिनिधीची शिष्टमंडळाद्वारे भेट घेऊन लातूरला विभागीय महसूल आयुक्तालय निर्माण करण्यासाठी मदत घेण्यासाठी विनंती करण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे.

## 'दयानंद कला'मध्ये करिअर मार्गदर्शन



त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च : दयानंद कला महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा पर-ीक्षा तयारी व करिअर मार्गदर्शन' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच त्यांना योग्य दिशा देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून गट विकास अधिकारी शिवकुमार पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते. यावेळी प्रा. चैतन्य शिंदे, प्रा. आदित्य शिरोळे उपस्थित होते.

यावेळी पाटील यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासाची पद्धत, वेळेचे योग्य नियोजन तसेच आवश्यक संदर्भ ग्रंथ याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सातत्यपूर्ण अभ्यास, संयम, सकारात्मक दृष्टिकोन आणि शिस्तबद्ध तयारी यांचे महत्त्व पटवून दिले. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही आत्मविश्र्वास, चिकाटी आणि जिद्द यांच्या बळावर स्पर्धा परीक्षांची तयारी केल्यास निश्र्चित यश मिळवता येते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांना करिअरचा एक सक्षम व प्रतिष्ठित पर्याय म्हणून स्वीकारून सातत्याने अभ्यास करावा, असे मार्गदर्शन केले. अशा प्रकारचे मार्गदर्शनपर कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करून त्यांच्या आत्मविश्र्वासात वाढ करतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी केले. सूत्रसंचालन देवांश पाचंगे यांनी केले. प्रा. गजानन घायाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मार्गदर्शन सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

## पक्षाचा विचार, आदर्श जोपासण्याचे काम पदाधिकारी कार्यकर्त्यांनी करावे : अजित पाटील



त.भा. वृत्तसेवा,

लातूर दि.१४ मार्च: भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा.आ.रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी शहर जिल्ह्याच्यावतीने पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियानाने आयोजन करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून संघटनात्मक क्षमता वाढविणे, पक्षाची विचारधारा व आदर्शाची ओळख निर्माण करणे, कार्यकर्त्यांना सक्षम बनविणे, भविष्यातील कार्यक्रम व जनसंपर्काची तयारी करून आगामी निवडणुकांसाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सक्रीय व सक्षम बनवण्याचे कार्य सुरू आहे. त्यामुळे या प्रशिक्षणाच्या माध्यमातून व पक्षीय संघटनाच्या माध्यमातून पक्षाचे विचार व आदर्श जोपासण्याचे कार्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने करावे, असे आवाहन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम शैक्षणिक संकुल, लातूर येथील परिसरामध्ये आयोजित पंडित दिनदयाल उपाध्यक्ष प्रशिक्षण अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी या प्रशिक्षण कार्यक्रमाला विरोधी पक्षनेते देविदास काळे, नगरसेविका तथा महामंत्री रागिणी यादव, सरचिटणीस संजय गिर, संगिता शिंदे, तुकाराम गोरे, प्रदीप मोरे, व्यंकटेश कुलकर्णी, सुधीर धुत्तेकर, राहुल भुतडा, सुरेश जाधव, मनोज सूर्यवंशी, दिग्विजय काथवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान हा एक प्रशिक्षण व सुदृढीकरण उपक्रम असून या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना विचारधारा, संघटनात्मक कार्यपध्दती, नेतृत्वक्षमता आणि कार्यकुशलतेबाबत मार्गदर्शन देण्याचा उद्देश आहे. पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या एकात्म मानववाद आणि अंत्योदय या आदर्श विचारावर आधारीत हा प्रशिक्षण कार्यक्रम आहे. पहिल्याच दिवशी होत असलेल्या या प्रशिक्षणाला महात्मा बसवेश्वर मंडल व श्री सिध्देश्वर मंडल अंतर्गत येणार्या सहा प्रभागामधील कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याचे कार्य केलेले आहे. त्यामुळे लातूर शहर जिल्ह्यामध्ये पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहचण्यासाठी मोठी मदत होणार असल्याचा विश्वासही अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

## विकासाला नव्हे भाजपाच्या भ्रष्टाचाराला विरोध

### जिल्हा नियोजन समितीच्या २६ कोटींच्या कामांना स्थगिती लातूर शहर काँग्रेसने केली भाजपाची पोलखोल

त.भा. वृत्तसेवा,



लातूर दि.१४ मार्च : जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून लातूर शहर महापालिकाअंतर्गत विकास कामे करण्यासाठी २६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. या कामांच्या निविदा स्पर्धात्मकरितीने पुर्णत्वास येण्याऐवजी यात भ्रष्टाचार करण्याच्या उद्देशाने भाजपाच्या आमदार आणि पदाधिकाऱ्यांनी निविदा तुकड्या तुकड्यांत मंजूर केल्या. त्यामुळे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या कामांना तात्पुर्ती स्थगिती देऊन याची चौकशी करण्याचा निर्णय सभागृहाने घेतला. यात विकास कामांना विरोध नव्हे तर भाजपाच्या भ्रष्टाचाराला आमचा विरोध असून लातूरच्या जनतेशी आम्ही बांधील असल्यामुळेच आमची भावना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. किरण जाधव यांनी शुक्रवारी येथे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

येथील काँग्रेस भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेस लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय सा ळुंके, महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, मनपाचे सभागृह नेते विजयकुमार साबदे, नगरसेवक अहेमदखान पठाण, ॲड, दीपक सूळ, सचिन बंडापल्ले, इसरार सगरे, पवन सोलंकर, आतिष चिकटे, विकास कांबळे, गिरीश व्याळे, सचिन गायकवाड, प्रविण सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीने लातूरकरांसाठी दिलेल्या जाहिरनाम्याच्या पुर्ततेसाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत, असे नमुद करुन ॲड. किरण जाधव म्हणाले, २६ कोटी रुपयांच्या विकास कामांविषयी भाजपाकडून बालीश आरोप केले जात आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यामातून विविध विकास कामांना निधी दिला जातो. तसा प्रस्ताव प्रशासनाच्या मान्यतेस्तव जिल्हा नियोजन समितीकडे पाठवावा लागतो. त्यात नागरिकांच्या सूचनांचा अंतर्भाव असावा लागतो. परंतु, कुठलाही संवैधानिक अधिकार नसताना लातूर शहराबाहेरील भाजपाच्या आमदारांनी कामे सुचवली आणि या कामांच्या तुकड्या-तुकड्यांमध्ये निविदा करण्यात आल्या. भाजपा पदाधिका-यांच्या पत्राच्या अनुषंगाने नाली दलितोत्तर योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनांना तुकडवा तुकड्यांत मान्यता देण्यात आली. त्याला मनपा प्रशासनाने घाईगडबडीत मान्यताही दिली. हे सर्व चुकीच्या पद्धतीने झाल्याने या कामांना मनपा सभागृहाने तात्पुर्ती स्थगिती दिली आहे. या निविदांची नगर विकास विभागाच्या वतीने चौकशी करुन सत्य बाहेर यायला काहींच अडचण नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुट उंचिच्या पुतळ्याचे काम असो की, दिवंगत नेते शिवराज पाटील चाकुरकर यांच्या स्मारकाचे काम असो आमच्यासाठी हा राजकीय नव्हे तर भावनिक मुद्दा आहे. त्यामुळे लातूरकरांच्या विश्र्वासाला कदापीही तडा जाऊ देणार नाही, असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना महापौर जयश्री सोनकांबळे म्हणाल्या, शहराच्या सर्वांगिण विकासाचे आमचे प्रयत्न आहेत. निवडणुकीत आम्ही लातूरकरांना स्वच्छ, भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कारभाराचे वचन दिले आहे. त्यास बांधिल राहून शहराचा विकास करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे म्हणाले, निवडणुकीत आम्ही नारिकांना जाहिरनामा दिलेला टक्केवारी बुडत असल्याने अकांडतांडव जिल्हा नियोजन समितीच्या विकास कामांत तुकड्या, तुकड्यात प्रशासकीय मान्यता देणे, तुकड्या, तुकड्यात निविदा करुन भ्रष्टाचार करणे हा भाजपा आमदारांचा आणि पदाधिकाऱ्यांचा एकमेव अजेंडा आहे. केवळ टक्केवारी बुडत असल्यामुळे विकास कामांना खोडा वगैरे, असा अकांड तांडव केला जात आहे, असे नमुद करुन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले, या कामांची निविदा प्रक्रिया घाईत झाली वर्क ऑर्डर काढताना कायद्याच्याबाबी दुर्लक्षीत करण्यात आल्या. विशेष म्हणजे केवळ १० दिवसांची स्थगिती असताना भाजपा आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांना पोटशूळ उठण्याचे कारण काय?, होऊ द्या चौकशी, येऊ द्या सत्य समोर, असे सांगीतले आहे. त्याच्या पुर्ततेसाठी काम सुरु आहे. शहरातील वाहतुक नियंत्रिक करणे, रस्त्यांवरील खड्डे बुजवणे यासह प्रत्येक्ष जागेवर जाऊन उपाययोजना केल्या जात आहेत.

# जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य महादेव मस्के यांचा सत्कार सोहळा संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ मार्च : जिल्हा परिषद मधील महाराणा प्रताप नगर गटातून कॉंग्रेस तर्फे नवनिर्वाचित झालेले सदस्य महादेव प्रभाकर मस्के यांचा सत्कार राज्य बहु जन शिक्षक महासंघा आणि शिक्षक मित्र परिवारातर्फे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य अध्यक्ष गौतम टाकळीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष दिनेश कांबळे .कोषाध्यक्ष शिवाजी पात्रे . निलंगा तालुकाध्यक्ष संतोष माने, कास्ट्राईब संघटनेचे रविकुल ' औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक महेश कांबळे . व्यंकटजी दंतराव, माजी नगरसेवक अंगद कांबळे, जयराज कसबे, सतीश जाधव, कातपूर गावचे सरपंच मनोज देशमुख, शाळा व्यवस्थापन समिती जिल्हा परिषद कातपूर अध्यक्ष पांडुरंग मस्के, चाकूर तालुका वनाधिकारी सुरेश मस्के, नाना दंतराव, मातंग शक्ती संघटना जिल्हाध्यक्ष दत्ता पुंड उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना आनंद पुंड म्हणाले की कोणाला लवकर संधी मिळत नसते . मस्के यांनी मिळालेल्या संधीचे सोने करावे . नात्यांनी ते माझे जावाई असू न त्यांच्यावर मला गर्व आहे . महादेव प्रभाकर मस्के हे विक्रमी मताने निवडून आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून महासंघा ला मोठ्या अपेक्षा आहेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना माजी नगर- सेवक आनंद कांबळे म्हणाले की . ज्या पक्षातर्फे आपण काम करत आहात त्या पक्षाशी एकनिष्ठ राहिल्यामुळे आज आ- पली जि.प . सदस्य प दी वर्णी लागलेली असून आपण फक्त पुंड सरांचे जावाई




नाहीत तर पूर्ण औशे करांचे जावाई आ- हात . त्यामुळे आपल्या हातून चांगले कार्य घडो.

अध्यक्षीय समारोप करताना गौतम टाकळीकर म्हणाले की, पुंड सर आमच्या संघाचे सभासद जरी असले तरी ते मला लहान भावासारखे असल्याने मस्के हे माझे ही जावाई झाले आम्ही महासंघाचे असल्यामुळे मस्के हे महासंघाचे जा- वाई झाले त्यामुळे महासंघाचे म्हणजेच सासऱ्यांचे काम जावायांनी करून आमचा मान वाढवावा जावाई - सासऱ्यांमध्ये योग्य समन्वय साधून आम्हाला . आमच्या कामांना योग्य न्याय द्यावा.

सत्काराला उत्तर देताना महादेव मस्के म्हणाले की . हा सत्कार सासरवाडीत होत असल्याने सासऱ्यांचा योग्य तो मान कसा होईल याची काळजी घेतली जाईल . नाहीतर तुमची लेक मला स्वस्थ थोडी बसू देईल . तुमच्या महासंघाचे कसलेही काम असेल तर तडक माझ्याशी संपर्क करा.

या कायेक्रमाचे सूत्रसंचालन संतोष माने यांनी तर उपस्थितांचे आभार पात्रे यांनी मानले या कार्यक्रमासाठी महासंघाचे कार्यकर्तेआनंद पुंड चे मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी भोजना ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मानवाच्या कल्याणासाठी संतांचा जन्म : डॉ. अरविंद भातांब्रे

तभा वृत्तसेवा

दैठणा दि.१४ मार्च : : येथील भव्य अखंड हरिनाम बीजोत्सव सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न होत असून, महान संत गुरुवर्य ह.भ.प. भागवत आण्णा महाराज अपसंगेकर यांच्या दिव्य सानिध्यात आणि ह.भ.प. जनक आण्णा महाराज अपसंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह पार पडत आहे.

या प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अरविंद भातांब्रे व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष)चे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांनी मित्रमंडळासह उपस्थित राहून गुरुवर्यांचे सत्कार करून दर्शन घेतले.

यावेळी बोलताना डॉ. भातांब्रे म्हणाले की, संतांनी मानवजातीवर अनंत उपकार केले आ- हेत. संतांचा जन्म हा मानवाच्या कल्याणासाठीच झालेला आहे. जर संत जन्माला आले नसते तर समाजाची आजची परिस्थिती कशी असती, हे सांगणेही कठीण आहे. संत ज्ञानेश्र्वर, संत तुकाराम, निवृत्तीनाथ, सोपानदेव, संत नामदेव, मुक्ताबाई, जनाबाई यांसारख्या संतांनी आपल्या वाङ्मयातून समाजप्रबोधन केले आणि समाजाला योग्य दिशा दिली.

आज लाखो भाविक जात-धर्म विसरून हजारो किलोमीटर पायी चालत भगवान पांडुरंगाचे दर्शन घेतात, हे संतांच्या शिकवणीमुळेच शक्य झाले आहे. आपल्या भागात गुरुवर्य भागवत आण्णा अपसंगेकर महाराज यांसारखे संत लाभले हे आपले



भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. संतांचे दर्शन मानवाला आनंद, समाधान आणि चांगले कार्य करण्याची प्रेरणा देते, असेही ते म्हणाले.

तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटराव बिरादार यांच्या निवासस्थानी डॉक्टर अरविंद भातांबरे यांच्याकडून जनक आण्णा अपसंगेकर यांचे दर्शन घेऊन शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आले.

या सत्कार प्रसंगी शिरूर अनंतपाळ येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष)चे प्रदेश सचिव महादेव आवाळे, अशोक कोरे, व्यंकट हांद्राळे, आसिफ उजेडे, अखंड हरिनाम सप्ताह समितीचे पदाधिकारी, ज्येष्ठ समाजसेवक सुखदेव पाटील, दैठणा गावचे विद्यमान उप चार सरपंच आशिष गोविंदराव बिरादार, हरिश्र्चंद्र बिरादार, विनोद बिरादार, पत्रकार आर.बी. मुळे, विश्र्वनाथ तोटे, गणेश बिरादार, पत्रकार राजनारायण बिरादार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तेरणेच्या संरक्षण भिंतीची राष्ट्रवादीच्या प्रवक्त्यांकडून पाहणी

तभा वृत्तसेवा

औसा दि. १४ मार्च : तालुक्यातील उजनी येथील तेरणा नदीलगत होत असलेल्या एक कोटी ४८ लाख रुपयांच्या संरक्षण भिंतीच्या कामाची पाहणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रवक्ते तथा प्रदेश सरचिटणीस सुरज चव्हाण, जिल्हा कार्याध्यक्ष रवी धुमाळ यांनी पाहणी केली.



बाजार समितीचे माजी सभापती योगीराज पाटील, सरपंच युवराज गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष राज पाटील, मजहर पठाण, प्रकाश जबडे, वडजीचे बरकतअली पठाण, चेअरमन दगडू मुळे, चेअरमन साहेब पिंपरे उपस्थित होते.

तेरणेला महापुर आल्यानंतर उजनी गावातील व्यसायिकांची व कुटुंबाची नुकसान होवू नये. यासाठी संरक्षण भिंत उभारण्यात येत आहे. तसेच पात्रातून नदीकाठच्या शेतकऱ्यांना ये जा करण्यासाठी विशेष सोय व्हावी. यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून विशेष तरतूद करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी सांगितले.तसेच या भिंतीसाठी पैसा कमी देणार नसल्याचे यावेळी स्पष्ट केले.

उजनीतील मुस्लिम अल्पसंख्यांक वस्तीतील सिमेंट रस्ते, नाली व इतर सुविधासाठी निधी उप- लब्ध करुन द्यावा. अशी मागणी राज पाटील यांनी यावेळी केली. तसेच गावअंतर्गत विकासासाठी सिमेंट रस्तेची मागणी करण्यात आली.

अल्पसंख्यांक मंत्री यांची भेट घेऊन तुमच्या मागणीबाबत पाठपुरावा करणार आहे. यासाठी लवकरात लवकर निधी उप- लब्ध व्हावा. यासाठी उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे प्रदेश सरचिटणीस चव्हाण यांनी सांगितले. व होत असलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

# राष्ट्रीय महामार्गावर गतिरोधक बसवावेत

त.भा. वृत्तसेवा,

जळकोट दि.१४ मार्च : येथील महामार्ग क्रमांक एनएच ५० नांदेड कंधार जांब-जळकोट घोणसी- उदगीर-बिदर जाणाऱ्या महामार्गावर गतिरोधक नसल्यामुळे सातत्याने जीवितहानी होत असून, या महामार्गावरील गावांजवळ गतिरोधक बसवावेत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जळकोट तालुका कॉंग्रेस पक्षाच्या वतीने शुक्रवारी देण्यात आला आहे.

जळकोट तालुक्यात मागील आठवड्यात अपघात होऊन काहींना जीव गमवावा लागला आहे तर अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे तालुक्यातील जळकोट, पाटोदा, कोळनूर, पाटोदा खुर्द, डोंगरगाव पाटी, तिरुका, खंबाळवाडी, घोण- सी या गावांमध्ये गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी तालुकाध्यक्ष मारुती पांडे यांनी केली आहे. याबाबत तहसीलदार राजेश लांडगे, सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीराम मोचेवाड यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनावर तालुकाध्यक्षांसह जि.प.चे माजी सदस्य बाबुराव जाधव, शहराध्यक्ष महेश धुळशेट्टे, युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष धनराज पाटील, सभापती सुनीता कोसंबे, उपसभापती माधव वाघमारे, मेहताब बेग, बालाजी पाटील, गोविंद केंद्रे, नूर पठाण, मंगेश हुंडेकर, भास्कर गौंड, हावगी स्वामी, व्यंकटराव खटके, पुंडलिकराव डवळे, शेषेराव आडे, चंद्रकांत वाघमारे, राजाराम राठोड आदी उपस्थित होते.

# रेणापूर तहसील कार्यालयासमोर कॉंग्रेसच्या वतीने निदर्शने

त.भा. वृत्तसेवा,

रेणापूर दि.१४ मार्च : केंद्र सरकारने केलेल्या घरगुती गॅस दरवाढीच्या निषेधार्थ तसेच बाजारपेठेत निमर्माण झालेल्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या तुटवड्याविरोधात रेणापूर तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी तहसीलदार प्रशांत थोरात यांना निवेदन देण्यात आले.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आ. धिरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले. वारंवार होणाऱ्या गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान अधिक कठीण होत असून वाढत्या महागाईमुळे नागरिक अग- ोदरच त्रस्त झाले आहेत. त्यातच बाजारपेठेत एलपीजी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याने अनेक नागरिकांना वेळेवर गॅस उपलब्ध होत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्र्वभूमीवर केंद्र सरकारने घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, बाजारपेठेत निर्माण झा- लेला तुटवडा दूर करावा आणि नागरिकांना गॅस सिलेंडर नियमित व सहज उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या वेळी रेणापूर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रमोद कापसे, शहराध्यक्ष पदमसिंह पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती ॲड. शेषराव हाके, संचालक प्रकाशसूर्यवंशी, विश्र्वनाथ कागले, हनुमंतराव पवार, नगरसेवक सचिन मोटेगावकर, गजेंद्र चव्हाण, पंचायत समिती सदस्य बालाजी गोटके, तात्याराव वाघमारे, उद्धव जाधव, संतोष शिंदे, दिलीप उरगुंडे, केशव माने, गोविंद पवार, सचिन इगे, विलास राठोड, कैलास चव्हाण, दिग्विजय पाटील, बाळासाहेब करमुडे, बिभीषण कदम, संजय कांदे, महेश गरड, अजय चक्रे, शंकर भुरे, एम. पी. पडोळे, ज्ञानेश्र्वर मडके, गोविंद वीर, चैतन्य देशमुख, आत्माराम शिंदे, सुरज वंगाटे, अवधूत कातळे, प्रवीण सोमवंशी, अमरेश भिसे, रघुनाथ मदने, गणेश पांचाळ, दयानंद करमुडे, दत्तात्रय डिगोळे, गणेश कलाल यांच्यासह कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' मोठ्या उत्साहात संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

उदगीर दि.१४ मार्च : तालुक्यातील हेर महसुल मंडळ विभागातील मौ करडखेल येथे सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न सत्वर निकाली काढण्यासाठी शासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा १ आयोजित करण्यात आला होता.




या शिबीराच्या अध्यक्षस्थानी सुशांत शिंदे उपविभागीय अधिकारी उदगीर प्रमुख पाहुने म्हणुन राम बोरगावकर,तहसिलदार उदगीर,जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र तिरुके,माजी जिल्हा परीषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी केंद्रे,पंचायत समीती सदस्या काशीबाई सोनकांबळे, पंचायत समिती सदस्य भास्कर जाधव, पोलिस निरीक्षक राजकुमार पुजारी, सहायक गट विकास अधिकारी विवेक स्वामी,उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाचे किशोर कुमार कोरे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री श्रेयश यादव,कृषी अधिकारी श्री संदीप वालकुंडे, तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार विलास सोनवणे,श्रीमती राजश्री भोसले,पुरवठा निरीक्षक श्रीमती सुमीत्रा इलमले सरपंच पार्वती मुसने मंडळ अधिकारी अनिता ढगे, हेर मंडळ विभागातील सर्व ग्राम महसुल अधिकारी तहसिल कार्यालयातील सर्व महसुल सहायक ग्राम पंचायत अधिकारी करडखेल, भोसले बेलुरे पोलिस पाटील एकनाथ कसबे यांच्या सह सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी विविध योजनेची माहिती सुशांत शिंदे उपविभागीय अधिकारी, तहसिलदार राम बोरगावकर, जि.प.सदस्य रामचंद्र तिरुके,श्रेयस यादव यांनी दिले. मध्यातुन नागरीकांच्या विविध महसुली अडचणी सोडवण्यासाठी प्रशासनाने थेट गावात येऊन सेवा दिली त्यांमुळे ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहुन विविध समस्यांचे निराकरण करुन घेतले शिबीराची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आले.उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले यावेळी महसुल विभागाचे अधिकारी तथा मंडळ अधिकारी तसेच ग्राम पंचायत पदाधिकारी उपस्थित होते. प्रशासनाच्या या उपकृमामुळे नागरीकांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासली नाही म्हणुन अनेक कामे गावात मार्गी लागले या समाधान शिबीरात शेतकरी यांना २७३ ७/१२ उता-यांचे वाटप करण्यात आले, ७/१२ दुरुस्ती बाबत ११ अर्जांची स्विकृती करुन त्यांचे निकारण करण्यात आले,शिबीरामध्ये११९फेरफार नोंदी निकाली काढण्यात आले,विविध प्रकारचे प्रमाणपत्रे(उत्पन्न,रहीवाशी,नॅशनॅलीटी,नॉन क्रिमीलेअर,जात प्रमाणपत्र इ)४८३ प्रमाणपत्रांचे वाटपक करण्यात आले.एक खिडकी व्यवस्थे अंतर्गत ३३२ प्रकरणे निकाली काढण्यात आले.जमीण मोजणी संदर्भातील तक्रारी, शेत रस्त्याच्या तक्रारीचे ३२ अर्ज प्राप्त करुन घेण्यात आले व त्याबाबत मंडळ अधिकारी व संबंधीत ग्राम महसुल अधिकारी यांना जायमोक्यावर जाऊन नियमानुसार रस्ते खुले करण्याचे आदे- शीत केले. कृषी विभागामार्फत ४० शेतकरी यांना पी.एम.किसान योजनेबाबत माहिती देण्यात आली व त्यांचे समाधान करण्यात आले, ठिबक सिंचना- चा लाभ मिळण्यासाठी ५शेतकरी यांचे ऑनलाईन अर्ज घेण्यात आले,तुशार सिंचनासाठी १० शेतकरी यांचे ऑनलाईन अर्ज घेण्यात आले,दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत सलोखा योजना,मुद्रांक शुल्काबाबत, महिलांना घर खरेदीसाठी मुद्रांक शुल्क बाबत सवलत,एक जिल्हा एक नोंदणी या सर्व बाबींची माहिती देण्यात आली. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाअंतर्गत शारहरलहींळ या एकाच पोर्टलवर सर्व सुविधा उपलब्ध असल्याचे श्री कोरे यांनी सांगीतले व माहिती दिली. अशा प्रकारचे शिबीरे नियमीत पणे आयोजित करण्यात यावीत अशी मागणी नागरीकांनी यावेळी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हणमंत म्हेत्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

प्रशासन व ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे मौजे करडखेल येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' यशस्वीपणे संपन्न झाले. नागरिकांनी अशा प्रकारची शिबिरे नियमितपणे आयोजित करण्यात यावीत अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

## संस्थेचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्नशील रहावे : प्राचार्य डॉ. यादव

**त.भा. वृत्तसेवा,**

रेणापूर दि.१४ मार्च : जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या ३७ युनिटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य केले जाते. या वाटचालीमध्ये जेएसपीएम संचालित शिव- ाजी कनिष्ठ महाविद्यालय रेणा- पूर या युनिटचे योगदान मोलाचे आहे. या महाविद्यालयाच्या माध्यमातून अध्यात्म, विज्ञान व व्यावसायिकतेवर आधारित तेजस्वी तरुण घडवण्याचे कार्य केले जाते. संस्थेच्या योगदानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये पालक व शिक्षकांचे योगदान मोला- चे आहे. त्यामुळे जेएसपीएम संस्थेने व महाविद्यालयाने दिलेल्या संस्कारातून विद्यार्थ्यांनी आपला आणि संस्थेचा नावलौकिक वाढविण्याचे कार्य करावे, असे प्रतिपादन शिव- ाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश यादव यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचालित शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आयोजित विद्यार्थी पालक मेळाव्यात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नारायणराव देशमुख, उपप्रा- चार्य डॉ.प्रकाश शिंदे, उपप्राचार्य डॉ.गणेश नागरगोजे, उपप्राचार्य डॉ.एम.बी.जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# गॅस दरवाढ विरोधात कॉंग्रेसचे आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**

निलंगा दि.१४ मार्च : केंद्र सरकारकडून वारंवार घरगुती एल- पीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत वाढ करण्यात येत असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आधीच महागाईच्या वाढत्या ओझ्याखाली सामान्य नागरिक, महिला व कुटुंबचे- कुटुंब त्रस्त असताना गैस दरवाढ ही त्यांच्यावर आणखी एक आर्थिक भार ठरत आहे. गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी या मागणीसाठी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या सूचनेनुसार निलंगा तहसील कार्यालयासमोर कॉंग्रेसच्या वतीने आंदोलन करुन निवेदन देण्यात आले.




निवेदनात सध्या बाजारपेठेत एलपीजी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

त्यामुळे केंद्र सरकारकडे तात्काळ घर- गुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, बाजारपेठेत निर्माण झा- लेला सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा तातडीने दूर करावा, सर्वसामान्य नागरिकांना सिलेंडर सहज व नियमित उपलब्ध होईल यासाठी योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, शहराध्यक्ष तथा नगरसेवक अजित नाईकवाडे, नगरसेवक डॉ गजेंद्र तरंगे, सिराज देशमुख, जि.प. सदस्य शाहीद पटेल, प्रमोद मरुरे, प.स.सदस्य किरण पाटील, अभिजित उसनाळे, बालाजी गोमसाळे, माधवराव पाटील, विठ्ठल पाटील, अजगर अन्सारी, महेश देशमुख, राजप्पा वारद, तुषार सोमवंशी आदी उपस्थित होते.

# शिरूर अनंतपाळ बसस्थानकातून लांब पल्ल्याच्या गाड्या सोडा

**त.भा. वृत्तसेवा**

शिरूर अनंतपाळ दि.१४ मार्च : शिरूर अनंतपाळ येथील नागरिकांकडून आगार प्रमुख यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आलेली आहे. तालुक्यातून राज्यातील विविध शहरांकडे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या एसटी बस सेवा सुरू कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. याबाबत विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ लातूर यांना निवेदन देण्यात आले आहे.विषेश म्हणजे तालुका होण्याच्या अगोदर या शिरूर अनंतपाळ मार्गावर निलंगा आगाराच्या अनेक बसेस धावत होत्या यात निलंगा मुखेड, निलंगा परभणी, निलंगा वसमत, निलंगा भोकर, नांदेड आशा बसेस धावत होत्या परंतु तालुका होवून २६ ते २७वर्षे झाली त्यातली एकच बस चालु आहे ती म्हणजे निलंगा नांदेड.शासनाच्या वतीने तालुका निर्मिती केली परंतु बससेवा बंद केलंय असं येथील नागरिकांतून बोलले जात आहे.या सर्व बसेस चालू करण्यासाठी अनेक वेळा शिवनेरी महाविद्यालयाच्या व श्री अनंतपाळ नुतन विद्यालयाच्या वतीने आगार व्यवस्थापक यांना निवेदन देण्यात आले होते.परंतु कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने व बसेसची संख्या कमी असल्याने बसेस चालू करण्यासाठी आम्ही काहीही करू शकत नाही असे आगारप्रमुख यांनी सांगितले होते.अशी बातमी सोलापूर तरुण भारत या वृत्तपत्राने छापली होती.



आता सामाजिक कार्यकर्ते धनंजय देवंगरे व, संदिप धुमाळे यांनी लातूर येथील मुख्य कार्यालयास भेट देऊन अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, शिरूर अनंतपाळ तालुक्यातून पुणे, संभाजीनगर , परभणी, ला- तूर, मुंबई, नाशिक आदी ठिकाणी जाण्यासाठी सध्या थेट एसटी बस सेवा उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी, नोकरी करणारे तसेच व्यापारी वर्गाला प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः शिरूर अनंतपाळ येथून पुणे, संभाजीनगर, परभणी, मुखेड, मुंबई व नाशिक या मार्गावर लांब पल्ल्याच्या एसटी बस सेवा सुरू केल्यास तालुक्यातील हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. सध्या प्रवाशांना खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून त्यामुळे आर्थिक भार वाढत आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीनेही अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्र्वभूमीवर संबंधित मार्गांवर लवकरात लवकर एसटी बस सेवा सुरू करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. यावेळी शिरूर अनंतपाळ येथील नागरिकांनी स्वाक्षरी करून निवेदन सादर केले.तालुका होण्याच्या अग- ोदर परभणी,मुखेड, वसमत, नांदेड,भोकर या पुर्वी धावणाऱ्या जुन्या बसेस आहेत या तर चालु झाल्याच पाहिजेत परंतु छ.संभाजी नगर, नाशिक, मुंबई या सुध्दा बसेस या मार्गावर चालु झाल्या पाहिजेत नाही झाल्यास शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्यात येईल अशी चर्चा शिरूर अनंतपाळ तालुक्यातील नागरिकातुन ऐकावयास मिळत आहे.

या निवेदन सादर करताना देवंगरे संदीप धुमाळे हे सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# रमजान ईद सणाला सुका मेवाच्या दरवाढीचा तडका

तभा वृत्तसेवा

औसा दि. १४ मार्च- मुस्लिम समाज बांधवांचा एक महिना उपवास असलेला वर्षातील सर्वात मोठा सण रमजान ईद आठवडाभरावर आला आहे. या वर्षी आखाती देशातील युध्दामुळे या सणात लागणाऱ्या वस्तूच्या दरात ऐनवेळी वाढ झाली आहे.याचा मोठा फटका बसला आहे. यावर्षी सुका मेवा च्या दरात तब्बल सव्वापटीने वाढ झाली असून यंदा सण कसा साजरा करावा.याची चिंता मुस्लिम बांधवातून दिसून येत आहे.

लहान, मोठ्या व्यवसायाच्या माध्यमातून कुटुंबाची उपजिवीका भागवणाऱ्या मुस्लिम समाजाचे वर्षात दोन मोठे सण आहेत. एक वर्षाच्या तिसऱ्या महिन्यात रमजान ईद तर दु- सरा सण पहिल्या सणानंतर दोन महिन्यांनी येतो तो बकरी ईद.रमजान ईद सणात लहानापासून ते वयोवृध्दापर्यंतचे समाजबांधव तब्बल एक महिना उपवास करतात.बारा महिने नमाज पढणारे बांधव या महिन्यात दिवसभरात पाच वेळा नमाज पढतात. तर तरावीची नमाज रात्री ९ ते १० च्या दरम्यान एक तास होते.

या महिन्यात पहाटे ५.१५ ते रात्री ६. ४० या तेरा तासाच्या काळात पाणी न पिता पुर्णपणे कडक उपवास करतात. यानंतर दिवसभराचा उपवास सोडण्याची परंपरा आहे.या महिन्यात सलग १३ तास उपवास करीत पुरुष मंडळी रमजान ईद साजरी करण्यासाठी व्यवसाय करतात.परंतू या वर्षी ईद साजरी करण्यासाठी लागणाऱ्या सुका मेवाच्या दरात सव्वा पट वाढ झाल्याने सण साजरा करण्यासाठी लागणारे बजेट पार कोलमडले आहे

गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी २५% दरवाढ झाली आहे.

| सुका मेवा | २०२५ | २०२६ |
|---|---|---|
| काजू | ८०० | १००० |
| बदाम | ९०० | १००० |
| पिस्ता | २००० | २५०० |
| सेवया | १०० | ११० |
| आक्रोड | १००० | १२०० |
| चारोडी | २००० | २४०० |
| मनुके | ३०० | ६०० |
| टरबुज बी | ८०० | १००० |
| खरबुज बी | १००० | १२०० |

या प्रमाणात दरवाढ झाली असून खोबर आणि खजूर यामध्ये वाढ झाली नाही.मात्र यंदा युध्दाच्या भडक्यामुळे झालेल्या या दरवाढीत गोरगरीब कुटुंबाचे कंबरडे मोडले आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शासकीय दुध योजनेच्या गोडाऊनवर अतिक्रमण; सहा जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१४ मार्च -**

शासकीय दुध योजना कार्यालयाच्या परिसरात अतिक्रमण करून शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी भुम पोलिस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी संतोष धर्मराज पवार (वय ४५), प्रभारी दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दुध योजना भुम, रा. नाईचाकुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, आरोपी अंकुश कल्याण पवार, बिरुदेव कल्याण पवार, सुरज लहु पवार, संपत्ती सिताराम पवार, कालीदास महादेव पवार व सागर अंकुश पवार (सर्व रा. भुम ता. भुम जि. धाराशिव) यांनी दि. ६ मार्च २०२६ रोजी पहाटे सुमारे ५.३० वाजता शासकीय दुध योजना कार्यालयाच्या संरक्षक भिंतीलगत असलेल्या गोडाऊनचे पत्रे काढून त्यावर शेड उभारून अतिक्रमण केले. या प्रकारात शासकीय मालमत्तेचे सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच संबंधितांनी शासकीय दुध योजना कार्यालयाला जबरदस्तीने कुलूप लावण्यास भाग पाडून कार्यालयाचे दैनंदिन कामकाज बंद पाडले व शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

या प्रकरणी भुम पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# कळंबमध्ये भरदिवसा गुंडगिरीचा धुमाकूळ

**हॉटेलमध्ये घुसून मारहाण... युवक गंभीर जखमी...**




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१४ मार्च -**

शहरात मागील काही दिवसांपासून गुंडगिरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भरदिवसा काही जणांनी शहरातील एका हॉटेलमध्ये घुसून दहशत माजवत कर्मचाऱ्यांना मारहाण केली. तसेच जेवणासाठी आलेल्या एका युवकावर वजनदार वस्तूने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. या प्रकारामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ मार्च रोजी शहरातील हॉटेल प्रेरणा येथे सुमारे आठ ते दहा जणांचे टोळके अचानक आले. त्यांनी वेटर व इतर कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण करत हॉटेलमध्ये तोडफोड केली. यावेळी जेवणासाठी आलेले सुमीत मोदी या युवकाच्या डोक्यात वजनदार वस्तू मारल्याने तो गंभीर जखमी झाला. जखमी मोदी यांना पुढील उपचारासाठी धाराशिव येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे वाद मिटल्यावरही हेच टोळके पुन्हा हॉटेलमध्ये परत आले आणि शिवीगाळ करत पुन्हा दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र या गंभीर घटनेप्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात अद्याप गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळाली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, कळंब शहरात मागील काही वर्षांपासून शांत असलेले वातावरण पुन्हा अस्थिर होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. मागील महिन्यात शहरातील मुख्य चौकात पोलिसांसमोरच हाणामारी झाली होती. त्यानंतर चार दिवसांपूर्वी एका विशिष्ट समाजातील दोन गटांमध्ये मोठा वाद झाला होता.

त्या दोन्ही गटांनी दोन दिवस शहरात दहशत माजवली होती. त्या घटनेतही गुन्हा दाखल झाला नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सतत घडणाऱ्या अशा घटनांमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस प्रशासनाने कडक पावले उचलून गुंडगिरीवर आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## परंड्यात लोकअदालतीला प्रतिसाद

**४६३ प्रकरणे तडजोडीतून निकाली, ५० लाखांची वसुली**



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ मार्च -**

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शनिवार (दि. १४ मार्च २०२६) रोजी परंडा न्यायालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या लोकअदालतीत दावा दाखलपूर्व तब्बल ४६३ प्रकरणे तडजोडीतून निकाली काढण्यात आली असून सुमारे ५० लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. तसेच ४९ प्रलंबित दिवाणी दावे आणि चेक अनादर व तडजोड पात्र २५ फौजदारी प्रकरणेही तडजोडीने मिटविण्यात आली.

या लोकअदालतीदरम्यान एक संवेदनशील प्रसंग घडला. हिंगणगाव बुद्रुक (ता. परंडा) येथील मुंडे दांपत्य दिव्यांग असल्याने न्यायालयात येण्यास अडचण निर्माण झाली होती. पतीला चालता येत नसून पत्नीला दृष्टी नसल्यामुळे परिस्थिती अत्यंत कठीण होती. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) ए. ए. शेख व दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) ए. एन. निवडंगे यांनी स्वतः बाहेर जाऊन त्यांची चौकशी केली आणि सदर प्रकरण तडजोडीतून यशस्वीरीत्या निकाली काढले. या संवेदनशील निर्णयामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात आले. या राष्ट्रीय लोकअदालतीत तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश डॉ. एफ. ए. एम. ख्वाजा, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) ए. ए. शेख, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) डी. जे. जगताप तसेच ए. एन. निवडंगे यांनी प्रकरणे खेळीमेळीच्या वातावरणात तडजोडीने निकाली काढली.

लोकअदालतीच्या माध्यमातून प्रकरणे जलदगतीने मार्गी लागल्याने नागरिकांचा वेळ व पैसा वाचल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत होते.

## मटका जुगारावर छापा; एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ मार्च -**

शहर पोलीस ठाण्याच्या जुगारविरोधी पथकाने दि. १३ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ८.१० वाजता धाराशिव-तुळजापूर रोडलगत नॅशनल पान स्टॉलच्या मागे छापा टाकून मटका जुगार चालविताना एका व्यक्तीवर कारवाई केली.

या कारवाईत आरोपी दत्ता गोराबा तट (वय ४०, रा. खाजा नगर, कोकाटे कॉम्प्लेक्स मागे, धाराशिव, ह.मु. तुळजापूर नाका) याच्या ताब्यातून मटका जुगाराचे साहित्य व ४९० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.

याप्रकरणी धाराशिव शहर पोलिसांनी जुगार साहित्य जप्त करून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## इटकळ येथे 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान' समाधान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१४ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे इटकळ येथे महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान' समाधान शिबिराला शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शासकीय सेवांचा लाभ घेतला. या अभियानाचे उद्घाटन तहसीलदार अरविंद बोळंगे व तालुका कृषी अधिकारी आबासाहेब देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी कीर्तीकुमार पुजार, गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदिवे, काटगाव जिल्हा परिषद गट सदस्य निवृत्ती माळी, शहापूर गटाचे जिल्हा परिषद सदस्य सुनिल बनसोडे, पंचायत समिती सदस्य भाग्यश्री शिंदे, प्रियांका मिटकरी, सुलभा कोळी, नायब तहसीलदार प्रियंका काळे लोखंडे, मंडळ अधिकारी डी. पी. गायकवाड, तलाठी गोरख तोडकरी, पोलीस पाटील विनोद सलगरे यांच्यासह विविध गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरात ७/१२ दुरुस्ती, फेरफार निर्गमित करणे, उत्पन्न व रहिवासी दाखले, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामासाठी आवश्यक प्रमाणपत्रे, निराधार योजना, पीएम-किसान योजना तसेच सातबारा मधील त्रुटींविषयी अर्ज स्वीकारण्यात आले. यावेळी कुटुंबातील रक्त नात्यातील व्यक्तींमध्ये शेती वाटपाची प्रक्रिया अधिक सुलभ झाल्याची माहिती देण्यात आली. केवळ पाच रुपयांचे तिकीट लावून तलाठ्यामार्फत अर्ज केल्यास कुटुंबातील सदस्यांच्या नावावर जमीन नोंद करता येणार असल्याचे तहसीलदार बोळंगे यांनी सांगितले. ग्रामीण भागातील नागरिकांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

तसेच पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग, आरोग्य विभाग आदी १७ शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी शिबिरात उपस्थित राहून नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून देत शासनाच्या योजनांची सविस्तर माहिती दिली. या शिबिरामुळे नागरिकांची अनेक प्रलंबित कामे एकाच ठिकाणी मार्गी लागल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

## वाशी तालुक्यात सोलार प्लांटमधील केबल चोरी; पाच लाखांचा ऐवज लंपास

**वाशी, दि.१४ मार्च -**

तालुक्यातील शिवारातील सोलार प्लांटमधून सुमारे १० हजार मीटर डी.सी. केबल चोरी करून पाच लाख वीस हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत अक्षयकुमार दिलीपराव नाडे (वय ३३, रा. मुरुड ता. लातूर जि. लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात दशरथ सखाराम शिंदे (वय ५०, रा. भांडवले ता. वाशी जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.१२ मार्च रोजी सायंकाळी ५ ते १३ मार्च रोजी सकाळी ११.३० या दरम्यान वाशी शिवारातील सर्वे नं. ७७ व ७८ मधील सोलार प्लांटवरून सुमारे १० हजार मीटर लांबीची डी.सी. केबल चोरी केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## खुदावाडी जि.प. शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१४ मार्च -**

जि.प. प्राथमिक शाळा खुदावाडी येथे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा व विद्यार्थी सर्वगुणसंपन्न व्हावेत या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमास ग्रामस्थ व पालकांचा प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सरोजिनी कबाडे होत्या. उद्घाटक म्हणून जवाहर महाविद्यालय अणदूरच्या माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकण्णा उपस्थित होत्या. यावेळी डॉ. सिद्रामप्पा खजूरे, पोलिस पाटील बसवेश्वर सांगवे, वसंत चिंचोले, पांडू बापू बोंगरगे, तुकाराम बोंगरगे, दगडू सालेगावे, राम जवळगे, ब्रह्मानंद कापसे, मनोज कबाडे, वसंत कबाडे, महेश्वर बोंगरगे, नागनाथ खंदारे, भीमाशंकर कबाडे, गुंडू कापसे आदींसह शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश जवळगे, उपाध्यक्षा शिल्पा चिंचोले व सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक विलास चव्हाण, वर्षा शृंगारे, प्रीती टेंभुरकर, शुभदा कुलकर्णी, विनय कंदी, संगीता घुगे, शांताराम गायकवाड आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## तुळजापूरमध्ये गुटखा माफियांचा सुळसुळाट

**कारवाईच्या मागणीसाठी ३० मार्चला ठिय्या आंदोलन...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ मार्च -**

तुळजापूर शहर व तालुक्यात मोठ्या प्रमाणात गुटख्याची अवैध आयात व विक्री सुरू असल्याचा आरोप करत यावर तातडीने कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने ३० मार्च रोजी अन्न व औषध प्रशासन कार्यालय, धाराशिव येथे ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तुळजापूर शहरासह तालुक्यात कर्नाटक राज्यातून मोठ्या प्रमाणात गुटख्याची अवैध आयात केली जात असून ग्रामीण व शहरी भागात मोठमोठी गोदामे उभारून तेथून होलसेल पद्धतीने गुटख्याची विक्री केली जात आहे.






तुळजापूर शहरासह ग्रामीण भागात उघडपणे गुटखा विक्री सुरू असून त्यावर कोणत्याही प्रकारची कठोर कारवाई होत नसल्याने युवकांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

तुळजापूर तालुक्यात संपूर्णपणे गुटखा विक्री बंद करून संबंधित माफियांवर कठोर कारवाई करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा ३० मार्च रोजी अन्न व औषध प्रशासन कार्यालय, धाराशिव येथे ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा समितीच्या वतीने गणेश पाटील यांनी दिला आहे.

## डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ मार्च -**

नळदुर्ग येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या उत्साहात व थाटामाटात पार पडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गीत-नृत्य कार्यक्रमांमुळे उपस्थित प्रेक्षक भारावून गेले.

दि.१३ मार्च रोजी झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन नगरसेविका राणी शिवाजी सुरवसे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका कविता देशमुख होत्या. यावेळी नगरसेवक आकाश कुलकर्णी, सुधीर पोतदार तसेच नगरपालिकेच्या आरोग्य, स्वच्छता व दिवाबत्ती समितीच्या सभापती सुमनबाई ठाकुर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष नगरसेवक मारुती खारवे व शाळा प्रशासनाच्या वतीने करण्यात आला.

कार्यक्रमाला पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष मारुती खारवे, मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# लोकनेते तानाजी सावंत : अष्टपैलू नेतृत्व आणि जनसेवेचा महामेरू...



महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या धडाडीच्या निर्णयांनी आणि जनसेवेच्या व्रताने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्व म्हणजे आमदार प्रा. तानाजीराव सावंत. परंडा-भूम-वाशी मतदारसंघाचे नेतृत्व करताना त्यांनी केवळ राजकारण केले नाही, तर समाजकारणाचा एक नवा वस्तुपाठ घालून दिला आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या अष्टपैलू कार्याचा घेतलेला हा आढावा. **१. साखर उद्योगातील 'भीष्मपितामह' साखर सम्राट ते लोकनेता :** 'भैरवनाथ शुगर' या समूहाच्या माध्यमातून त्यांनी सहकार क्षेत्रात क्रांती घडवून आणली. त्यांच्या कार्यक्षम नियोजनामुळे आज त्यांची ओळख 'साखर सम्राट' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात आहे. मात्र, ही ओळख केवळ उद्योगापुरती मर्यादित न राहता, हजारो हातांना रोजगार देणारे केंद्र म्हणून नावारूपास आली आहे. **२. शिवजलक्रांती : दुष्काळमुक्तीचा ध्यास** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'शिवजलक्रांती' योजनेच्या माध्यमातून त्यांनी आपल्या मतदारसंघात क्रांती घडवून आणली. शेकडो किलोमीटरचे नदी रुंदीकरण आणि खोलीकरण करून त्यांनी कोरड्या पडलेल्या नद्यांना जिवंत केले. त्यांच्या या दूरदृष्टीमुळे आज हजारो एकर जमीन ओलिताखाली आली असून शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील पाणी पुसण्याचे काम त्यांनी केले आहे.

**३. सामाजिक बांधिलकी: शोषितांचे कैवारी** तानाजी सावंत यांचे हृदय सर्वसामान्यांसाठी नेहमीच पाझरते. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून त्यांनी घेतलेले निर्णय थक्क करणारे आहेत. शेकडो मुलांचे पालकत्वः निराधार आणि गरीब कुटुंबातील शेकडो मुलांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाची आणि भवितव्याची जबाबदारी त्यांनी उचलली आहे. सामूहिक विवाह सोहळा: गोरगरीब लेकीबाळींचे लग्न थाटामाटात लावून देण्यासाठी त्यांनी 'सर्वधर्मीय मोफत विवाह सोहळ्याचे' आयोजन करून शेकडो कुटुंबांना आर्थिक संकटातून वाचवले आहे.

**४. संकटात धावून जाणारा 'देवदूत** राजकारण बाजूला ठेवून माणुसकी जपणारा नेता म्हणून तानाजी सावंत ओळखले जातात. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना आधार: शेतकरी आत्महत्या असो किंवा आरक्षण आंदोलनादरम्यान बलिदान दिलेले तरुण, सावंत यांनी त्यांच्या कुटुंबांना केवळ सांत्वन दिले नाही, तर मोठी आर्थिक मदत करून त्यांना पुन्हा उभे राहण्याचे बळ दिले. जनतेच्या हाकेला प्रतिसाद: सर्वसामान्य जनतेच्या एका हाकेवर धावून जाणारा हा नेता कार्यकर्त्यांसाठी खऱ्या अर्थाने 'दैवत' ठरला आहे. **५. शिवसेनेचा बुलंद आवाज** महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेचा एक मोठा आणि वजनदार चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. परंडा मतदारसंघाचे दुसऱ्यांदा खंबीर नेतृत्व करताना त्यांनी विकासकामांचा डोंगर उभा केला आहे. पक्षाप्रती निष्ठा आणि कार्यकर्त्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते यामुळेच ते आज एक उत्तुंग नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सत्ता येते आणि जाते, पण जनमानसात निर्माण केलेले स्थान अढळ असते. आमदार तानाजी सावंत यांनी आपल्या कर्तृत्वाने सामान्यांच्या हृदयात जागा मिळवली आहे. अशा या लोकनेत्याला वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा! त्यांच्या हातून अशीच देशसेवा आणि जनसेवा घडत राहो, हीच सदिच्छा.

शब्दापेक्षा कर्तृत्व मोठे असलेल्या जनसामान्यांच्या या नेत्याला उदंड आयुष्य लाभो!

वार्तांकन-
**विकास भगवान तळेकर**
**शिवसेना उप तालुका प्रमुख तथा संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती वाशी.**

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माकणी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्य शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१४ मार्च -**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान - समाधान शिबिर (टप्पा १) अंतर्गत लोहारा तालुक्यातील माकणी मंडळातील मौजे माकणी येथे दि. १४ मार्च २०२६ रोजी समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार रणजितसिंह कोळेकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सभापती पल्लवी जानकर, गटविकास अधिकारी जगदेव वगे, तालुका कृषी अधिकारी महेश देवकते, ॲड. विश्वनाथ पत्रिके आदी उपस्थित होते.यावेळी उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांनी शिबिरास भेट देऊन नागरिकांना विविध शासकीय योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या शिबिरात महसूल विभागामार्फत नागरिकांना विविध लाभांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणे २७ निकाली, ७/१२ दुरुस्ती अर्जांवरील ५५ प्रकरणे निकाली, डिजिटल ७/१२ उतारे २१०, डिजिटल ८-अ उतारे १४०, तसेच जात, उत्पन्न, रहिवास आदी विविध प्रमाणपत्रे ४४१ वितरित करण्यात आली.

या शिबिरास माकणी मंडळातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

**वाशी, दि.१४ मार्च -**

राज्याचे माजी आरोग्यमंत्री व परंडा मतदारसंघाचे आमदार तानाजी सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त (दि.१४) मार्च रोजी वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिवसेनेच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी जि.प. सदस्य विकी चव्हाण, पंचायत समिती सदस्या पुनम घोलप, शाळेचे मुख्याध्यापक कोकाटे, नितीन घुले, नारायण खापे, अक्षय चव्हाण, अच्युत शिंदे, सोहन सरवदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.



### भैरवनाथ कानडे यांना ‘उत्कृष्ट निवेदक पँथररत्न पुरस्कार’

**धाराशिव, दि.१४ मार्च -**

दलित पँथर संघटनेच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे (दि.९) रोजी संपन्न झालेल्या भव्य व प्रेरणादायी सोहळ्यात तुळजापूर तालुक्यातील चिकुंद्रा येथील सहशिक्षक, निवेदक, साहित्यिक आणि जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य भैरवनाथ खंडू कानडे यांना निवेदक/सूत्रसंचालन कार्यातील ‘उत्कृष्ट निवेदक पँथररत्न पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. हा गौरव केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री नामदार मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात दलित पँथर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भुजंग नडगम, दलित पँथर महिला आघाडीच्या प्रमुख सुवर्णा नडगम, प्रा. विजय बेंगळे, प्रख्यात गायक साजन बेंद्रे, विशाल जाधव, शिवाजी गोरे, डॉ. रोहित बोरकर, प्रकाश धिडले, अनिल रामटेके, हिम्मतराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. या सन्मानाबद्दल भैरवनाथ कानडे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहेत.



### तेरणा महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावर एकदिवसीय कार्यशाळा

**धाराशिव, दि.१४ मार्च -**

तेरणा महाविद्यालयात आयटी फोरमच्या वतीने कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या आधुनिक तंत्रज्ञान विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि एआयचा प्रत्यक्ष वापर समजावा या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत पुणे येथील ऑक्सिरेम टेक्नॉलॉजी प्रा. लि. कंपनीचे टीम मेंबर्स ज्योती साखरे, समाधान तिकोने आणि अथर्व जगदाळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगणक विभाग प्रमुख प्रा. सुनील पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दीपिका देशमुख यांनी केले तर प्रा. जयंत कांचनबटवे यांनी आभार मानले. या कार्यशाळेला विद्यार्थी उपस्थित होते.



### सुवर्णकारांसाठी मार्गदर्शनपर शिबिर

**धाराशिव, दि.१४ मार्च -**

धाराशिव जिल्हा सराफ व सुवर्णकार फेडरेशन असोसिएशनच्या वतीने १३ मार्च रोजी धाराशिव येथे सराफ व सुवर्णकार बांधवांसाठी मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला जिल्ह्यातील व्यापाऱ्यांचा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमात मुंबई येथील सराफ सुवर्णकार व्यापारातील तज्ज्ञ तखतमलजी परमार यांनी सुवर्णकार व्यवसायातील बदलते प्रवाह, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच व्यवसायातील विविध संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शिबिराला धाराशिवसह परंडा, भूम, वाशी, कळम, येरमाळा, येडशी, तेर, नळदुर्ग, अणदूर, ईटकळ, जळकोट, मुरूम, लोहारा, माकणी, उमरगा आदी भागांतील सराफ व सुवर्णकार बांधव उपस्थित होते.

### वाहतूक नियमभंगावर कारवाई

**धाराशिव, दि.१४ मार्च -**

शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. दि. १३ मार्च रोजी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत मोटार वाहन कायदा-नियम भंगाच्या एकूण १७६ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली.

# जिल्हा परिषद अध्यक्ष उपाध्यक्ष निवडीपूर्वीच अर्थसंकल्प मंजूर !

**धाराशिव जिल्हा परिषद अर्थसंकल्पाला मंजुरी... प्रशासनाकडून २६.९२ कोटींची तरतूद...**




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ मार्च -**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीपूर्वीच जिल्हा परिषद प्रशासनाने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीच्या स्वसंपादित उत्पन्नाच्या मूळ अर्थसंकल्पास मंजुरी दिली आहे. जिल्हा परिषद प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी २६ कोटी ९२ लाख ७२ हजार ९७० रुपयांच्या अर्थसंकल्पास मंजुरी प्रदान केली. मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन इगे यांनी गुरुवारीच हा अर्थसंकल्प सादर केला.

यावर्षी जिल्हा परिषद प्रशासनाने विविध विभागांमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर भर दिला आहे. पर्यावरणपूरक ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा परिषद इमारतीचे सौर विद्युतीकरण करण्यासाठी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्रांना पुस्तके उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

बांधकाम विभागासाठी ४.५५ कोटी रुपये, आरोग्य विभागासाठी २.०८ कोटी रुपये, पाणी पुरवठा विभागासाठी १.२३ कोटी रुपये, तर शिक्षण विभागासाठी २४.२६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षणाला चालना देण्यासाठी पाचवी ते बारावीपर्यंतच्या मुलींना सायकल वाटपासाठीही ४.९७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

तंत्रज्ञानाच्या वापराला चालना देण्यासाठी पंचायत राज कार्यक्रमांतर्गत आयटी सेल व कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानासाठी ४० लाख रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. प्रशासन अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्यासाठी ई-गव्हर्नन्स प्रणाली मजबूत करण्यावर भर देण्यात येणार आहे.

समाजकल्याणाच्या दृष्टीनेही विविध योजनांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. समाजकल्याण विभागासाठी ४६.१० लाख रुपये, महिला व बाल कल्याण विभागासाठी ७०.१२ लाख रुपये, तर दिव्यांग कल्याणासाठी ४३.०८ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अनिवार्य तरतुदींपेक्षा अधिक निधी देऊन सामाजिक न्यायाच्या उपक्रमांना प्राधान्य देण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

याशिवाय विविध प्रमुख विभागांसाठीही मोठ्या प्रमाणात निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम भालके, अनंत कुंभार यांच्यासह विविध विभागांचे जिल्हा प्रमुख व वित्त विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## एलपीजी गॅस, पेट्रोल-डिझेल साठेबाजी रोखण्यासाठी कडक कारवाई

**जिल्हाधिकारी पुजार...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ मार्च -**



आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात एलपीजी गॅस, पेट्रोल व डिझेलचा पुरवठा अखंड व सुरळीत राहावा यासाठी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली १४ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली.

बैठकीत जिल्हाधिकारी पुजार यांनी सर्व संबंधित विभागांनी समन्वय ठेवून नागरिकांना इंधनाचा पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश दिले. इंधन साठा, वाहतूक व वितरण व्यवस्थेचा आढावा घेऊन संभाव्य अडचणी वेळेत दूर करण्यावर भर देण्यात आला. जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांनी जिल्ह्यातील पेट्रोल-डिझेल व एलपीजी पुरवठ्याबाबत माहिती देताना सध्या जिल्ह्यात १४९ पेट्रोल पंप व २७ गॅस एजन्सी कार्यरत असल्याचे सांगितले. घरगुती गॅस सिलिंडरचा अनधिकृत वापर रोखण्यासाठी तपासणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. पेट्रोल पंप व गॅस एजन्सींवर अनावश्यक गर्दी होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. घरगुती गॅसची साठेबाजी किंवा काळाबाजार आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. तुळजापूर व येरमाळा येथे होणाऱ्या आगामी यात्रांच्या पार्श्वभूमीवर व्यापारी व व्यावसायिकांना लागणाऱ्या गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित तहसीलदारांनी मागणीचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीस पोलीस अधीक्षक रितु खोखर, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी निकिता साकळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास आदी अधिकारी उपस्थित होते.

## तळपत्या उन्हात १५१ वृक्षांना टँकरने पाणी; पद्माकर घोडके यांचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ मार्च -**

तळपत्या उन्हातही वृक्ष जिवंत राहावेत यासाठी भाजपचे माजी शहराध्यक्ष व वृक्षप्रेमी पद्माकर घोडके यांनी यंदाही स्वखर्चाने टँकरद्वारे जवळपास १५१ वृक्षांना पाणी घालून त्यांची जोपासना करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

नळदुर्ग शहरातील मुख्य रस्त्यालगत गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समिती तसेच पद्माकर घोडके यांच्या मुलगी ईश्वरीच्या वाढदिवसानिमित्त विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

बसस्थानकासमोरून शहरात जाणारा मुख्य रस्ता, नगरपालिका रस्ता व जिल्हा परिषद प्रशालेच्या प्रांगणात बहावा, वड, पिंपळ, बेल, बकुळ, पारिजात, करंजी व जांभूळ या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

वृक्ष लागवडीनंतर त्यांची योग्य काळजी घेतल्यामुळे आज ही झाडे हिरवीगार बहरली असून नागरिकांना सावली व शुद्ध ऑक्सिजन देत आहेत.

या सर्व वृक्षांची निगा राखण्याचे काम पद्माकर घोडके स्वतः करतात. झाडांची आळे स्वच्छ करणे ते पाणी घालणे अशी सर्व कामे ते एकट्याने करत असल्याने झाडांची चांगली वाढ झाली आहे.

सध्या वाढत्या उष्णतेमुळे झाडे वाळू नयेत म्हणून १३ मार्च रोजी सकाळपासूनच त्यांनी टँकरने पाणी घालण्याचे काम सुरू केले. यावेळी त्यांना त्यांची मुलगी ईश्वरी हिनेही मदत केली.

## जवाहरमध्ये राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१४ मार्च -**




तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि जवाहर महाविद्यालय अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल युगामध्ये मौखिक आणि लोकसाहित्याच्या उदातीकरण व पुनरुज्जीवनासाठी बहुविद्याशाखीय दृष्टिकोन या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेच्या उद्घाटक म्हणून लातूर येथील ज्येष्ठ विचारवंत डॉ. कमल ठकार उपस्थित होत्या. त्यांनी लोकगीतांच्या ओळींद्वारे लोकसाहित्याचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव रामचंद्र आलुरे होते. बीजभाषक म्हणून व्यंकटेश्वरा विद्यापीठ, दिल्ली येथील प्रा. उमाकांत पाटील यांनी कन्नड लोकसाहित्याचा संदर्भ देत अशा कार्यशाळांची आजच्या काळात आवश्यकता अधोरेखित केली. यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी घुगे, समन्वयक डॉ. अनिता मुदकण्णा व डॉ. अंकुश कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी पारंपरिक बंजारा नृत्य सादर केले. समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. कार्यशाळेत सहभागी महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विवेकानंद वाहुळे व डॉ. प्रसन्न कंदले यांनी केले, तर प्रा. डॉ. राजशेखर नळगे यांनी आभार मानले.

या कार्यशाळेला प्राध्यापक, स्थानिक महिला व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## नळदुर्गमध्ये गॅस सिलिंडरसाठी नागरिकांची गर्दी; बुकिंग करूनही वेळेवर मिळत नसल्याची तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ मार्च -**



नळदुर्ग येथील गॅस एजन्सी कार्यालयाबाहेर गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून, बुकिंग केल्यानंतरही वेळेवर गॅस मिळत नसल्यामुळे नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

प्रशासनाने गॅस बुकिंग केल्यानंतर सिलिंडर घरपोच मिळेल असे जाहीर केले असले तरी प्रत्यक्षात नळदुर्ग शहरात नागरिकांना गॅससाठी एजन्सी कार्यालयाबाहेर रांगा लावाव्या लागत आहेत. बुकिंग करूनही गॅस मिळत नसल्याच्या तक्रारी अनेक नागरिकांनी केल्या आहेत. तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी घरगुती गॅस तसेच पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून कंपन्यांकडून नियमित पुरवठा सुरू असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे. मात्र नळदुर्ग शहरातील परिस्थिती याच्या विरुद्ध असल्याचे दिसून येत आहे.

येथील गॅस एजन्सीकडून एक सिलिंडर घेतल्यानंतर दुसरा सिलिंडर मिळण्यासाठी ४५ दिवसांचा कालावधी असल्याचे सांगितले जात असल्याची माहिती नागरिकांनी दिली. नळदुर्ग हा शहरी भागात येत असल्याने शहरासाठी लागू असलेले नियम येथे लागू असणे आवश्यक असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. बुकिंग केल्यानंतर घरपोच सेवा तर दूरच, एजन्सी कार्यालयात जाऊनही सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.

त्यामुळे प्रशासनाने नळदुर्गमधील गॅस वितरण व्यवस्थेवर लक्ष ठेवून नागरिकांना सणासुदीच्या काळात गॅस सिलिंडरची कमतरता भासू नये, यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## तेर येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर’ उपक्रमास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१४ मार्च -**



महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर’ या उपक्रमांतर्गत तेर येथे आयोजित विशेष शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन नूतन जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या गावातच एकाच दिवशी विविध महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी वारंवार हेलपाटे मारण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शिबिरामध्ये रस्तेविषयक अडचणींचे निवारण, ‘जिवंत सातबारा’ मोहीम, सामाजिक अर्थसाहाय्य योजनांसाठी अर्ज स्वीकृती, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दाखले, मंजूर फेरफार प्रकरणांतील सातबारा व फेरफार उतारा वाटप, सातबारामधील त्रुटी दुरुस्ती तसेच भोगवटदार वर्ग २ जमीन वर्ग १ मध्ये परावर्तन संदर्भात मार्गदर्शन आदी महसुली कामांचा निपटारा करण्यात आला.

नागरिकांनी उपस्थित राहून शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नागरिकांनी दिलेल्या अर्जांवर लवकरात लवकर कार्यवाही करून ते निकाली काढावेत, अशा सूचना संबंधित महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

महसूल विभागाकडून काही अर्जांवर तत्काळ कार्यवाही करून त्यांचा निपटारा करण्यात आला. त्यानंतर संबंधित लाभार्थींना प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात आले.

यावेळी उभारण्यात आलेल्या विविध शासकीय स्टॉलना उपस्थित मान्यवरांनी भेट दिली. कृषी विभागाकडून पात्र लाभार्थींना कृषी औजारांचेही वाटप करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, तहसीलदार डॉ. मृणाल जाधव, पंचायत समिती सभापती गोकर्णा कदम, पंचायत समिती सदस्य जया नाईकवाडी, सरपंच दीदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड यांच्यासह तेर मंडळातील लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते तसेच महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## पोहनेर येथे यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ मार्च -**

पोहनेर येथे एमटीएस ऑलिम्पियाड २०२६ मध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांच्या वतीने शनिवारी (दि.१४) सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात गोल्ड मेडल प्राप्त ९ विद्यार्थ्यांसह उत्तीर्ण ११ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विकास कांबळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सभापती गोकर्णा कदम, उपसभापती प्रमोद पाटील यांसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेच्या दुरुस्ती व आवश्यक सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले.

किसान विद्यालय पोहनेर येथील मुलांच्या व मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने तालुका व जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल सर्व खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन विजय देशमुख यांनी केले.